रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ११८ | पृष्ठे १० | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



सी साईट रिसॉर्ट नागाव
बिच येथे कामासाठी
अनुभवी मॅनेजर पाहिजे.
कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक.
9422856336/9028143980

रायगड, रविवार, दि. ५ ऑक्टोबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹




## अभिनेत्री संध्या शांताराम यांचं निधन

। मुंबई । प्रतिनिधी ।

अभिनेत्री संध्या शांताराम यांचं निधन झालं आहे. चित्रपट महर्षी व्ही. शांताराम यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांच्या निधनानंतर चित्रपटसृष्टीमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. अनेकजण सोशल मीडियाच्या माध्यमातून संध्या यांना श्रद्धांजली वाहताना दिसत आहेत. पिंजरा हा त्यांचा गाजलेला चित्रपट होता. तसंच संध्या यांनी झनक झनक पायल बाजे, नवरंग या आणि अशा अनेक चित्रपटांमधून आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली होती. टपोरे डोळे आणि चेहऱ्यावरचे हावभाव यातून बोलणाऱ्या संध्या यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे.



व्ही. शांताराम यांच्या दिग्दर्शनात त्यांनी अभिनयाचे धडे गिरवले. अरे जा हरे नटखट या गाण्यात त्यांनी पुरुष आणि स्त्री अशी वेशभुषा करुन नाच करत सगळ्यांनाच मंत्रमुग्ध केलं होतं. अशा हरहुन्नरी अभिनेत्रीची प्राणज्योत मालवली आहे. पिंजरा चित्रपटातील प्रसिद्ध अभिनेत्री संध्या शांताराम यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी आपल्या अप्रतिम अभिनय आणि नृत्यकौशल्याने प्रेक्षकांच्या मानावर एक वेगळी छाप पाडली.

झनक झनक पायल बाजे, दो आंखें बारह हाथ आणि विशेषत: पिंजरा चित्रपटामधील त्यांची अजरामर भूमिका प्रेक्षकांच्या मनात कायम स्मरणात राहील. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो! अभिनेत्रीच्या निधनाने इंडस्ट्रीतही एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.






# मासेमारीच्या हंगामाला हवामानाचा फटका

## • कोळी बांधवांची सानुग्रह अनुदानाची मागणी

**| रायगड | प्रतिनिधी |**

पावसाळी मासेमारी बंदी संपुष्टात आल्यानंतर १ ऑगस्टपासून सुरू झालेल्या मासेमारीच्या नव्या हंगामाला अतिवृष्टी, वादळी वारे यांचा जबरदस्त फटका बसला आहे. हंगामाच्या सुरुवातीलाच पारंपरिक मच्छिमारांना अनपेक्षित नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागल्याने ऑगस्ट-सप्टेंबर हे मासेमारीकरिता पोषक महिने असूनही खराब हवामानामुळे या दोन महिन्यांत पारंपरिक मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आली नाही. परिणामी, मच्छिमारांचे आर्थिक गणित कोलमडले असून मच्छिमारांना शासनाने सानुग्रह अनुदान जाहीर करावे, अशी मागणी कोळी बांधव करीत आहेत.

१ जून ते ३१ जुलै अशी ६१ दिवसांची विधिमान्य



पावसाळी मासेमारी बंदी संपुष्टात आल्यानंतर १ ऑगस्टपासून नव्या मासेमारी हंगामाला सुरुवात झाली. मासेमारीकरिता मच्छिमारांनी बोटी पाण्यात उतरवल्या त्यावेळी वातावरण काहीसे शांत दिसत होते. त्यामुळे नव्या हंगामात चांगल्या प्रकारे मासेमारी करता येईल, अशी अपेक्षा असतानाच नारळी पौर्णिमेनंतर अचानक वादळी हवामान आणि अतिवृष्टी सुरू झाली. त्यामुळे मासेमारीत काही दिवसांचा खोळंबा आला. त्यानंतर मासेमारी सुरू झाली. मात्र, पुन्हा गौरी-गणपतीच्या काळात खराब हवामानामुळे मासेमारी खोळंबली. वादळी हवामानामुळे बोटी समुद्रात अडकल्या. मासेमारी ठप्प झाली. रायगड जिल्ह्यातील मासेमारीकरिता खोल समुद्रात गेलेल्या अनेक बोटींनी वादळाच्या काळात विविध बंदरात आश्रय घेतला, त्यानंतर काही दिवस मासेमारी पुन्हा सुरू झाली. मात्र, नवरात्र उत्सव सुरू होताच पुन्हा बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने अतिवृष्टी आणि वादळी हवामानामुळे मासेमारी खोळंबली.

ऑगस्ट-सप्टेंबर हे मासेमारीकरिता पोषक महिने असूनही खराब हवामान, वादळ आणि अतिवृष्टी यामुळे या दोन महिन्यांत पारंपरिक मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आली नाही. परिणामी मासेमारीकरिता डिझेल, बर्फ, जाळी तथा अन्य साहित्ययावरझालेलाखर्च अक्षरशः वाया गेला, त्यामुळे पारंपरिक मच्छिमारांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. मासेमारीकरिता खर्च जास्त आणि केलेल्या मासेमारीतून उत्पन्न कमी अशी बिकट परिस्थिती पारंपरिक मच्छिमारांची झालेली आहे. याशिवाय मासेमारीच्या व्यवसायाशी संबंधित अन्य घटकही मोठ्या प्रमाणात बाधित झाले आहेत. या सर्वांचा सहानुभूतीने विचार करून शासनाने ताबडतोब मच्छिमारांना सानुग्रह अनुदान जाहीर करणे गरजेचे आहे, अशी भावना मच्छिमार समाजातून व्यक्त होऊ लागली आहे.

यंदा अतिवृष्टीमुळे पिके पाण्याखाली गेल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यांच्या तुकसानीचे पंचनामे करून त्यांच्याकरिता शासनाने मदतीची घोषणा केली आहे. लोकप्रतिनिधी बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करत आहेत. पारंपरिक मच्छिमारही मत्स्यशेती करतात. मात्र, लहरी हवामान, सततची अतिवृष्टी आणि वादळी वारे यामुळे मत्स्यशेती करणारे पारंपरिक मच्छिमारही हंगामाच्या सुरुवातीलाच आर्थिक गणित कोलमडल्याने संकटात सापडले आहेत.

किनाऱ्यावर येऊन पारंपरिक मच्छिमारांच्या नुकसानीची काय स्थिती आहे. याची एकाही लोकप्रतिनिधीने माहिती घेतलेली नाही, सरकारने मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा दिलेला आहे त्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच मत्स्यशेती करणाऱ्या मच्छिमारांच्या नुकसानीचाही विचार करून मदतीचा हात द्यावा, अशी मागणी होत आहे.

# पूर्णाकृती पुतळ्याच्या कामाचे भूमिपूजन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कोल्हारे ग्रामपंचायतीचे हद्दी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे कामाचे तसेच संविधान स्तंभ उभारण्याचे कामाचे भूमिपूजन करण्यात आले. कोल्हारे ग्रामपंचायत सरपंच महेश विरले यांच्या संकल्पनेतून हे स्मारक उभे राहत आहे.

कोल्हारे ग्रामपंचायतीच्या वतीने धामोते गावाच्या हद्दीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान स्तंभाचे कामाचे भूमिपूजन करण्यात आले. नेरळ कळंब रस्त्यावरील साई मंदिर येथून रॅली काढण्यात आली. रॅलीत विविध समाजघटक, तरुण-तरुणी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात व जय भीमच्या घोषणांनी रॅलीचे वातावरण भारावून गेले होते. ही रॅली धामोते गावातील भूमीपूजन पर्यंत काढण्यात आली. भूमीपूजन प्रसगी ग्रामपंचायत सरपंच महेश विरले, प्रकाश गायकवाड, गणेश बगाडे, विशाल कोंगडे, प्राची जाधव, विशाल वाघ, अशोक गायकवाड तसेच उपसरपंच सविता कोळआंबे, ग्रामसंघ अध्यक्ष ज्योत्स्ना विरले तसेच ग्रामपंचायत सदस्या सदस्य आणि रोशन म्हसकर, पपेश विरले, सोमनाथ विरले, वैष्णवी म्हसकर, सविता कोळंबे, मेघ धुमाळ, संदीप शेलोरे, नूतन पेरणे, ओव्हाळ, गीता मोरे, अस्मिता विरले, साक्षी विरले, मयूर पेरणे, गणेश तावडे, मारुती विरले आदी उपस्थित होते.

सरपंच महेश विरले यांनी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर प्रसार प्रत्येक पिढीत व्हावाआणि त्या उद्देशाने हे स्मारक बनविले जात असून संविधान स्तंभ उभारणीमुळे संविधानातील तत्त्वे समाजासमोर जिवंत राहतील, असा आशावाद व्यक्त केला.



# नोकरीच्या बहाण्याने दोघांची सहा लाखांची फसवणूक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

विदेशात नोकरीला लावतो असे सांगून दोघांकडून सहा लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी अब्दुल लतीफ शेख (रा. तळोजा) याच्या विरोधात तळोजा पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

मोहम्मद मस्तान अजीम सय्यद याचे भाचे अदनान समी आणि गुफरान समी नोकरीच्या शोधात होते. त्यांना अब्दुल लतीफ हा परदेशात नोकरी लावून देतो, असे समजले. त्याच्याशी ओळख करून दिली असता, त्याने विदेशात नोकरी व व्हिसासाठी १५ लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. तसेच ॲडव्हान्स म्हणून १० लाखांची मागणी केली. अखेर सहा लाखांमध्ये काम करण्याचे ठरले. यावेळी आधी साडेतीन लाख रुपये आणि नंतर अडीच लाख रुपये देण्यात आले. काही दिवसांनी नोकरीसाठी दिल्लीला जात आहे, असे सांगून अब्दुल लतीफ निघून गेला. मात्र अब्दुल लतीफशी संपर्क साधला असता, फोन बंद येत होता. अखेर तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली.

# स्वच्छोत्सवानिमित्त विविध उपक्रम

**| वावोशी | प्रतिनिधी |**

भारत सरकारच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान देशभरात 'स्वच्छता ही सेवा स्वच्छोत्सव २०२५' साजरा करण्यात आला. या अभियानाचा एक भाग म्हणून आयसीएआर-सेन्ट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज टेक्नॉलॉजीचे मुंबई संशोधन केंद्र यांनी विविध उपक्रम राबवून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि जनजागृतीचा संदेश दिला.

१७ सप्टेंबर रोजी केंद्रातील सर्व कर्मचाऱ्यांनी ऑनलाइन शपथग्रहण कार्यक्रमात सहभाग घेतला. परिसर व प्रयोगशाळांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. १९ सप्टेंबर रोजी




शालेय विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. २६ सप्टेंबर रोजी 'स्वच्छ भारताकडे वाटचाल' या नावाने वॉकाथॉनचे आयोजन करण्यात आले होते. ३० सप्टेंबर रोजी मच्छिमारांसाठी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात माशांची स्वच्छ हाताळणी, मत्स्य कचऱ्याचा उच्च मूल्य उत्पादनासाठी उपयोग या विषयांवर वैज्ञानिक व्याख्याने झाली.

त्याचबरोबर प्लास्टिक प्रदूषण या विषयावर नुक्कड नाटक सादर करून मच्छिमारांना जागरूक करण्यात आले. या संपूर्ण कालावधीत झालेल्या उपक्रमांना कर्मचाऱ्यांचा व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती त्यांचे मालकांकडून १) हंसाबेन नलिनभाई हिरपरा (पटेल) २) नलिनभाई वल्लभाई हिरपरा (पटेल) कायमच्या खरेदी करण्याचे ठरविलेले आहेत.

**मौजे - बेकरे, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकती**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ६४ | ११ | ०.१७.०० | ०.२५ |
| ७५ | १ | ०.३०.१० | २.२९ |
| ७८ | ३/ब | ०.७८.०० | ०.५२ |
| ७८ | ३/ड | ०.५७.०० | ०.३१ |
| ७८ | १०/ब | १.०६.०० | ०.७५ |
| ७८ | १२/अ | ०.४६.०० | ०.२० |
| ७८ | १२/ब | ०.२५.०० | ०.१२ |
| ७८ | १२/ड | ०.१२.०० | ०.०६ |
| ७८ | १३ | १.४०.०० | ०.६४ |
| ८१ | १ | १.४७.०० | ०.७७ |
| ८१ | ३/अ | ०.४४.५० | ०.२२ |
| ८१ | ३/ब | ०.४४.५० | ०.२० |
| ८१ | ५ | ३.०९.०० | १.७२ |
| ८१ | ७/ब | १.२६.०० | ०.५२ |
| ८१ | ८ | १.५४.०० | ०.६९ |
| ८१ | ११ | ०.११.०० | ०.०९ |
| ८२ | १२ | ०.१३.०० | ०.०८ |
| ८२ | २१ | ०.२३.०० | ०.३१ |
| ८२ | २२ | ०.७९.०० | ०.९२ |
| ८३ | ८ | ०.१६.२० | ०.६६ |
| ८७ | २ | ०.१२.३० | १.८१ |

सदरच्या जमीन मिळकती ह्या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीं संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा, कुलमूखत्यारपत्र वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ५/१०/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. स्वनिल बाबूराव देशमुख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

# वाहतूक पोलिसांचे वाहतूक नियमांबाबत प्रबोधन

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण, पनवेल, नवीमुंबई, मुंबईसह पुणे व कोकण, गोवा अशा राज्यातील प्रमुख महामार्ग असलेल्या गव्हाणफाटा वाहतूक पोलिसांच्या वतीने वाहनचालकांना वाहतूक नियमांबाबत प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन गव्हाणफाटा वाहतूक शाखेचे प्रभारी वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितिन बडगुजर यांच्या अधिपत्त्याखाली त्यांच्या वाहतूक पोलीस कार्यालय आयोजित करण्यात आले होते.

यावेळी वाहनचालकांनी मद्यपान करून वाहन चालऊ नये, असे सूचित करण्यात आले.याशिवाय अवजड कंटेनर ट्रेलर आणि कार्गो अशा वाहनचालकांसह सर्वच अवजड वाहन चालविणाऱ्या चालकांनी वाहन चालवीत असतांना मोबाईलचा वापर करू



नये. वाहनचालकांनी महामार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी वाहने थांबवू नये. त्याच प्रमाणे वाहनचालकांनी महामार्गावर संतुलित वेगाने वाहने चालवावीत, कोणीही भरधाव वेगाने आपली वाहने चालवून अपघातास कारणीभूत ठरू नये, याबाबत प्रबोधन केले. महामार्गावर अपघात झाल्यास जखमींना तात्काळ हॉस्पिटलमध्ये पोहोचविण्यासाठी १०० क्रमांक व ११२ क्रमांकाला फोन करून अपघाताची माहिती तात्काळ द्यावी. याशिवाय जवळच्या वाहतूक नियंत्रण कक्षाकडे व संबंधित पोलीस ठाण्यात कळवावे तसेच १०८, १०३३ क्रमांकावर फोन करून रूग्णवाहिका बोलवावी, याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन बडगुजर यांनी वाहन चालकांना प्रबोधनातून आवाहन केले.

# बबनराव धुळे यांचे निधन



**नेरळ** : चोरावले गावातील रहिवाशी असलेले बबनराव धुळे यांचे वयाच्या ६६ व्या वर्षी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. अंबरनाथ येथील आयुध निर्माण कारखान्यात कामगारांचे नेतृत्व करीत असलेले बबनराव धुळे हे कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष देखील राहिले होते. कर्जत तालुक्यातील सर्व समाज आणि राजकीय पक्ष यांच्या नेत्यांमध्ये बबनराव धुळे यांचे मैत्रीचे संबंध होते.बबनराव धुळे यांच्याकडून अंबरनाथ यायेथील ऑर्डनन्स कंपनीमध्ये मॅकेनिक विभाग सेवा बजावणारे धुळे यांनी कामगारांच्या युनियनचे नेतृत्व करीत होते.

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे मालक श्री. बलराम छबीराज यादव वगैरे यांचेकडून सदर शेती स्वरूपाची मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे - कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १३० | ४/ब | ००-५३-००<br>पो.ख. ००-०३-००<br>एकुण ००-५६-०० | २-९४ |

वरील तदंगभुत हक्कहितसंबंध सुध्दा.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोड पत्र, बक्षिस, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

ता.०५/१०/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. योजना अनिल शिंदे उर्फ**
**ॲड. सौ. योजना मनिष सुर्वे**
रा.श्रीनाथ अपार्टमेंट, फ्लॅट नं. ३०२,
तिसरा मजला, भैरवनाथ मंदीरासमोर,
मुद्रे (बु.), कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं.८६२४९३०९२५.

# लायन्स क्लब तर्फे रुग्णांना फळे वाटप

**उरण** : लायन्स क्लब तर्फे सेवा सप्ताह आयोजित केला आहे. या सप्ताहचे औचित्य साधून लायन्स क्लब उरण गोल्डच्या वतीने इंदिरा गांधी शासकीय हॉस्पिटल उरण येथील रुग्णांना फळें वाटप करण्यात आले.सामाजिक बांधिलकी जपत रुग्णांना फळे वाटप करण्यात आली.याप्रसंगी लायन्स क्लब ऑफ उरण गोल्डच्या अध्यक्ष निरज काडीयन, एम.जे.एफ.लायन्स संदिप म्हात्रे, लायन्स ॲड. दतात्रेय नवाळे, लायन्स रेखा घरत, लायन्स राजेंद्र ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

# वेलशेत-आंबेघर गावात स्वच्छता अभियान

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वेलशेत- आंबेघर गावात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या दरम्यान स्वच्छता ही सेवा अभियान आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे राबविण्यात आले. या संपूर्ण पंधरवाड्यामध्ये महाविद्यालयात व दत्तक गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयीन परिसर स्वच्छता, वर्ग खोल्यांची स्वच्छता, संगणक साक्षरता विषयक व महिला सबलीकरण व्याख्यान, महिलांसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा, राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त उद्बोधन वर्ग, महिलांचे सबलीकरण व ऊर्जा बचत पोस्टर प्रदर्शन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत कार्यालय, वेलशेत येथे महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.श्रीकृष्ण तुपारे यांनी विद्यार्थी व उपस्थित विजय आहिरे प्रशासकीय अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी यांना स्वच्छतेची शपथ दिली. नंतर तीन गटात विद्यार्थ्यांना विभागून दोन्ही गावामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सदर शिबिरास माननीय अहिरे ग्रामविकास अधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले. या शिबिरात एकूण ४५ विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभागी झाले होते. २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधींच्या जयंती निमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

# शिल्पा दरेकर यांची सहामाही संपुष्टात!

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

नगराध्यक्षपदाच्या संगीत खुर्चीचा खेळ ४ एप्रिलपासून सुरू झाला असताना पहिल्या सहामाहीच्या नगराध्यक्ष शिल्पा देवेंद्र दरेकर यांची शिवसेना संघटनेने दिलेली मुदत ४ ऑक्टोबर रोजी संपुष्टात आली आहे. यानंतर अस्मिता उमेश पवार या माजी महिला बालकल्याण सभापती नगराध्यक्ष होणार की स्नेहल मेहता यांची वर्णी लागणार याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

पोलादपूर शहरामध्ये गेल्या दहा वर्षांत नगराध्यक्षपदाच्या निवडीबाबत सत्ताधारी शिवसेनेने कायम सर्वांना संधी देण्याच्या भूमिकेतून संगीतखुर्चीचा खेळ सुरू केला आहे. २०१४ पासून आतापर्यंतच्या १० व्या नगराध्यक्षांना संधी मिळण्याची वेळ आज निर्माण झाली आहे. पोलादपूर नगराध्यक्षपदासाठी संधी देताना



कोणत्याही कार्यक्षमतेचा विचार होत नसून नगराध्यक्षपद द्यायचे ठरले की दिले जात असल्याने ते पद गेले तर कोणताही संकोच वाटत नसल्याचे आतापर्यंतच्या माजी नगराध्यक्षांचे मत आहे. महिलांच्या बाबतीत मागील पंचवार्षिकमध्ये अश्विनी गांधी या कार्यक्षम नगराध्यक्षा वगळता शिवसैनिक असलेल्या पतीकडूनच नगराध्यक्षपदाच्या संधीसाठी पक्षसंघटनेला गळ घातली जात असे तर या पंचवार्षिकमध्ये अशाच प्रकारे शिवसैनिक पतीने पक्ष संघटनेला गळ घातल्यानुसार पुन्हा नगराध्यक्षा होणार की सामाजिक कार्याचा अनुभव असलेल्या सक्षम महिला नगरसेविकेला संधी मिळणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

शिवसेना पक्षसंघटनेने यंदा दोन पत्रकार पत्नींना नगरसेविका होण्याची संधी दिली असून त्यापैकी शिल्पा दरेकर यांना सहामाही नगराध्यक्षपदाची संधी मिळाल्यानंतर दुसऱ्या पत्रकारपत्नी स्नेहल मेहता यांना लगेचच जोडून संधी दिली जाईल, अथवा सामाजिक कार्याचा अनुभव असलेल्या सक्षम महिला नगरसेविका अस्मिता पवार यांना संधी देण्यात येणार आहे, याबाबत पक्षसंघटनेने निर्णय गुलदस्त्यातच ठेवला आहे.नगरसेविका अस्मिता पवार यांचे पती माजी उपनगराध्यक्ष उमेश पवार यांचे निधन झाल्यानंतर त्यांनी सक्षमपणे उमेदवारी लढवित विजय मिळविला असून पूर्वीप्रमाणेच महिलाविषयक समाजकार्य करीत नावलौकीक कायम ठेवला आहे. त्यांच्यापाठिशी पतीसारखे ठाम व्यक्तीमत्व कोणी नसल्याने सध्या पक्षसंघटनेच्या निर्णयाखेरिज पर्याय नाही आणि दुसऱ्या पत्रकारपत्नीला संधी देण्याचा निर्णय झाल्यास उर्वरित काळ सहा महिन्यांचा असेल की मागील पंचवार्षिकमधील राजन पवार या नगराध्यक्षांसारखा अत्यल्प कालावधी मिळेल, याचाही अस्मिता पवार यांच्या संभाव्य नगराध्यक्षपदाच्या कालावधीवर परिणाम होणार आहे. पक्षसंघटनेमध्ये स्नेहल मेहता यांना संधी मिळाल्यास त्यांची कारकिर्द गाजविण्यासाठी त्यांचे पत्रकारपती विशेष सामाजिक उपक्रम राबवतील आणि पक्ष संघटनेला निवडणुकीला सामोरे जाताना लाभ होईल, अशी अटकळ लावून उर्वरित सर्व मुदत स्नेहल मेहतांना नगराध्यक्षपदाचा कालावधी म्हणून संधी दिली जाईल, अशी शक्यता व्यक्त होत आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की माझे अशील हे श्री. साहेबराव सुखदेव खिल्लारी (सदरहु विक्रेता) यांजकडून त्याच्या वर्ग १ वहीवाटीची आणी मालकीची मौजे नारपोली तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती मधील त्यांचे सर्व मालकी हक्क, हितसंबंध, अधिकार आणि / किंवा इतर फायदे हस्तांतरीत तथा तबदील करुन घेण्याचा विचार करत आहेत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की सदरहू मिळकतीबाबत सदरहु विक्रेते यांच्या मालकी हक्क, हितसंबंध व अधिकार याबाबत ज्या कुणाचा समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारें हरकत किंवा दावा असेल तर त्यांना विनती करण्यात येते की तशाप्रकारची हरकत किंवा दावा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी सादर करावी. तसे न केल्यास सदरहू मिळकतीबाबत तशाप्रकारचा काही हक्क व अधिकार असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल.

**मालमत्तेचा तपशील**

येणेप्रमाणे सदरहु विक्रेते यांच्या प्रत्यक्ष ताबा कब्जात असलेली जिल्हा व तुकडी पनवेल, तालुका व पोट तुकडी-पनवेल, जिल्हा परिषद-पनवेल तसेच पंचायत समीती-पनवेल, मे. सब रजिस्ट्रार साहेब पनवेल यांच्या स्थळ सीमेतील मौजे नारपोली तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड येथील वर्ग १ वहीवाटीची गट व उपविभाग क्र ३९/२ क्षेत्रफळ ० हे-१७ आर-७० चौ.मी अधिक पोटखराबा ० हे २- आर-७० चौ.मी. अशी एकुण क्षेत्रफळ हे ० हे-१९-आर-७० चौ.मी. आकार ३ रू-३७ पैसे या वर्णनाची जमीन की जिचे ७/१२ दप्तरीनुसार वर्णन खालीलप्रमाणे आहे

**मौजे नारपोली तालुका पनवेल जिल्हा - रायगड**

| गाव | गट व उपविभाग क्र | क्षेत्र हे आर-चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| नारपोली | ३९/२ | ०-१७-७०<br>अधिक<br>पो.ख.०-२-०० | ३-३७ |
| | | ०-१९-७० | |

सही /-
**श्री. कालिदास सु. पोटे**
ॲडव्होकेट मुंबई उच्च न्यायालय
कार्यालय क्र.३०८ तिसरा मजला
बावा टॉवर, भुखंड क्र. ७८-७९, सेक्टर १७
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३
मो. नं. ९८३३५२५१५१

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की माझे अशील हे श्री. साहेबराव सुखदेव खिल्लारी आणि इद्रकुमार नेनमल परमार ('सदरहु विक्रेता') यांजकडून त्याच्या वर्ग १ वहीवाटीची आणी मालकीची मौजे नारपोली तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णणाच्या मिळकती मधील त्यांचे सर्व मालकी हक्क, हितसंबंध, अधिकार आणि/किंवा इतर फायदे हस्तांतरीत तथा तबदील करुन घेण्याचा विचार करत आहेत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की सदरहू मिळकतीबाबत सदरहु विक्रेते यांच्या मालकी हक्क, हितसंबंध व अधिकार याबाबत ज्या कुणाचा समझोता करार, साठेकरार, विकी, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारें हरकत किंवा दावा असेल तर त्यांना विनंती करण्यात येते की, तशाप्रकारची हरकत किंवा दावा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी सादर करावी तसे न केल्यास सदरहू मिळकतीबाबत तशाप्रकारचा काही हक्क व अधिकार असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल.

**मालमत्तेचा तपशील**

येणेप्रमाणे सदरहु विक्रेते यांच्या प्रत्यक्ष ताबा कब्जात असलेली जिल्हा व तुकडी पनवेल, तालुका व पोट तुकडी-पनवेल, जिल्हा परिषद-पनवेल तसेच पंचायत समीती पनवेल, मे सब रजिस्ट्रार साहेब पनवेल यांच्या स्थळ सीमेतील मौजे नारपोली, तालुका पनवेल जिल्हा-रायगड येथील वर्ग १ वहीवाटीची गट व उपविभाग क्र ३ क्षेत्रफळ ० हे-६६ आर-५० चौ.मी अधिक पोटखराबा ० हे -१३ आर-९० चौ.मी अशी एकुण क्षेत्रफळ ० हे ८० आर-४० चौ.मी आकार ९ रू-७५ पैसे या वर्णनाची जमीन की जिचे ७/१२ दप्तरीनुसार वर्णन खालीलप्रमाणे आहे-

**मौजे नारपोली तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| गाव | गट व उपविभाग क्र | क्षेत्र हे आर-चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| नारपोली | ३ | ०-६६-५०<br>अधिक<br>पो.ख.०-१३-९० | ९-७५ |
| | | ० हे-८० आर ४० पॉ | |

सही /-
**श्री. कालिदास सु. पोटे**
ॲडव्होकेट मुंबई उच्च न्यायालय
कार्यालय क्र.३०८ तिसरा मजला
बावा टॉवर, भुखंड क्र. ७८-७९, सेक्टर १७
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३
मो. नं. ९८३३५२५१५१

रायगड, रविवार, दि. ५ ऑक्टोबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## वेंगुर्ला समुद्रकिनारी आठ जण बुडाले

**सावंतवाडी :** वेंगुर्ला तालुक्यातील शिरोडा-वेळागर समुद्रकिनाऱ्यावर शुक्रवारी संध्याकाळी आठ पर्यटक बुडाले. या दुर्घटनेत एक जण बचावला असून तिघांचे मृतदेह मिळाले असल्याचे स्थानिक प्रशासनाने सांगितले. कुडाळा आणि बेळगाव येथील काही जण पर्यटनासाठी शिरोडा-वेळागर समुद्रकिनारी आले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने यापैकी आठ पर्यटक बुडाले. इसरा इमरान कित्तुर या तरुणीला वाचविण्यास यश आले. फरान कित्तुर, इबाद कित्तुर, नमिरा अक्तार यांचे मृतदेह बचाव पथकांच्या हाती आले आहेत. मात्र इरफान मोहम्मद इसाक कित्तुर, इक्वान इमरान कित्तुर, फरहान मोहम्मद मणियार, झाकिर निसार मणियार हे चौघेही अजूनही बेपत्ता असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पाकिस्तानमधून ड्रोनद्वारे तस्करी

**मुंबई :** पाकिस्तानमधून ड्रोनद्वारे अंमली पदार्थांची तस्करी होण्याच्या घटनेत झालेली वाढ चिंताजनक असल्याचे अंमली पदार्थ प्रतिबंधक विभागाच्या वार्षिक अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०२१ मध्ये अशा रीतीने तस्करीच्या फक्त तीन घटनांची नोंद झाली. मात्र २०२४ मध्ये अशा १७९ घटनांची नोंद झाल्याचे अहवालात म्हटले आहे. सुरक्षा यंत्रणांना २०२४ मध्ये २८३ तर ऑगस्ट २०२५ पर्यंत १३७ ड्रोन्स पाडण्यात यश आले आहे. प्रामुख्याने चीनी बनावटीचे अत्याधुनिक ड्रोन्सचा वापर पाकिस्तानातील तस्कर करीत आहेत. कमी उंची वापरुन जीपीएसच्या सहाय्याने मध्यरात्री ड्रोनमार्फत अंमली पदार्थांची तस्करी केली जाते. त्यामुळे ड्रोन्स रडारच्या कक्षेत येत नाहीत. या ड्रोन्समार्फत सुमारे नऊ किलोपर्यंत अंमली पदार्थांची तस्करी करता येते, असेही या अहवालात म्हटले आहे.

# स्थानिकांची भरती करा

- ...अन्यथा विमान उडू देणार नाही
- शेकाप सरचिटणिस जयंत पाटील यांचा सरकारला इशारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**नवी मुंबई विमानतळ उभारण्यात आले आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भरती केली जाणार आहेत. या भरतीमध्ये स्थानिकांना प्राधान्याने घेण्यासाठी नवी मुंबई विमानतळावर शेतकरी कामगार पक्ष व इतर पक्षाच्या वतीने विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. याबाबत बैठका घेण्यात आल्या असून आंदोलनाची दिशा लवकरच ठरविली जाणार आहे. विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव उद्घाटनाच्या दिवशीच जाहीर केल्यास समाधान राहील, अन्यथा विमान उडू देणार नाही, असा इशारा शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी दिला.**



अलिबागमधील शेतकरी भवन येथे वेगवेगळ्या आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्ते यांची बैठक शनिवारी (दि.४) घेण्यात आली. यावेळी जयंत पाटील बोलत होते.

यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, शेतकरी सभा तालुका अध्यक्ष अनिल गोमा पाटील, ॲड. विजय पेढवी, संजय पाटील आदींसह वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जेएनपीटी प्रकल्प उभारण्यात आला आहे. साडेबारा टक्के जमीन दिली जाणार असे आश्वासन देण्यात आले होते. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे जेएनपीच्या अनुभवानुसार, पोकळ आश्वासने आम्हाला नको, असे शेकाप नेते जयंत पाटील म्हणाले. पुढे त्यांनी सांगितले, नवी मुंबई विमानतळासाठी परिसरातील १२ हून अधिक गावे उठविण्यात आली आहेत. हजारो एकर जमीनी घेण्यात आल्या आहेत. प्रकल्पग्रस्तांसह स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार देणार या आश्वासनावर जमीनी देण्यात आल्या आहेत.

विमानतळाच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी येणार आहेत. या विमानतळावर हजारोंची भरती केली जाणार आहे. ८० टक्केहून अधिक भरती ही स्थानिकांची होणे गरजेचे आहे. नवी मुंबईसह पनवेल व जिल्ह्यामध्ये अनेक तरुण तरुणी उच्च शिक्षित आहेत. त्यांना विमानतळामध्ये नोकरी मिळावी पाहिजे ही शेकापची भूमिका आहे. याबाबत मनसे नेते राज ठाकरे यांच्या सोबत बैठक झाली.

शिवसेना (उबाठा) राष्ट्रवादी (शरद पवार गट), काँग्रेस आदी पक्षातील नेते मंडळींसोबत बैठक घेऊन आंदोलनाची भूमिका आणि दिशा ठरविली जाणार आहे. अलिबागमध्ये शेकाप भवनमध्ये शनिवारी बैठक घेण्यात आली आहे. पनवेल येथे होणाऱ्या बैठकीनंतर आंदोलन कशा पध्दतीने असणार आहे, हे ठरविले जाणार आहे. •›पान ६ वर

### खड्डेमय रस्त्यांविरोधात रस्ता रोको करणार

अलिबाग-पेण, अलिबाग रोहा, अलिबाग मुरूड मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. खड्डे बूजविण्यासाठी २२ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. काही दलाल टक्केवारी घेत आहेत. रस्त्यांच्या कामाबाबत मोठा भ्रष्टाचार झाल्याचे चित्र समोर आले आहे. सर्वसामान्यांचे प्रचंड हाल होत आहे. खड्डयांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. प्रशासन शासनाचे पूर्णतः दुर्लक्ष झाले आहे. लवकरच पक्षाच्या वतीने रास्ता रोको करण्यात येणार असून त्याची तयारी करा. कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागा, असे आवाहन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.

### पंचनामे तात्काळ करा

अतिवृष्टीमुळे रायगड जिल्हयासह अलिबाग तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. हातातोंडाशी आलेला घास गेल्याची चिंता निर्माण झाली आहे. मात्र अजूनपर्यंत नुकसानीचे पंचनामे केले जात नाहीत, अशी तक्रार शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्याकडे ग्रामस्थांनी केली. घटनेचे गांभीर्य ओळखून जयंत पाटील यांनी तहसीलदार विक्रम पाटील यांच्याशी संपर्क साधला. नुकसानीचे पंचनामे तात्काळ करा, अशी सुचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

## वे|ध|क

### दुचाकीच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**रेवदंडा :** रेवदंडा बाजूकडून मुरूडकडे जाणाऱ्या दुचाकीची धडक जैन मंदिरातून घरी पायी जात असलेल्या एका वयोवृध्द इसमाला बसली. या अपघातात रेवदंडा व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष व वयोवृध्द जैन व्यापारी पारसमल बाबूलाल जैन जबर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने रेवदंडा शहरात खळबळ उडाली. रेवदंडा येथून मुरूडच्या दिशेने सुसाट वेगाने होंडा शाईन कंपनीच्या दुचाकीने जात असताना मासेमारी व्यावसायिक २३ वर्षीय रत्नेश रामबाबू निशाद याने रेवदंडा बाजारपेठेत डॉ. अमर पाटील यांच्या दवाखान्या समोर पारसमल जैन यांना जोरदार ठोकर मारून अपघात केला. या अपघातात पारसमल बाबुलाल जैन गंभीररित्या जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

### पनवेलमध्ये अपघातात कामगाराचा मृत्यू

**पनवेल :** पनवेलजवळील जेएनपीटी रोडवरील पाडेघर येथील के. के. लॉजिस्टिक यार्डमध्ये दोन ट्रकच्या भीषण धडकेत एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातानंतर आरोपी ट्रकचालकाने पलायन केले असून, पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. शंकरलाल संतलाल यादव (वय ३६) असे मृत कामगाराचे नाव असून, तो उत्तर प्रदेशचा रहिवासी होता. तो दोन दिवसांपूर्वीच कामानिमित्त उरणमधील जासई येथील ट्रकचालक भाऊ धर्मेंद्र यादवकडे आला होता. धर्मेंद्र शुक्रवारी सकाळी ट्रक •›पान ६ वर

### भिवंडीत चिमुकलीची बलात्कार करून हत्या

**भिवंडी :** ठाणे जिल्ह्यातील भिवंडीत, एका ३३ वर्षीय पॉवरलूम कामगाराने त्याच्या शेजारी राहणाऱ्या सात वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून तिचा गळा दाबून खून केला. त्यानंतर त्याने मुलीचा मृतदेह एका पोत्यात भरला आणि पळून गेला. आरोपीने अशाच पद्धतीचा अवलंब करत २०२३ मध्येही एक बलात्कार आणि खून केला होता. त्याने भिवंडीमध्ये एका सहा वर्षांच्या मुलीवर क्रूरपणे हल्ला केला आणि नंतर तिची हत्या केली. त्या प्रकरणात तो तुरुंगात होता आणि दोन महिन्यांपूर्वी न्यायालयातून पळून गेला. घटनास्थळापासून दोन किलोमीटर अंतरावर पोलिसांनी त्याला १ ऑक्टोबर रोजी पुन्हा अटक केली.

## नागोठण्यातील असंख्य कार्यकर्ते शेकापमध्ये

### जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षप्रवेश सोहळा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन नागोठण्यातील असंख्य कार्यकर्ते शेकापमध्ये सामील झाले आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शेकाप भवन येथे छोटेखानी कार्यक्रमात हा पक्ष प्रवेश सोहळा शनिवारी (दि.४) पार पडला.



यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हसकर, रोहा तालुका चिटणीस शिवराम महाबळे, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य तुकाराम खांडेकर (गुरूजी), तालुका चिटणीस सदस्य राजू तेलंगे, तालुका महिला आघाडी सदस्य समिक्षा यादव, तालुका मच्छिमार संघटना सदस्य नजीर रहेमान मोहने, सामाजिक कार्यकर्ते नजीर रहेमान आदी उपस्थित होते.

शेतकरी, कष्टकरी, कामगार व तळागाळातील वंचित घटकाला न्याय देणारा पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्षाची ख्याती आहे. सर्वसामान्यांना केंद्रबिंदू ठेवून शेकाप काम करीत आहे. त्यामुळे आजही शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर तळागाळातील घटकांना विश्वास आहे. नागोठणेमधील अजगर सय्यद, आरीन शेख, •›पान ६ वर

## महायुतीत शिवसेना-राष्ट्रवादी आमने-सामने

### एकीकडे कार्यकर्ते हमरी-तुमरीवर, दुसरीकडे नेतेमंडळी एकत्र

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगडच्या पालकमंत्रिपदाचा वाद अद्यापही कायम असून मंत्री भरत गोगावले आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यात सातत्याने वाद पाहायला मिळतो. सुनील तटकरे यांनी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरुन अनेकदा भरत गोगावलेंना चिमटे काढले आहेत, तर जाहीर सभेत त्यांच्या मफलरची नक्कल करत खिल्लीही उडवली होती. त्यामळे, रायगडमधील हा वाद चिघळला असून दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते एकमेकांविरुद्ध हमुरी-तुमरीवर आल्याचं पाहायला मिळत आहे. त्यातच, महाडमध्ये शिवसेना पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीचे



कार्यकर्ते धनंजय देशमुख यांना गावात जाऊन दमबाजी केल्याने जिल्ह्यात राजकीय तणाव निर्माण झाला आहे. मात्र, दुसरीकडे पालकमंत्री आदिती तटकरे आणि भरत गोगावले एका कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र आल्याचंही दिसून आलं.

सुनील तटकरे यांनी दोन दिवसांपूर्वी एका कार्यक्रमात मंत्री भरत गोगावले यांना डावलून एकाकी कार्यक्रम केल्याने शिवसेना पदाधिकारी संतप्त झाले आहेत. शिवसेना नेते आणि मंत्री भरत गोगावले यांची वाढती क्रेझ पाहता तटकरे वैयक्तिक कार्यक्रम करू लागले आहेत. भरत गोगावले यांना सतत डावलण्याचं काम सुनील तटकरे यांच्याकडून होत असल्याचा आरोप शिवसेनेच्या प्रमोद घोसाळकर यांनी केला आहे. मंत्री भरत गोगावले यांना डावलण्याचा डाव सुनील तटकरे करत आहेत. मंत्री भरत गोगावले यांची वाढती क्रेझ पाहता तटकरे यांनी त्याचा धसका घेतल्यामुळे तटकरे हे वैयक्तिक भूमिपूजनाचा आणि इतर कार्यक्रम करत असल्याचा आरोप शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर आणि युवा सेनेचे जिल्हाप्रमुख विपुल घोसाळकर यांनी केला.

माणगाव आणि इंदापूर बायपास कामाचे भूमिपूजन सुनील तटकरे यांनी केल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे एकाकी हा कार्यक्रम केल्याचा आरोप शिवसैनिकांनी केला आहे. याशिवाय कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत देखील मंत्री भरत गोगावले यांना डावलले. त्यानंतर, संतापलेल्या शिवसैनिकांनी शनिवारी तटकरे यांच्याविरुद्ध संताप व्यक्त केला आहे.

रायगड जिल्ह्यात एकीकडे शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये राजकीय तणाव वाढला असताना, दुसरीकडे मंत्री भरत गोगावले आणि मंत्री आदिती तटकरे पुन्हा एकदा एकाच मंचावर •›पान ६ वर

## अलिबागमध्ये सापडला बनावट नोटांचा साठा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबागमध्ये लाखो रुपयांच्या बनावट नोटा शुक्रवारी सापडल्या एका ३५ वर्षीय सराईत गुन्हेगाराचा प्रताप अलिबाग पोलिसांनी उघड केला. त्याला पोलिसांनी अटक केली असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

रायगड जिल्हा हा पर्यटन व औद्योगिकीरणाच्या दृष्टीने महत्वाचा जिल्हा ठरत असताना जिल्ह्यातील बाजारात बनावट नोटांचा गोरखधंद्याला ऊत आल्याचे समोर आले आहे. महिन्याभरापूर्वी गोरेगावमधून बनावट नोटा जप्त करण्यात आल्या होत्या. आता अलिबाग शहरात हा गैरप्रकार उघड झाला आहे.

शहरातील मयेकरवाडीमध्ये एका व्यक्तीच्या घरात बनावट नोटांचा साठा असल्याची माहिती पोलीस निरीक्षक किशोर साळे यांना मिळाली. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. या पथकाने शुक्रवारी रात्रा साडेदहा ते अकरा वाजण्याच्या सुमारास भूषण पतंगे याच्या घरावर छापा टाकला. त्याच्या घरात पाचशेसह अन्य रुपयांच्या लाखो रुपयांच्या किंमतीच्या बनावट नोटा आणि बनावट नोटा तयार करण्याचे साहित्य दिसून आले. सर्व मुद्देमाल जप्त करून भूषणला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मित्राचा खून करून पसार झालेल्या आरोपीच्या सीमेवर मुसक्या आवळल्या

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

देवन्हावे गावात एका खोलीत राहणाऱ्या मित्राने मित्राचाच खून करून पसार झाल्याची घटना मागील महिन्यात घडली होती. फरार आरोपीला पकडण्यासाठी खोपोली पोलिसांनी चंग बांधून सुरत-अहमदाबाद असा पाठलाग करीत आरोपीला अखेर भारत नेपाळ सीमेवर अटक केले. त्याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास केला असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली.



गुन्ह्यातील मयत पारस सिंग याने आरोपीकडे हातउसने दिलेले ६ हजार रुपये परत मागितले म्हणून आरोपीने राग धरत डोक्यात दगडाने मारुन, गंभीर दुखापती करुन त्यास जीवे ठार मारले असल्याचे तपासात निष्पन्न झाले. खोपोली पोलिसांनी दबंग कामगिरी केल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

खालापूर तालुक्यातील देवन्हावे येथील सुशांत चौधरी यांच्या भाड्याच्या खोलीत आरोपी अख्तर हबीब बैठा (रा. वॉर्ड नं.३, गांव-पिरोखर, जि. मधुबनी, राज्य-बिहार) त्याचा मित्र मयत नामे पारस हरिहर सिंग (वय-५० वर्ष, रा.वॉर्ड नं. ३, खैरवा, पो. मणियारी, तहसील-डुमरा, जि.सितामढी, बिहार) यांच्यासोबत राहत होता. दोघांमध्ये अज्ञात कारणावरुन वाद झाला आणि आरोपीने पारस सिंग यांच्या डोक्यात मारुन जखमी केले. तसेच त्याच्यावर •›पान ६ वर

## अरबी समुद्रात शक्ती चक्रीवादळाची निर्मिती

### मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अरबी समुद्रात कमी दाब क्षेत्राची तीव्रता वाढून गुजरात आणि पाकिस्तानच्या किनाऱ्यालगत शक्ती चक्रीवादळाची निर्मिती झाली आहे. शक्ती हे २०२५ मधील पहिलेच चक्रीवादळ आहे. या वादळाची निर्मिती शुक्रवारी दुपारनंतर झाली. किनाऱ्यापासून पश्चिमेकडे सरकत असलेले हे चक्रीवादळ शनिवार, ४ ऑक्टोबर रोजी आणखी तीव्र होण्याचा अंदाज आहे.

बंगालच्या उपसागरातील तीव्र कमी दाब क्षेत्र मध्य भारताकडून प्रवास करीत अरबी समुद्राकडे आल्यानंतर ईशान्य अरबी समुद्रात त्याची तीव्रता वाढू लागली आहे.

### समुद्रात उंच लाटा उसळण्याची शक्यता

**गुजरात आणि उत्तर महाराष्ट्राच्या किनारपट्टीलगत ५ ऑक्टोबरपर्यंत ४५ ते ६५ किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची व समुद्र खवळून उंच लाटा उसळण्याची शक्यता असल्याने मासेमारीसाठी खोल समुद्रात जाऊ नये, असा इशारा देण्यात आला आहे.**

ही प्रणाली शुक्रवार, ३ ऑक्टोबर रोजी सकाळी गुजरातमधील द्वारकेपासून २५० किलोमीटर, तर नालियापासून २८० किलोमीटर नैऋत्येकडे , पोरबंदरपासून २८० किलोमीटर •›पान ६ वर

## गुटखा कारवाईत टपरीवाला बळीचा बकरा

### आमदारांच्या फोनवर दोघांना पोलिसांनी सोडल्याची चर्चा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग पोलिसांनी शनिवारी पहाटे गुटखा विक्रीवर छापा टाकला. यामध्ये तिघांना ताब्यात घेण्यात आले होते. मात्र आमदारांच्या फोननंतर अलिबाग पोलिसांनी अर्थपूर्ण सहकार्यातून दोघांची सुटका केली असून पान टपरीवाल्याविरोधात गुन्हा दाखल केल्याची चर्चा जोरात सुरू आहे. गुटखा कारवाईत पान टपरीवाल्याला बळीचा बकरा बनविण्यात आले आहे. त्यामुळे अलिबाग पोलीसांविरोधात पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार केली जाणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक किशोर साळे अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

आंचल दलाल यांनी पोलीस अधीक्षक म्हणून कारभार हाती घेतल्यावर जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करण्याची मोहीम हाती घेतली. जिल्ह्यातील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मटका जुगार व इतर अवैध धंदे बंद करण्यात यावे, अशी तंबी प्रभारी अधिकारी यांना देण्यात आल्या •›पान ६ वर

### गुटख्याचे धागेदोरे नागोठण्यात

- वाघोली येथील एक इसम नागोठणे येथून कल्पेश चौधरी आणि ओमप्रकाश मोदी यांच्याकडून गुटखा आणतो. त्यानंतर अलिबाग व इतर परिसरात तो गुटखा वितरीत करतो, असल्याची चर्चा सध्या सुरु आहे. नागोठणेमध्ये गुटखा विक्रीचे धागेदोरे असतानाही स्थानिक पोलीस याबाबत अनभिज्ञ का असा सवाल उपस्थित केला जात आहे. त्यामुळे नागोठणे पोलिसांच्या भूमिकेबाबत नाराजीचे सूर उमटत आहेत.

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांची माहिती | सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करणार

## डिसेंबरमध्ये उडणार पहिलं प्रवासी विमान

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी (दि.५) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन होणार आहे. पंतप्रधान मोदी मुंबईत येणार असून, दुपारी दोन वाजून ४० मिनिटांनी पंतप्रधान मोदी यांचे विमान नवी मुंबई विमानतळावर उतरणार असल्याची माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघलं यांनी दिली.

बेलापूर येथील सिडकोच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सिंघलं यांनी ही माहिती दिली असून, डिसेंबर महिन्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिले विमान उड्डाणं होणार असल्याची माहिती यावेळी दिली.



पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते रविवारी नवी मुंबई विमान तळाचे उदघाटन होणार असले तरी विमान तळावरून प्रवासी उड्डाणं सुरु होण्यासाठी डिसेंबर महिना उजाडणार आहे. उद्घाटन झाल्यावर केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडे विमान तळाचा ताबा देण्यात येणार आहे. सीआईएसएफकडून सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाय योजना करण्यात आल्या नंतरच पाहिलं विमान उड्डाणं होणार असून, या सर्व प्रक्रियेला ४५ दिवसांचा कालावधी लागणार असल्याने डिसेंबरमध्ये पहिले प्रवासी विमान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण घेणार आहे.

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटलांचे नाव कधी लागणार या पत्रकारांच्या प्रश्नाला विभागीय संचालक सिंगल यांनी बगल दिली असून याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी माहिती दिल्याचे सांगत प्रश्नाचे उत्तर देणे टाळले आहे.

बहुप्रतिक्षित नवी मुंबई विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. भारतातील सर्वात मोठ्या विमानतळापैकी एक असलेल्या या विमानतळाचा विकास तीन टप्प्यात केला जात आहे. पहिल्या टप्प्याच्या अखेरीस विमानतळाची क्षमता दरवर्षी सुमारे २० दशलक्ष प्रवाशांना हाताळण्याची असणार आहे. याशिवाय, तिसऱ्या टप्प्याच्या पूर्णतेनंतर, नवी मुंबई विमानतळ दरवर्षी सुमारे ९० दशलक्ष प्रवाशांना आणि २.५ दशलक्ष टन मालवाहतूक करण्यास सक्षम होणार असल्याची माहिती देताना पहिल्या टप्प्यात जवळपास १५ ते २० हजार कर्मचाऱ्यांना रोजगार उपलब्ध होणार असल्याची माहिती देण्यात आली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुमारे १ हजार १६० हेक्टर क्षेत्रात पसरलेले आहे.सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष सिंघल यांनी या विमानतळाची तुलना थेट लंडनच्या 'हीथ्रो' विमानतळाशी करून त्याच्या भव्यतेची ग्वाही दिली आहे. नवी मुंबईतील हे विमानतळ पहिल्यांदाच जलमार्गाने गेटवे ऑफ इंडिया किंवा इतर ठिकाणी प्रवाशांना घेऊन जाण्यासाठी जलजेट्टीशी जोडले जाईल, असे देखील सिंघल यांनी यावेळी स्पष्ट केले.

# निवडक

## पूरग्रस्तांसाठी २५ हजारांचा धनादेश



**पनवेल** : महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्ये पुराने थैमान घातले आहे. अनेक शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. त्यांना मदतीचा हात देण्यासाठी अनेक संघटना सरसावल्या आहेत. अशातच नवीन पनवेल येथील ओम साई कलावंत मित्र मंडळातर्फे पूरग्रस्तांसाठी २५ हजारांचा धनादेश देण्यात आला आहे. पनवेलचे उपविभागीय अधिकारी तथा प्रांत अधिकारी पवन चांडक यांना ओम साई कलावंत मित्र मंडळ तर्फे पूरग्रस्तांसाठी २५ हजारांचा धनादेश देण्यात आला. यावेळी मंडळाचे सल्लागार व पनवेलचे माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, मंडळाचे अध्यक्ष हेमंत पुजारा व कार्याध्यक्ष नितीन चोरघे आदी उपस्थित होते.

## धावीर देव पालखी सोहळ्याची सांगता



**रोहा** : रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांची शुक्रवारी (दि.३) पहाटे सुरू झालेल्या पालखी सोहळ्याची सांगता दुसऱ्या दिवशी शनिवारी (दि.४) दुपार नंतर झाली. धावीर देव पालखीने शहरात फिरून रोहेकरांना दर्शन देत गावामध्ये बंधुभेटी करीत ३० तासांनंतर पुन्हा मंदिरात परतले. यावेळी रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील व पथकाने महाराजांना पुन्हा सशस्त्र मानवंदना दिली. उत्सवात सेवेकरी तरुणांनी अथक, अखंडित आणि अविश्रांत परिश्रम घेतले. जवळपास ३२ तास चाललेल्या या पालखी सोहळ्यासाठी ट्रस्टचे प्रमुख पदाधिकाऱ्यांसह उत्सव समितीचे अध्यक्ष कुमार पाशिलकर, कार्यवाह दर्शन कदम, उपाध्यक्ष सागर कोलटकर, सचिन पाशिलकर, सहकार्यवाह नागेश पाटणकर, ओंकार गुरव, खजिनदार सूरज राऊत, सहखजिनदार ओमकार काफरे आदींनी परिश्रम घेतले.




## ट्रिनिटी परीक्षेत पीएनपीचे यश

**अलिबाग** : पीएनपी वायएमपी स्कूल सांबरी-कुर्डुस येथील विद्यार्थ्यांनी लंडन कॉलेज तर्फे आयोजित केलेल्या ट्रिनिटी परीक्षेमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग घेतला होता. ही परिक्षा २५ सप्टेंबर रोजी पार पडली असून या परीक्षेत १०० टक्के निकाल लागला आहे. या स्पर्धेमध्ये इयत्ता दुसरीतील गार्गी पिंगळे, इयत्ता तिसरीतील मुक्ती पाटील, कार्तिक पाटील, वेदांश शेळके, प्रित पाटील, दिशांत पाटील व इयत्ता पाचवीतील आरव पाटील या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. ही परीक्षा चांगले संवाद कौशल्ये, इंग्रजीमध्ये अस्खलितता, आत्मविश्वास आणि सर्जनशीलता विकसित करण्यास मदत करते. ही कौशल्ये केवळ शैक्षणिक कामगिरी वाढवत नाहीत तर या माध्यमातून भविष्यातील जागतिक संधींसाठी विद्यार्थ्यांना तयार केले जाते. या यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, पीएनपी वायएमपी शाळेच्या मुख्याध्यापिका मेधा दुबे आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन केले आणि इतरांना अशा कौशल्य-वर्धक स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.



## पोलीस आयुक्तालयाचे उद्‌घाटन

**पनवेल** : नवी मुंबईतील खारघर विभागातील सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयाचे उद्‌घाटन शुक्रवारी (दि.३) पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांच्या हस्ते करण्यात आले. नवी मुंबई पोलीस आयुक्तालया अंतर्गते नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात पोलीस उपायुक्त, परिमंडळ १ व २ यांची पुनर्रचना करुन पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ वाशी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ बेलापूर व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ पनवेल असे तीन परिमंडळ निर्माण करण्यात आलेले आहेत. तसेच, परिमंडळ ३ मध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त खारघर विभाग हे पद नव्याने निर्माण करण्यात आलेले आहे. खारघर विभागाअंतर्गत खारघर, कामोठे, कळंबोली व तळोजा अशी ४ पोलीस स्टेशनची हद्द निश्चित करण्यात आलेली आहे. खारघर विभागाचा कार्यभार सहायक पोलीस आयुक्त विक्रम कदम यांनी ०१ ऑगस्ट रोजी स्विकारला आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● आमच्या मालकीचे दोन मजली इमारतीमधील पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरचे रूम आणि खालील तळमजल्यावरचे दुकान गाळे भाड्याने द्यायचे आहेत, इच्छुकांनी संपर्क साधावा.
मो. ८६९८२३१५६७ गुरव मॅडम.

● नोकरीची संधी - सफाई कर्मचारी (बर्गर्स आणि बूच, रांजणपाडा, अलिबाग) आमच्या टीममध्ये सामील होण्यासाठी आम्ही एक मेहनती आणि प्रामाणिक व्यक्ती शोधत आहोत. तपशील: पगार: ₹१३,०००/ महिना+ टिप्स/सेवा (७%) राहण्याची व्यवस्था आणि जेवण साप्ताहिक सुट्टी : मंगळवार कामाचे तास : दुपारी १२ ते रात्री ११ (दररोज किमान २ तासांच्या ब्रेकसह) व्हाट्सअ‍ॅपवर कॉल करा : ७५०६९५४६११/ ९९३०६३४००३

● खुद्द अलिबागमध्ये २ बेड हॉल किचन फ्लॅट भाडेतत्त्वावर द्यावयाचा आहे. भाडे ₹ २०,००० डिपॉझिट ₹ ६०,०००. एजंट क्षमस्व फोन नंबर ९८६९४५९०६३.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन लवकरच

## ● केंद्र सरकारचे राज्य सरकारला निर्देश ● जेएनपीएमध्ये बैठक संपन्न

**। उरण । प्रतिनिधी ।**

शेवा कोळीवाडा सामाजिक ग्रामविकास मंडळ व ग्रामस्थांच्यावतीने विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी गुरूवारी (दि.२) जेएनपीटी लगत असलेल्या समुद्रातील चॅनेल बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच, गेली ४० वर्षे पुनर्वसन न झाल्याने व जेएनपीटी प्रशासनाने ग्रामस्थांना विविध सेवा सुविधांपासून वंचित ठेवल्याने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका देखील दाखल करण्यात आली होती. याच पार्श्वभूमीवर जेएनपीटी प्रशासन व शेवा कोळीवाडा ग्राम स्थ यांच्यामध्ये २९ सप्टेंबर रोजी जेएनपीटी प्रशासन भवन येथे एक महत्त्वाची बैठक संपन्न झाली. त्यात केंद्र सरकार व जेएनपीटी प्रशासनातर्फे



जुना शेवा कोळीवाडा ग्रामस्थांचे पुनर्वसनाचे व नागरी सेवा सुविधांचे प्रश्न लवकरच सोडविण्यात येणार असल्याची माहिती जेएनपीएच्या अध्यक्षांनी ग्रामस्थांना दिली.

केंद्र सरकारकडून १६ सप्टेंबर रोजी शेवा कोळीवाडा गावाच्या पुनर्वसनासाठी मंजूर केलेली जेएनपीटी टाउनशीपला लागून असलेली जमीन महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांना हस्तांतर केलेली आहे. असे असतानाही पुनर्वसनाची फाईल राज्य सरकारकडून पुढे सरकत नव्हती. त्यामुळे शेवा कोळीवाडा सामाजिक ग्रामविकास मंडळ व ग्रामस्थांच्यावतीने विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी गुरूवारी (दि.२) जेएनपीटी लगत असलेल्या समुद्रातील जहाजांचे मार्ग बंद करून बेमुदत चॅनेल बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच, गेली ४० वर्षे पुनर्वसन न झाल्याने व जेएनपीटी प्रशासनाने ग्रामस्थांना विविध सेवा सुविधांपासून वंचित ठेवल्याने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका देखील दाखल करण्यात आली होती. दरम्यान, जेएनपीटी प्रशासन व शेवा कोळीवाडा ग्रामस्थ यांच्यामध्ये २९ सप्टेंबर रोजी जेएनपीटी प्रशासन भवन येथे एक महत्त्वाची बैठक संपन्न झाली. त्यात केंद्र सरकार व जेएनपीटी प्रशासनातर्फे जुना शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा) ग्रामस्थांचे नवीन गावठणात शासनाच्या मापदंडाने पुनर्वसनाचे व नागरी सेवा सुविधांचे प्रश्न लवकरच सोडविण्यात येणार असल्याची माहिती जेएनपीएच्या अध्यक्षांनी ग्रामस्थांना दिली. या बैठकीत ग्रामस्थांनी हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायत कायमची बंद करण्याचा विषय उपजिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे मांडल्यानंतर त्यावर योग्य निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे जुना शेवा कोळीवाडा ग्रामस्थांतर्फे आयोजित करण्यात आलेले बेमुदत समुद्र चॅनेल बंद आंदोलन तूर्तास पुढे ढकलले असल्याची माहिती स्मॉल स्केल ट्रेडिशनल फिश वर्कर्स यूनियनचे जनरल सेक्रेटरी रमेश कोळी यांनी दिली.

या बैठकीत जेएनपीए अध्यक्ष उन्मेष वाघ, महाव्यवस्थापक प्रशासन व सचिव मनिषा जाधव, उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, तहसीलदार उद्धव कदम, गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील, एमआयडीसी उपअभियंता सोनवणे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

### डिसेंबरपर्यंत पुनर्वसनाचा निर्णय देणार

सोमवार दि.४ ऑक्टोबरच्या आदेशात डिसेंबरपर्यंत केंद्र शासन शेवा कोळीवाडा गावाच्या पुनर्वसनाचा योग्य निर्णय देईल आणि त्यानंतर शेवा कोळीवाडा गावाचे पुनर्वसन करणार असल्याचे केंद्र शासनाचे वकिल डी. पी. सिंह यांनी उच्च न्यायालय मुंबई यांना सांगितले आहे. उच्च न्यायालय मुंबई यांनी वकिल डी. पी. सिंह यांना दिनांक २२ डिसेंबरपर्यंत त्यांचे म्हणणे कोर्टाला प्रतिज्ञापत्रात सादर करण्याचा आदेश दिलेला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून १६ सप्टेंबर रोजी शेवा कोळीवाडा गावाच्या पुनर्वसनासाठी मंजूर केलेली जेएनपीटी टाउनशीपला लागून असलेली जमीन केंद्र शासनाने मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना हस्तांतर केलेली आहे.

# खैर तस्करीचा पर्दाफाश

**१० लाखांचा मुद्देमाल जप्त**

**। वावोशी । प्रतिनिधी ।**

खालापूर वनपरिक्षेत्र अंतर्गत परिमंडळ चिलठण, नियतक्षेत्र सांगडे येथील राखीव वनातील मौल्यवान खैर प्रजातीच्या झाडांची बेकायदेशीर तोड व तस्करी करण्याचा प्रयत्न वन विभागाने उधळून लावला आहे. खात्रीशीर माहितीच्या आधारे वनअधिकाऱ्यांनी रात्रभर दबा धरून बसत शुक्रवारी (दि.३) पहाटेच्या सुमारास ही धाडसी कारवाई केली आहे.

या कारवाईत मारुती सुझुकी इको (एमएच-४६-सीएम-५१९१) वाहनातून खैरचे तब्बल ४० ओंडके जप्त करण्यात आले. तसेच, वाहनातून लोखंडी



रॉड, लाकडी दांडके, हल्ल्यासाठी वापरली जाणारी मिरची पावडरही सापडली आहे. कारवाई दरम्यान आरोपी मात्र अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले असून त्यांची नावे उघडकीस आली आहेत. यावेळी वन विभागाने एकूण १० लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून त्यात वाहन, मोबाईल व अन्य साहित्यांचा समावेश आहे.

ही कारवाई उपवनसंरक्षक राहुल पाटील व सहाय्यक उपवनसंरक्षक सागर माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या तपासादरम्यान राजेंद्र पवार, संजय पगारे, भगवान दळवी, नितीन कांबळे, पांडुरंग गायकवाड, अंकुश केंद्रे, सागर टोकरेकोळी, प्रथमेश देवरे, कैलास कांबळे हे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नियमबाह्य नियुक्त्या

**पनवेलः** महानगरपालिकेच्या आस्थापना विभागामार्फत सेवाप्रवेश नियम धाब्यावर बसवून नियमबाह्य पद्धतीने अनेक प्रमुखपदांवर नेमणूक केल्याचा आरोप करून बुधवारी प्रहार जनशक्ती पक्षाने याबाबत चौकशीची मागणी केली आहे. सेवा प्रवेश नियम डावलून मर्जीतील अधिकाऱ्यांना नियमबाह्य पद्धतीने 'प्रभारी' या नावाखाली महत्त्वाचे व जबाबदारीचे असलेले प्रभाग सहायक आयुक्त आणि अधीक्षक या पदांवर नियुक्त्या केल्याचा आरोप प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील शिरसकर यांनी केला आहे. याबाबत आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले आहे.

## इस्कॉन कंपनीतील चोरी उघडकीस

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी येथील कराडे गावात असलेल्या अतिरिक्त एम आयडीसीतील इस्कॉन कंपनीमध्ये २० मार्च रोजी चोरीची घटना घडली होती. चोरट्यांनी कंपनीच्या आवारात घुसून ५३ हजार ५०० रुपये किमतीची वायर व पाईप चोरी केले होते. त्याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात चोरीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. चोरीला गेलेला माल व आरोपींना ताब्यात घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली होती. जवळपास सहा ते सात महिने उलटून गेल्यानंतर या तपासाची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना प्राप्त झाली. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने चोरीतील विधी संघर्षित बालकांना ताब्यात घेतले. त्यांनी इस्कॉन कंपनीत चोरी केली असल्याची कबुली त्यांच्या पालकांच्या समक्ष दिली. चोरी करणारे चोर हे अल्पवयीन (विधी संघर्षित) बालक असून त्यांना शुक्रवारी (दि.३) ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी रसायनी पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे. हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस उप निरीक्षक लिंगप्पा सरगर, सहाय्यक फौजदार संदीप पाटील, प्रसाद पाटील, पोलीस हवालदार सुधीर मोरे, रवींद्र मुंडे यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली.

# विद्यार्थ्यांचा जंक फूड विरोधी नारा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आजकाल जंक फूड खाणे म्हणजे 'स्टेटस सिम्बॉल' होत चालले आहे. विशेषत: शालेय विद्यार्थी आणि तरुणांमध्ये फास्ट फूडची विशेष क्रेझ आहे. बर्गर, पिझ्झा, पास्ता, फ्रेंच फ्राइज, केक, हॉट डॉग, डोनट्स आणि चायनीज हे शब्द सगळ्यांच्याच घरी एखादी पार्टी असेल तर ठरलेले असतात. त्यात पालकांकडून आणि मित्रमंडळींतून या सगळ्या पदार्थांचे स्वागतच होत असते. मात्र, त्याचे शरीरावर दुष्परिणाम होतात. या पार्श्वभूमीवर नवीन पनवेल येथे के. आ. बांठिया विद्यालय व इन्स्टिट्यूट ऑफ योग आयुर्वेद आरोग्य सेवा समिती यांच्यावतीने शनिवारी प्रभात फेरी काढण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी जंक फूड विरोधात नारा देत जनजागृती केली.

बाहेरचे खाद्यपदार्थ आपल्या आरोग्यासाठी हानिकारक आहेत. हा विचारही आपल्या डोक्यात कधी येत नाही. कारण जंक फूड खाताना जिभेचे चोचले पुरविले जातात. कालांतराने या जंक फूड हे आरोग्याला खूप हानिकारक असते. जंक फूडच्या वाढत्या सेवनामुळे होणाऱ्या आरोग्याच्या दुष्परिणामांबद्दल जनजागृती करण्यासाठी आणि निरोगी अन्न निवडींना प्रोत्साहन देण्यासाठी जंक फूडविरोधात नवीन पनवेल येथे के.आ. बांठिया माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचे प्राचार्य बी एस माळी यांच्या संकल्पनेतून रॅली काढण्यात आली होती. या रॅलींद्वारे पनवेलकरांना जंक फूडमध्ये असलेले जास्त साखर, मीठ, चरबी आणि कमी पोषक तत्वांचे तोटे घोषवाक्याच्या माध्यमातून समजून सांगण्यात आले. लठ्ठपणा, हृदयरोग, मधुमेह, कर्करोग, यकृत आणि मूत्रपिंडाचे



नुकसान, कमी स्मरणशक्ती आणि एकाग्रतेचा अभाव, पचनाच्या समस्या, हाडांची कमकुवतता हे हानिकारक परिणाम होतात. याची जाणीव खूप उशिरा होते. रोग होण्याच्या अगोदरच त्याबाबत खबरदारी घेण्याचा संदेश बांठिया हायस्कूलच्या प्रभात फेरीतून विद्यार्थी, पालक आणि नागरिकांना देण्यात आला. ढोल, लेझीमच्या तालावर जंक फूड विरोधात नारे देताना शालेय मुला-मुलींनी संपूर्ण नवीन पनवेल दणाणून सोडले. या माध्यमातून शाळेने इतरांसमोर एक आदर्श वस्तूपाठ ठेवत जंक फूड या आरोग्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले.

## पथनाट्याद्वारे जनजागृती

**कर्जत** : सतत वाढत चाललेल्या स्कॅम कॉल्सच्या धोक्याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने यंग क्रिएटिव्ह प्रॉडक्शन आणि बँक ऑफ बडोदा यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जतमध्ये पथनाट्य आयोजित करण्यात आले होते. हे पथनाट्य लोकमान्य टिळक चौकामध्ये सादर करण्यात आले. या पथनाट्यात स्वतःला बँकेचे अधिकारी म्हणून ओळख करून देणारे फसवे लोक नागरिकांना कशाप्रकारे जाळ्यात ओढतात याचे चित्रण करण्यात आले.

## चारफाट्यावर लवकरच सिग्नल यंत्रणा

**नेरळ** : कर्जतमध्ये प्रवेश करण्यासाठी महत्वाचे चौक असलेल्या कर्जत चारफाटा येथे दररोज वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अनेक उपाययोजना पोलिसांनी केल्या आहेत; मात्र, वाहतूक कोंडी कमी करण्यात यश आले नाही. त्यामुळे आता कर्जत पोलिसांनी चारफाटा येथे सिग्नल यंत्रणेचा वापर केला जाणार आहे. कर्जत शहर बचाव समितीकडून अनेक महिने ही मागणी करण्यात येत होती. त्यांच्या या मागणीला यश आले असून सिग्नल यंत्रणा बसण्याचे कार्य अंतिम टप्प्यात आले आहे.

# परतीच्या पावसामुळे बळीराजा चिंताग्रस्त

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

गेले अनेक दिवस परतीचा पाउस शेतकऱ्यांच्या मुळावर उठल्यामुळे तालुक्यातील भात शेतीचे प्रचंड नुकसान होत आहे. भाताच्या लोंब्यामध्ये दाणा तयार होण्याच्या मार्गावर असल्यामुळे त्यातच सायंकाळी पावसाची जोरदार बॅटींग आणी सोसाट्याचा वारा यामुळे भात शेती पडत आहे. मात्र, परतीचा पाऊस सायंकाळी येत असल्यामुळे हीच स्थिती सातत्याने राहिली तर हातामध्ये हवे तेवढे धान्य मिळणार नाही, आशी भिती शेतकरी वर्ग व्यक्त करीत आहेत.

भात शेती कापण्यायोग्य होण्यास काही दिवसांचा विलंब



असून परतीच्या पावसाच्या भीतीने फक्त भात शेतीचे होत असलेले नुकसान पाहण्याच्या पलीकडे दुसरा पर्याय नसल्यामुळे शेतकरी हवाळदिन झाला आहे. तालुक्यातील असलेली भात शेती अनेक ठिकाणी ओस पडत चालली आहे. त्यंचे कारण म्हणजे मातीत टाकलेला पैसा वसूल होत नाही. शिवाय हातामध्ये हवे तेवढे धान्य मिळत नाही. तसेच, अस्मानी संकटाचा दर वर्षी शेतकरी वर्गास सामना करावा लागत असल्यामुळे भात शेती अल्प होत आहे. मात्र, असे असले तरी सुद्धा तालुक्यात गेल्या काही वर्षात तुरळक स्वरूपात भात लागवड करण्यास वाढ झाली आहे. मात्र, परतीच्या पावसाची दहशत आजही बळीराजास चिंताग्रस्त करून ठेवत आहे.

## लुटारू तोतया पोलिसाला अटक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पोलीस असल्याचे सांगत सोने आणि रोख रक्कम असे एकूण ३४ लाख २८ हजारांचा मुद्देमाल लुटणाऱ्या सहा जणांना पनवेल शहर पोलिसांनी बुधवारी (दि.१) अटक केली आहे. सागर पाटील, सुधाकर पाटील, भकाजी पाटील (सर्व कोल्हापूर), केतन सुरवसे, सुनील शिंदे व श्रीधर घाडगे (सर्व सांगली) अशी त्यांची नावे आहेत. करंजाडे येथील विराज शिरकांडे हे आपल्या सहकाऱ्यांसोबत कारने २६ सप्टेंबर रोजी मुंबईवरून करंजाडे येथे परतत होते. करंजाडे रेल्वे फाटकाजवळ रात्री सव्वा अकराच्या सुमारास चॉकलेटी रंगाच्या एर्टिगा कारसह थांबलेल्या व्यक्तींना आपण पोलीस असल्याचा बहाणा केला आणि कार अडवली. यावेळी अटल सेतूवरून १२० च्या स्पीडवरून येऊन गाडी थांबवण्यासाठी हात केला, मात्र तुम्ही गाडी का थांबवली नाही, असे बोलून त्यांनी चौघांना फायबर काठीने मारहाण केली. त्यानंतर तोतया पोलिसांनी त्यांना त्यांच्याजवळ असलेल्या सामानासह आपल्या गाडीत बसविले. आणि अटल सेतूकडे जाणाऱ्या रस्त्याने घेऊन जाऊन त्यांना गाडीत शिवीगाळ आणि मारहाण करून त्यांच्याकडील मोबाईल फोन, घड्याळ, रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतले. त्यानंतर त्यांना निर्मनुष्य ठिकाणी सोडून दिले.

**रोह्यात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन संपन्न | प्रांत अधिकारी खुटवड यांची ग्वाही**

# निराधार वृद्धांना निर्वाह भत्ता मिळवून देणार

**। रोहा । प्रतिनिधी ।**

ज्यांचे आई-वडील वृद्ध झाले असतील व मुले त्यांची देखभाल व पालन पोषण करत नसतील त्यांना मी त्वरित प्रत्येकी १० हजार रुपये निर्वाह भत्ता मिळवून देणार, अशी ग्वाही रोह्याचे उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी दिली आहे. जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाच्या निमित्ताने बुधवारी (दि.१) रोह्यातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

पुढे ते पुढे म्हणाले की, स्वतः ची मिळकत मुलांच्या नावावर



करण्याची घाई करू नका. जरी आज संबंध चांगले असले तरी शक्यतो आपल्या मिळकतीचे मृत्युपत्र नोंदीकृत करा, असे सांगत ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या व आरोग्य विषयक त्यांना मदत मिळावी यासाठी आपण शिबीर आयोजित करू. मला आज तुमच्याकडे पाहताना माझ्या आई-वडिलांची आठवण आली, असेही प्रांत अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड म्हणाले.

यावेळी संघटना अध्यक्ष पांडुरंग सरफळे, पोलीस निरीक्षक मारुती पाटील, उपाध्यक्ष गायकवाड, सचिव सुरेश मोरे, खजिनदार प्रकाश पाटील, चंद्रशेखर गुंड, मंगेश जोशी, नंदकुमार भादेकर, संजीवनी कडवेकर, अक्षदा साखळकर, अनुराधा धुमाळ आदी उपस्थित होते. यावेळी वयाची ८० वर्षे पूर्ण झालेले डॉ. श्रीनिवास वेदक, महमद डबीर, प्रमोदीनी शिंदे, गुणाजी राजीवले, प्रवीण शाहा, युसूफ रोहावाला अशा अनेक ज्येष्ठ नागरिकांना तसेच रुपेश कर्णेकर व बिलाल मोरबेकर यांना गौरविण्यात आले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक मारुती पाटील म्हणाले की, ज्येष्ठ नागरिक म्हणजे संयम, अनुभव, मार्गदर्शन व चांगले-वाईटचे ज्ञान भांडार आहे. समोर ज्येष्ठ नागरिकांमध्ये माझे आईवडील दिसतात. ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी चांगले कायदे आहेत. आपण आपल्या आई-वडिलांना देवता सारखे माना. सध्याची पिढी मोबाईलमध्ये दंग असते. त्यामुळे पिढी भरकट चालली आहे. मात्र, माझ्या पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक जेष्ठ नागरिकांचा सन्मान केला जाईल, असे वक्तव्य पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी केले.

> "१ ऑक्टोबर हा जागतिक वृद्ध दिन जगभर साजरा केला जातो. वृद्ध व्यक्तींना वाढत्या वयोमनामुळे जीवन जगताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ज्येष्ठ नागरिकांना सूरक्षित व सन्मानाने जगता यावे म्हणून केंद्र सरकारने १९९९ साली धोरण जाहीर केले आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक राज्यांनी त्यांचा वार्षिक अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करावी. आर्थिक तरतूद नसल्याने वृद्धांना अनेक सवलतींपासून वंचित राहावे लागत आहे."
>
> – पांडुरंग सरफळे, अध्यक्ष, जेष्ठ नागरिक मंडळ

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### ५ ऑक्टोबर

१) श्री. अनंत श्रीधर पंडित
अलिबाग, ५-१०-१९३७
२) श्री. विनोद लक्ष्मण नाईक,
अलिबाग, ५-१०-१९४७
३) श्री. दत्तात्रेय काशिनाथ पाटील
अलिबाग, ५-१०-१९४५
४) श्री. यशवंत नारायण थळे
खंडाळा, अलिबाग, ५-१०-१९४५
५) श्री. भगवतीईश्वरन रामस्वामी अय्यर
अलिबाग, ५-१०-१९५५

## बोधकथा

### उपासना

एका कॉलेज विद्यार्थीनीस एका सत्पुरुषांनी साधना दिली होती. रोज सकाळी नित्यनियमाने आंघोळ केल्यानंतर पाच मिनिटाची उपासना होती. एक महिन्याच्या साधनेनंतर त्या विद्यार्थिनी नी सत्पुरुष यांची भेट घेऊन त्याला सांगितले. मी घरी असल्यावर रोज साधना करीन परंतु मी दुसरीकडे कुठे राहण्यास गेल्यानंतर काय करू?

**सद्गुरु–** तू कुठेही राहण्यासाठी गेली असशील तरीदेखील उपासना नित्य करायचीच

**विद्यार्थिनी–** मला प्रदर्शन करणे आवडत नाही.

**सद्गुरु–** हा आपण पांघरलेला एक बुरखा आहे.
हा आपला शिष्टपणा आहे.
तुला सद्गुरु वर आणि उपासनेवर विश्वास आहे
असे म्हणवून घेण्याची लाज वाटते हे खरे.
तुझ्या सर्व मैत्रिणींना तू नामस्मरण करतेस
आणि तुझी त्या साधनेवर श्रद्धा आहे
हे सांगण्याची लाज वाटते
उपासना करणे ही एक प्रतिष्ठेची बाब वाटली पाहिजे.

**सद्गुरु स्वामी बोध**
आपण प्रभू प्रेमातून नामस्मरण करीत नाही
प्रभूची सत्ता आणि कृपाळू पणा जर आपणास समजला
तर आपल्या मनात प्रभू विषयी प्रेम व आदर निर्माण होईल
म्हणून भगवान श्री ज्ञानदेव म्हणतात,
प्रभू लीला ज्यात वर्णन केल्या आहेत असे ग्रंथ वाचावे
आणि हरिनामात स्थिर व्हावे. साधनेमध्ये ठराविक
वेळ आणि सातत्य दोन्ही महत्त्वाच्या बाबी आहेत.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## मधुकर हरी कोलेटकर यांचे निधन

**। भाकरवड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील ताडवागळे गावचे रहिवासी मधुकर हरी पाटील यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी रविवारी दि. २८ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर



उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी मेघा कोलेटकर, मुलगा विवेक, मुलगी शामला, उज्वला, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य मंगळवार दि. ७ ऑक्टोबर रोजी ओंकारेश्वर मंदिर पेझारी येथे, तर बारावे गुरुवार दि.११ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी होणार आहेत.

# बळीराजाचे डोळे पाणावले

## • परतीच्या पावसामुळे भातपिकांचे नुकसान; पंचनामे करण्याची मागणी

**। कोलाड । प्रतिनिधी ।**



सतत पडत असलेल्या परतीच्या पावसामुळे रोहा तालुक्यातील कोलाड खांब परिसरातील उभी असणारी भातपिके आडवी झाली आहेत. यामुळे बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे बळीराजा पूर्णपणे संकटात सापडला आहे. तर पिकांची अशी परिस्थिती पाहून बळीराजाच्या डोळ्यात पाणी आले आहे.

दसरा झाल्यानंतर भात कापणीला सुरुवात केली जाते. परंतु, चार महिने पडणारा पाऊस हा यावर्षी सहावा महिना उजाडला तरी थांबण्याचे नाव घेत नाही. यामुळे कापणीला आलेली भातपिकेही जमीनदोस्त झाली आहेत. एकेकाळी असणारा कुलाबा जिल्हा आताचा असणारा रायगड जिल्हा हा भाताचे कोठार म्हणून ओळख असणाऱ्या जिल्ह्यात सततच्या पावसामुळे हातातोंडांशी आलेल्या धानाचे नुकसान होत आहे. त्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला आहे.

रोहा तालुक्यातील पुगांव, मुठवली, शिरवली, खांब, तसेच इतर काही भागात मागील उन्हाळी लागवडीतील शेती मे महिन्यात पडलेल्या पावसाने भातशेतीत पाणी साचून भातशेतीचे मोठे नुकसान झाले. काही उभी असलेली भात पिके कुजून गेली, तर काही शेतकऱ्यांनी कापणी केलेली पिके जमिनीवर लोळत वाहून त्या धानाची नासाडी झाली. त्याचे तात्काल पंचनामेदेखील वरीष्ठ पातळीवरून करण्यात आले. शेताचे पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रशासनाने दिलासा दिला. मात्र, त्याची नुकसान भरपाई अद्याप मिळालेली नाही.

> “आधुनिक काळात रासायनिक खते, नांगरणी, भात लागवडीचा खर्च वाढला असूनही याला न जुमनता शेतकरी वर्ग भातशेती करत असतो. परंतु, निसर्गाच्या कोपामुळे उभी असणारी भातपिके आडवे झाली आहेत. यामुळे भात शेतीत पाणी साचून राहत असल्याने भाताला आलेले धान कुजायला लागले आहे. यामुळे प्रशासनाने ओला दुष्काळ जाहीर करून पीक नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी.
> – महादेव जाधव, शेतकरी, गोवे”



## म्हसळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवकांचे संचलन

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने विजयादशमीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने संघ स्वयंसेवकांकडून संचलन तसेच शस्त्रपूजन करण्यात आले. १९२५ साली विजयादशमीच्या दिवशी डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी हिंदू समाजाचे संघटन करून राष्ट्राला परमवैभवाप्रत नेण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली होती. यास १०० वर्ष पूर्ण झाली असून संघ शताब्दी वर्षाच्या निर्मित्ताने धावीर मंदिर पटांगण येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते विलास यादव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी संघशताब्दी पर्वात पर्यावरण, समरसता, कुटुंब प्रबोधन, नागरी कर्तव्य आणि स्वबोध या पाच महत्त्वाच्या बिंदूंच्या आधारावर सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी सर्व स्वयंसेवक कटिबद्ध आहे. तसेच, विजयादशमीचा उत्सव आणि संचलन यातून संघाचे एक आश्वासक, कल्याणकारी आणि सज्जनशक्तीचे रूप समाजासमोर येते, असे मत व्यक्त केले.

## धोत्रे मित्र मंडळाकडून महाप्रसाद सेवा



**। रोहा । प्रतिनिधी ।**

अखंड रायगडवासियांचे श्रद्धास्थान, रोहेकरांचे ग्रामदैवत पालखी सोहळा हा प्रथा परंपरा पाळत साजरा होत असतो. रोह्यातील प्रत्येक घराणे, समाज यांना पालखी काळात असलेला मान सन्मान राखत देवळातून पालखी प्रस्थान होते. या सोहळ्यात अशोक धोत्रे मित्र मंडळाची महाप्रसाद सेवाही एका परंपरेकडे वाटचाल करत आहे. अंत्यत भक्तिमय व शिस्तमय पद्धतीने हा महाप्रसाद देण्यात येतो.

२५ वर्षांपूर्वी भाटे सार्वजनिक वाचनालय सभागृह या शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पालखीच्या वेळी बाहेर गावाहून बंदोबस्ताकरता आलेले पोलीस, बेंजो, ढोल ताशे पथक, पालखी सेवेकरी यांच्यासाठी सुरु केलेली ही सेवा आता महाराजांचा महाप्रसाद म्हणून ओळखली जाते. मात्र आजवर जो येईल त्याला दोन घास देण्यात धावीर महाराजांचे आशीर्वादाने देण्यात कधीही खंड पडला नाही.

## श्रीवर्धनमध्ये सीमोल्लंघन कार्यक्रम

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

विजयादशमीनिमित्त ठिकठिकाणी विविध पद्धतींनी सीमोल्लंघन कार्यक्रम होत असतात. श्रीवर्धनमध्येही सालाबादप्रमाणे अजित मापुस्कर यांच्या घरी सायंकाळी भाविक आणि मानक–यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाला प्रारंभ झाला. तेथे सरकारचे प्रतिनिधी म्हणून नायब तहसिलदार माने व पोलीस निरीक्षक उमेश पाटील हे उपस्थित होते. त्यांना मानाचे प्रतिक असलेल्या पगड्या व अन्य उपस्थितांना टोप्या परिधान करण्यात आल्या. त्यानंतर तेथून ढोल–ताशांच्या गजरात मेटकर्णीपर्यंत सर्व उपस्थित मिरवणुकीतून गेले. तेथे अधिकाऱ्यांच्या हस्ते श्री मेटकर्णी देवी, नवरात्रीनिमित्त स्थापन केलेली देवी व आपट्यांच्या पानांच्या रुपाने असलेले सोने यांची पूजा करण्यात आली. यानंतर तेथे विद्यार्थी–विद्यार्थिनींनी शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके सादर केली. त्यानंतर सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला.

## अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कामाचा शुभारंभ

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणकरांचे प्रतीक्षेत असलेले लोकनेते दि.बा. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कामाचा शुभारंभ दसऱ्याच्या मुहूर्तावर विजय शिरढोणकर कुटुबियांच्या हस्ते करण्यात आला. जवळजवळ बारा वर्षाच्या प्रतीक्षेनंतर या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे उरणकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

हे अभियांत्रिकी महाविद्यालय निर्माण व्हावे यासाठी विविध मान्यवरांनी प्रयत्नांची परा कष्ट केली आहे. त्यामध्ये अध्यक्ष दिनेश घरत, कॉम्रेड भूषण पाटील, सुधाकर पाटील, संतोष पवार, काशिनाथ गायकवाड यांनी मेहनत घेतली. यावेळी राजेंद्र शिरढोणकर, विजय शिरढोणकर विकासक म्हणून काम पाहतील. यावेळी विजय शिरढोणकर यांनी सांगितले की, या संकुलमध्ये अभियांत्रिकी विद्यालय उभारणार



असून या महाविद्यालयामध्ये विविध प्रकारचे कोर्सेस शिक्षण दिले जाणार आहेत. यामध्ये लॉ कॉलेज, अभियांत्रिकी कॉलेज आर्किटेक्चर तसेच सुरुवातीपासूनच्या शिक्षणाचा समावेश असेल. तसेच लोकनेते दि.बा. पाटील शैक्षणिक संकुल उभारणार असून दि. बा. पाटील साहेबांचे शिल्पदेखील उभारणार. एक भव्य दिव्य इमारत म्हणून याकडे नवी मुंबईकरांचे लक्ष वेधणार आहोत. तर यामध्ये उच्चशिक्षित शिक्षक वर्ग अनुभव प्रदान करणार आहेत. चांगल्या दर्जाचे शिक्षण या संकुलातून मिळणार असून त्या दृष्टीने प्रयत्न राहतील, यासाठी आम्हास कमिटीचा सपोर्ट महत्त्वाचा राहील, असेही ते म्हणाले.

## गणेश भोपी पुरस्काराने सन्मानित

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात तरुणांना तांत्रिक आणि कौशल्य विकास शिक्षण देणाऱ्या करियर गायडन्स इन्स्टिट्यूटचे मुख्याध्यापक गणेश भोपी यांना आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. शेकडो तरुणांना तंत्र शिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या गणेश भोपी यांना अहिल्यानगर येथील बी द चेंज फाउंडेशनकडून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ने सन्मानित करण्यात आले. करियर इन्स्टिट्यूटचे माध्यमातून गरजू युवक युवतींना मोफत तांत्रिक प्रशिक्षण देऊन रोजगार देण्यात येत असते. या संस्थेतर्फे जवळजवळ १००० विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण देऊन रोजगार देण्यात आला. या कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# साप्ताहिक राशिभविष्य ५ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ–अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### व्यवसायात नफा मिळण्याची शक्यता

**मेष :** या सप्ताहात आपल्या राशीसाठी परदेशातून लाभ होऊ शकतो. खास करून जे व्यावसायिक विदेशाने जोडलेला व्यापार करतात त्यांच्यासाठी खूप चांगले राहण्याची अपेक्षा आहे. तसेच, मानसिक त्रास होण्याची शक्यता आहे. म्हणून मेडिटेशन करा आणि आपल्या मनाला शांत ठेवण्याचा प्रयत्न करा. आपण नवीन प्रॉपर्टी किंवा वाहन खरेदीचा विचार करू शकता. तथापि, बजेटच्या बाहेर कुठलीही वस्तू खरेदी करू नका. तसे एकूणच पाहिले असता हे दिवस वृषभ राशीतील जातकांसाठी चांगले राहण्याची अपेक्षा आहे. आपल्या कार्यक्षेत्रात तुम्हाला चांगले फळ मिळेल. जर तुम्ही व्यवसाय करता, तर त्यातही नफा मिळण्याची पूर्ण शक्यता आहे. कामाच्या संबंधात या काळात तुम्ही यात्रेवर जाऊ शकतात. **महिलांना–** कौटुंबिक जीवनातही तुम्हाला सकारात्मक फळ मिळतील. जर तुमची वडिलांसोबत काही नाराजी असेल तर, ती या काळात दूर होऊ शकते. आपल्या वडिलांकडून तुम्ही विभिन्न कामाबाबत सल्ला घेऊ शकता. तसेच, तुम्ही धार्मिक यात्रेवरही जाण्याची शक्यता आहे. घरात मंगलकार्य होऊ शकते. नवीन लग्न झालेल्याना आनंदी बातमी मिळेल. **शुभदिनांक –** ०५,०६.

### मेहनतीचे फळ मिळेल

**वृषभ :** या सप्ताहात आपण कार्यक्षेत्रात थोडे सांभाळून चालण्याची आवश्यकता आहे. तथापि, तुमचे उच्च अधिकारी तुमच्या कामाने प्रभावित राहतील. परंतु, तुमच्या अधिनस्थ कर्मचारी तुमच्याविरुद्ध कट रचू शकतात. जर काही प्रकारची आयडिया तुमच्या मनात आली तर, ती कुणाला सांगायच्या आधी उच्च अधिकाऱ्यांना सांगा. या काळात तुमचा स्वभाव थोडा आक्रमक होऊ शकतो. तुम्हाला तुमच्या आक्रमक स्वभावावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. नाहीतर चांगली कामे बिघडू शकतात. या काळात तुम्हाला मागील मेहनतीचे फळ मिळेल आणि तुम्ही आपला व्यवसाय सुरु करण्याचा विचार करू शकता. तथापि, या प्रकारचे मोठे निर्णय घेण्याच्या आधी अनुभवी लोकांचा सल्ला नक्कीच घ्या. या राशीतील जातकांसाठी सप्ताहाची सुरुवात खूप चांगली सांगितली जाऊ शकत नाही. या काळात तुमचा निष्काळजीपणा पाहिला जाऊ शकतो. **महिलांना–** महिलांना अंगीभूत कलांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. आर्थिक बाजू सावरता येईल. परंतु, अनावश्यक खर्चावर योग्य नियंत्रण ठेवा. **शुभदिनांक –** ०७,०८.

### धार्मिक कार्यात हिस्सा घ्याल

**मिथुन :** या साप्ताहात तुम्ही गरजेचे काम टाळू शकतात. गरजू कामे टाळल्यामुळे नंतर तुम्हालाच मानसिक तणावही येऊ शकतो. म्हणूनच, कामांना टाळू नका आणि वेळोवेळी सर्व काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. या राशीतील जे जातक गूढ विषयांचे अध्ययन करत आहेत, त्यांच्यासाठी वेळ चांगली राहील. तुम्ही धार्मिक कार्यात हिस्सा घ्याल. सोबतच आपल्या कुटुंबासोबत मिळून काही धार्मिक यात्रेवरही जाण्याचा प्लॅन बनवू शकता. चंद्राच्या संक्रमणाने तुमच्या भाग्यात वृद्धी होईल आणि या राशीतील पेशावर लोकांना कार्यक्षेत्रात चांगल्या फळांची प्राप्ती होऊ शकते. काहीवेळा यामुळे नात्यामध्ये चढउतार येऊ शकतो. तुम्ही आपल्या भावना आपल्या जवळच्यांसोबत मोकळ्याने ठेऊ शकणार नाही. यामुळे तुम्हालाही त्रास होईल आणि तुमच्या जवळच्या व्यक्तींनाही त्रास होईल. जे जातक उच्च शिक्षण घेत आहेत, त्यांना अत्याधिक परिश्रम करावे लागतील. **महिलांना–** प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये व पोटाच्या विकाराबाबत अधिक लक्ष द्या. काही भाग्यवंतांना सुवार्ता मिळण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक –** ०९,१०.

### व्यवसायात नफा होईल

**कर्क :** या साप्ताहात उच्च अधिकाऱ्यांसोबत तुम्ही गरजेच्या मुद्यांना घेऊन बोलणी करू शकता. तुम्ही नवीन कल्पना आपल्या बॉसला देऊ शकता. यामुळे बॉसच्या नजरेत तुमची प्रतिमा सुधारेल. जर तुम्ही नोकरीमध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न करत आहात, तर मित्रांकडून तुम्हाला फायदा होऊ शकतो. तुम्हाला कौटुंबिक व्यवसायात लाभ प्राप्त होईल. आपल्या वाणीच्या बळावर तुम्ही सामाजिक स्तरावर चांगले प्रदर्शन करू शकाल. चंद्राचे संक्रमण तुम्हाला भागीदारी आणि व्यवसायात नफा होऊ शकतो. तथापि, भागीदारीसोबत पारदर्शकता ठेवा. त्यांच्यापासून अशी कुठलीही गोष्ट लपवू नका, ज्यामुळे येणाऱ्या काळात तुमच्यामध्ये दूरी निर्माण होईल. या राशीतील विवाहित जातकांसाठी हा सप्ताह चांगला राहणार आहे. तुम्हाला जीवनसाथीसोबत वेळ घालवण्याची संधी मिळेल. **महिलांना–** मनातील पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. प्रकृतीची पथ्ये पाळा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. थोडी जिवाची घबराट होण्याची शक्यता राहील. ताण तणावामुळे त्रास होऊ शकतो. **शुभदिनांक –**०५,११.

### रखडलेली कामे मार्गी लागतील

**सिंह :** या साप्ताहात तुम्हाला आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे. या काळात तुम्हाला आपल्या शरीराला फीट ठेवण्यासाठी योगासन केले पाहिजे. धनुरासन आणि सूर्य नमस्कार तुमच्यासाठी खूप फायदेशीर असेल. जर तुम्हाला काही विषय घेऊन शोधकार्य करायचे असेल तर, या सप्ताहात तुम्ही सुरु करू शकतात. हा कालावधी तुमच्यासाठी खूप चांगला नाही. सर्वसाधारण असेल. आपल्या मेहनतीच्या अनुसार तुम्हाला फळांची प्राप्ती होणार नाही. थोडी आत्मविश्वासाची कमतरता पाहिली जाऊ शकते. म्हणून, तुम्हाला या काळात चुका करण्यापासून सावध राहिले पाहिजे. स्वतःला एकाग्र ठेवण्यासाठी योग आणि ध्यान इत्यादींची मदत घेतली पाहिजे. सप्ताहाच्या शेवटी कौटुंबिक जीवनात आनंद येईल. भाग्याची तुम्हाला पूर्ण साथ मिळेल. कोर्ट कचेरीत रखडलेली कामे मार्गी लागणार आहेत. स्पर्धा परीक्षेत यश संभवते. **महिलांना–** सासुरवासीनीला आनंददायक बातमी मिळेल. प्रकृतीस्वास्थ्याबाबत मात्र अधिक लक्ष द्या. नियमित व्यायाम करा. बेफिकीर राहू नका. **शुभदिनांक –** ०६,१०.

### आरोग्यामध्ये सकारात्मक बदल

**कन्या :** या सप्ताहातील ग्रहमान आपल्या बाजूने असेल. ज्यामुळे मोठी उपलब्धी तुम्ही तुमच्या जीवनात मिळवू शकतात. विद्यार्थी असतील तर आपल्या ज्ञानाने आपले सहपाठी प्रभावित होतील. गुरुजनांचीही तुम्हाला पूर्ण साथ प्राप्त होईल. या काळात एक महत्वाचे कुठलेही शेती जमीनविषयक महत्वाचे काम मात्र करू नका. आपल्या रचनात्मकतेमध्ये वृद्धी होईल. करिअरला उत्तम दिशा देण्यासाठी तुम्ही दृढ संकल्पित असाल आणि यासाठी खूप मेहनत कराल. आठवड्याच्या सुरुवातीचा कालावधी आपल्यासाठी अत्यंत शुभ ठरू शकते. या काळात आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यामध्ये सकारात्मक बदल दिसून येतील. जर आपण एखाद्या दीर्घकालीन आजाराने त्रस्त असाल, तर ते दूरदेखील होऊ शकते. आपल्या कार्यक्षेत्रातही चांगले फळ तुम्हाला मिळेल. तथापि विरोधकांपासून सावध रहा. **महिलांना–** दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीबाबत जास्त चिंता नको. विशेषतः खाण्यापिण्याची आपली हौसमौज होणार आहे. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. **शुभदिनांक –** ०७,११.

### कलागुणांना प्रोत्साहन मिळेल

**तुळ :** या सप्ताहातील ग्रहमान आपल्या विवाहित जीवनात ग्रहांचे संक्रमण आपल्या आयुष्यात खूप अडचणी आणू शकते. भागीदारीच्या व्यवसायात असलेल्या व्यावसायिकांना काही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. जोडीदाराची कोणतीही गोष्ट आपणास वाईट वाटू शकते. आपल्या दोघांमध्ये विभक्त होण्याची परिस्थिती उद्भवू शकते. म्हणून सावधगिरी बाळगा. आपण आपल्या कार्यक्षेत्रात चढ–उतार पाहू शकता. यावेळी घाईत कोणताही निर्णय घेऊ नका. भागीदारीमध्ये व्यवसाय करीत असल्यास आपल्या गोष्टी स्पष्ट करा आणि आपल्या जोडीदाराच्या गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न करा. आठवड्याच्या शेवटी या राशीचे लोक आध्यात्मिक गोष्टींमध्ये रस घेऊ शकतात. आपल्याला यावेळी लोकांना जास्त भेटण्याची इच्छा नसेल आणि एकाकीपणामध्ये वेळ घालवायला आवडेल. **महिलांना–** त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. चांगली ऑफर मिळेल, काम करण्याची मनीषा असणाऱ्याना चांगली ऑफर येईल. बाहेरील पाणी पिताना दक्षता पाळा. उष्णतेच्या व डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. **शुभदिनांक –** ०८,१०.

### आर्थिक बाजू ठीक राहील

**वृश्चिक :** या आठवडा आपल्यासाठी खूप चांगला असल्याचे म्हणता येणार नाही. तुम्ही तुमच्या आरोग्याबाबत सावधगिरी बाळगली पाहिजे. त्याचप्रमाणे आपण आर्थिकदृष्ट्यादेखील कमकुवत होऊ शकता. म्हणून यावेळी अधिकाधिक पैशाची बचत करा. या आठवड्यात जेव्हा तुमची बौद्धिक क्षमता विकसित होईल. जेणेकरून या राशीच्या लोकांना शिक्षणाच्या क्षेत्रात शुभ परिणाम मिळतील. उच्च शिक्षण घेत असलेल्या या राशीच्या लोकांना त्यांच्या आवडीच्या शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळू शकतो. यासह, आपण आपल्या कला कौशल्यासह लोकांवरदेखील प्रभाव टाकू शकता. तथापि, या राशीच्या जातकांना, ज्यांना मुलं आहेत, त्यांनी मुलांप्रति अत्यधिक भावूक होण्यापेक्षा प्रॅक्टिकल असले पाहिजे. त्यांना सुधारण्यासाठी त्यांच्याबरोबर वेळ घालवला पाहिजे. तरच त्याचा परिणाम दिसेल. **महिलांना–** आर्थिक बाजू ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. राजकीय क्षेत्रात यश संभवते. कडक उपवास न करता हलके अन्न घेणे हितावह आहे. जुना आजार बाळवण्याची शक्यता राहील. **शुभदिनांक –** ०९,११.

### वादविवाद टाळा

**धनु :** या आठवड्याच्या मध्यला चंद्राचा संक्रमण आपल्या विरोधकांवर वर्चस्व गाजवेल. जे आपल्याला कार्यक्षेत्रात चांगले फळ देईल. कोर्ट–कचेरीच्या बाबतीतही या राशीच्या लोकांना यश मिळू शकेल. या आठवड्याच्या शेवटी आपली स्पर्धात्मक क्षमता वाढेल. ज्यामुळे आयुष्यातील मोठ्यात मोठे अडथळे दूर केले जाऊ शकतात. या राशीतील काही लोक या कालावधीत कर्जाची परतफेड करण्यास सक्षम असतील. आठवड्याच्या अखेरीस, कौटुंबिक जीवनात सुसंगतता साधता येणार आहे. जर एखाद्या सदस्याशी आपला संबंधात नाराजगी असेल, तर ती या काळातदेखील दूर होऊ शकते. त्याचप्रमाणे जीवनसाथीच्या कुटुंबातील सदस्यांसोबत भेट होण्याचीही शक्यता आहे. या काळात आपण अत्यंत महत्वाकांक्षी होऊ शकता आणि जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी कठोर परिश्रम करू शकता. प्रेम प्रकरणांसाठीदेखील वेळ चांगला आहे. **महिलांना–** कौटुंबिक वादविवाद मात्र कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रात जम बसवू शकाल. कुटुंबाकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. प्रकृती ठणठणीत राहील. विशेषतः प्रिय व्यक्तीला व्यसनांपासून दूर ठेवण्यास मदत करा. **शुभदिनांक –** ०६,११.

### कलागुणांना प्रोत्साहन मिळेल

**मकर :** या आठवड्याच्या सुरुवातीला घरात आपण लक्ष द्याल. त्यामुळे सुख साधनांमध्ये वृद्धी होईल. नवीन घर खरेदी करण्याबद्दल किंवा घराचे नूतनीकरण करण्याबद्दल आपण विचार करू शकता. अचानक यावेळी आपल्याला आईच्या आरोग्याबद्दल काळजी वाटू शकते. म्हणून त्यांची काळजी घ्या. जर त्यांना अगदी लहान जरी समस्या उद्भवली, तरी त्यांना ताबडतोब एका चांगल्या डॉक्टरकडे घेऊन जा. यावर उपाय म्हणजे बहीण किंवा आत्या यांना भेटवस्तू द्या. आठवड्याच्या मध्यला आपल्या संतानसाठी शिक्षण क्षेत्रात चांगले प्रदर्शन करू शकते. ज्यामुळे घराचे वातावरण आणि घरामध्ये सकारात्मकतादेखील येऊ शकते. प्रेमाशी निगडित बाबींबद्दल सावधगिरी बाळगा. आपण किवा आपले संतान स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतील तर त्यांनी मैत्रीच्या समस्येपासून दूर राहून अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. **महिलाना–** त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीची संधी मिळेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा. मोठी गुंतवणूक करण्याचे टाळा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. **शुभदिनांक –**०७,१०.

### प्रयत्नांना यश मिळेल

**कुंभ :** या सप्ताहात बौद्धिक क्षमता विकसित करण्यासाठी आपल्याला आपल्या शरीरावरही लक्ष देणे आवश्यक आहे. आपण जितके शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असाल, तितकेच मानसिकदृष्ट्या आपण तंदुरुस्त असाल. आपल्या प्रयत्नांना नवीन गती देईल. आपण शिक्षण, व्यवसाय इत्यादी क्षेत्रात चांगली कामगिरी करू शकता. आपल्याला आपल्या स्वभावाकडे थोडे लक्ष देणे आवश्यक असले. आपल्या स्वभावात चिडचिडेपणा दिसून येऊ शकतो. आठवड्याच्या शेवटी ही वेळ आपल्यासाठी चांगली असेल. आपण आपल्या प्रयत्नांच्या जोरावर यश मिळविण्यास सक्षम असाल. या राशीचे जे लोक नोकरी करत आहेत, त्यांना कार्यक्षेत्रात चांगले परिणाम मिळतील. या वेळी आपले शत्रू आपले मित्रदेखील बनू शकतात. कारण यावेळी आपला व्यवहार सर्वांसोबत खूप चांगला असेल. **महिलांना–** एखादे चांगले बक्षीस मिळणार आहे. प्रवासाचे योग संभवतात. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. विशेषतः बाहेरील खाणे टाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. **शुभदिनांक –** ०९,१०.

### कामाचे कौतुक होईल

**मीन :** या साप्ताहात आपण आपल्याला आरोग्यसंबंधित समस्या होऊ शकतात. आपली मानसिक स्थिती चांगली बनवण्यासाठी योग आणि ध्यान करा. आपण कार्यक्षेत्रात उत्तम प्रदर्शन करू शकता. तुमच्याद्वारे केलेले कामाचे उच्च अधिकाऱ्यांकडून कौतुक होईल. या राशीतील जातकास कार्यक्षेत्रात पद उन्नती मिळण्याची शक्यता आहे. तथापि, या काळात तुम्हाला आपल्या अहंकाराला मागे ठेऊन आपल्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांच्यांसोबत चांगला व्यवहार करण्याची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे तुम्हाला लाभ होण्याची पूर्ण शक्यता राहील. आर्थिक पक्षाला घेऊन काही समस्या चालू असेल तर, त्याही दूर होऊ शकतात. तथापि, कुठल्या अश्या व्यक्तीला या काळात अशा लोकाना उधार देऊ नका, ज्यावर तुम्हाला विश्वास नसेल. कौटुंबिक जीवनासाठी वेळ चांगली राहील. मोठ्या भाऊ बहिणींसोबत उत्तम वेळ घालवण्याची संधी मिळेल. **महिलांना–** कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. नवीन ओळखींमुळे फायदा होईल. **शुभदिनांक –** ०५, ११.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# कोर्लईत कणशीचा सण साजरा

## शेतामधील पहिलं उत्पन्न देवाला अर्पण

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

सध्या पावसाळ्याचे दिवस संपले असून जून महिन्यात केलेली भाताची लागवड आता परिपूर्ण झाली असून भात पीक तयार झाले असून शेतामध्ये भाताच्या लोंब्या तयार झाल्या असून पीक चांगले बहरले आहे. तयार झालेले पीक हे देवाला अर्पण करून देवाचे आभार मानण्यासाठी कणशीचा सण कोर्लई गावात मोठ्या उत्सहात साजरा केला जातो.

कोर्लई गावामधील ख्रिस्ती लोक (दि. ४) ऑक्टोबर हा दिवस कणशीचा सण म्हणजेच शेतामध्ये पिकलेलं पहिलं अन्न देवाला अर्पण करत असतात. निसर्गाच्या व देवाच्या अगाध कृपेने शेतामध्ये मोठ्या प्रमाणात भातपीक तयार होत असते. शेतामध्ये तयार झालेले पीक देवाच्या आशीर्वादामुळे समस्त लोकांच्या पोटापाण्याची व्यवस्था होत असते. देवाने दिलेले हे पीक देवाला समर्पित करण्याची प्रथा कोर्लई गावात असून या कार्यक्रमासाठी असंख्य महिला भाताच्या लोंबी घेऊन शेतामध्ये जाऊन विशेष पार्थना करून देवाचे ऋण व्यक्त करून पिकलेले अन्न देवाला समर्पित करून अशीच कृपा अबाधित ठेऊन शेतामध्ये चांगले पीक येत राहो अशी प्रार्थना करीत असतात.

सकाळी सर्व भाविक ग्रामस्थ बैलगाड्या सजवून शेतावर गेली. शेतावरील प्रार्थना संपन्न झाल्यावर शेतामध्ये तयार झालेल्या भाताच्या लोम्ब्या घेऊन बैलगाडीसह माऊंट कार्मेल चर्च जवळ जमा झाले.शेतामधील पहिले अन्न चर्चमध्ये आणून चर्चमध्ये प्रार्थना करण्यात आली. चर्चमध्ये भारतातील सर्व शेतकऱ्यांसाठी प्रार्थना करण्यात आली. भारत हा देश कृषीप्रधान असून कष्ट करणाऱ्या शेतकरी वर्गाचे कौतुक सुद्धा करण्यात आले.

पान ३ वरून

## स्थानिकांची भरती करा

नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत अनेक वेळा घोषणा करण्यात आल्या आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. बुधवारी विमानतळाचे उद्घाटन होणार आहे. त्याच दिवशी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचे विमानतळ असल्याचे जाहिर करावे. तर तमाम जनतेला समाधान वाटेल. शेकाप इतर पक्षाच्या वतीने होणारे आंदोलन प्रखर असणार आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

## महायुतीत शिवसेना-राष्ट्रवादी आमने-सामने

दिसून आले. अलिबागमध्ये शनिवारी शासनाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या रायगड जिल्हा रोजगार मेळाव्यात या दोन्ही मंत्र्यांनी हजेरी लावली होती. यावेळी, प्रशासकीय यंत्रणा जितकी सक्षम तितक्या गतिमान सेवांचा लाभ लोकांना अधिक मिळतो, असे मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमातील सर्व कामे रायगड जिल्ह्याने शंभर टक्के पूर्ण केल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, यावेळी व्यासपीठावर मंत्री भरत गोगावले हेही उपस्थित होते. त्यांच्या हस्तेही उमेदवारांना नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात आले.

## नागोठण्यातील असंख्य कार्यकर्ते शेकापमध्ये

अफताब अत्तार, मुलीद कडवेकर, फरीद बोडेरे, मजर सय्यद, मोहसिन शेख, याकूब कडवेकर, सुजान गोडमे, साहिल सय्यद, आसीफ शेख, साहिल कोरतकर, आशा शेळके, कांचन कदम, पौर्णिमा महाडीक, जानवी शिर्के, संदीप शेळके, प्रफुल्ल शिंदे, समिर सय्यद, अरबाज कुरेशी आदींनी शनिवारी (दि.४) शेतकरी कामगार पक्षामध्ये प्रवेश केला. शेकाप नेते जयंत पाटील यांच्या हस्ते नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

## मित्राचा खून करून पसार झालेल्या आरोपीच्या सीमेवर मुसक्या आवळल्या

औषधोपचार न करता जखमी अवस्थेत तेथेच सोडुन पळून गेला. या घटनेत मयताचा मृत्यु झाला. ही घटना ११ सप्टेंबर रोजी घडली होती.

रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधिक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल पाटील, पोलीस निरिक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक सुजित गडदे यांच्या नेतृत्वाखाली पोहवा संदिप चव्हाण, पोशि प्रणित कळमकर, परसराम टेकाळे, किरण देवकाते, समीर पवार अशी टिम नेमण्यात आली.

आरोपी गुन्हा केल्यानंतर प्रथम ठाणे येथे गेल्याचे समजले होते व त्यानंतर त्याने डहाणू, जि. पालघर येथे गेल्यावर फोन बंद केला होता. तसेच त्याच्या संपर्कातील व्यक्ती/नातेवाईक यांचे ही फोन बंद झाले होते. त्यामुळे आरोपीच्या पुढील ठावठिकाणाबाबत कोणतीही ठोस माहिती उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे त्याचा ठावठिकाणा शोधून काढण्याचे आव्हान तपास पथकापुढे निर्माण झाले होते. त्यानंतर सुरत व अहमदाबाद येथे कामानिमित्त वास्तव्यास असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याप्रमाणे आरोपीत याचा शोध घेण्याकामी तपास पथक ठाणे, सुरत व अहमदाबाद येथे पाठविण्यात आले होते. परंतु आरोपीत सापडला नाही. गुन्ह्याचे तपासिक अधिकारी सुजित गडदे यांनी तपास पथकासह आरोपीत याच्या मुळ गावी, जि. मधुबनी, तसेच त्याचे सासरवाडी जि.सितामढी, राज्य-बिहार येथे गेले होते. तेथे गेल्यावर आरोपीच्या नातेवाईकांकडे तपास केला असता काही एक उपयुक्त माहिती मिळाली नाही. अखेर कौशल्याचा वापर करुन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाप्रमाणे तपासाची चक्रे फिरवुन स्थानिक गोपनीय बातमीदार निर्माण केले. त्यांच्या मदतीने आरोपी एकदराबेला, महोत्तरी, नेपाळ येथे असल्याची खात्रीशीर माहीती प्राप्त केली. त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी यांनी आरोपीच्या मानसिकतेचा अभ्यास करुन त्याच्यासोबत थेट संपर्क होत नसतानाही तो नातेवाईकांना भेटण्यासाठी भारत-नेपाळ सीमाभागात येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली होती. त्याप्रमाणे पोलीस पथकाने अत्यंत कौशल्याने आरोपीचा माग काढून, स्थानिक पोलिसांची मदत घेवून त्यास अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले.

## अरबी समुद्रात शक्ती चक्रीवादळाची निर्मिती

पश्चिमेकडे आणि पाकिस्तानच्या कराचीपासून ३८० किलोमीटर दक्षिणेकडे होती.शक्ती चक्रीवादळ भारताच्या पश्चिम किनाऱ्यापासून दूर समुद्राकडे जात असून, शनिवार, ४ ऑक्टोबर रोजी मध्य अरबी समुद्रात आणखी तीव्र होणार आहे. या प्रणालीच्या प्रभावामुळे अरबी समुद्रात ताशी १०० ते १२५ किलोमीटर वेगाने वारे वाहणार असून, ही प्रणाली सोमवारपर्यंत कायम राहणार आहे.

**बंगालच्या उपसागरात कमी दाब क्षेत्र**

बंगालच्या उपसागरात तयार झालेले तीव्र कमी दाबाचे क्षेत्र शुक्रवार, ३ ऑक्टोबर रोजी दुपारी ओडिशामध्ये जमिनीवर आले असून, ही प्रणाली गोपाळपूरपासून ५० किलोमीटर नैऋत्येकडे होती. उत्तरेकडे सरकत असलेली ही प्रणाली आज छत्तीसगडकडे जाण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

गुजरात आणि पाकिस्तानच्या किनाऱ्यालगत निर्माण झालेल्या शक्ती चक्रीवादळाचा फारसा प्रभाव महाराष्ट्रावर नसेल. कोकणात शनिवार, ४ आणि रविवार, ५ ऑक्टोबर रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल. मात्र, मुसळधार पावसाची शक्यता नाही. यासंबंधी इतर काही सुधारीत अंदाज हवामान विभागाने वर्तवलेले नाहीत.

शक्ती चक्रीवादळाची निर्मिती झाली असून, २०२५ मधील हे पहिले चक्रीवादळ आहे. शक्ती हे नाव श्रीलंकेने सुचविले आहे. तमिळ भाषेतील शख्ती (शक्ती) या शब्दाचा अर्थ सामर्थ्य असा आहे. यावरून हे नाव देण्यात आले आहे.

## गुटखा कारवाईत टपरीवाला बळीचा बकरा

त्यानंतर पोलीस दलात खळबळ उडाली. पोलीस ठाणे स्तरावर कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या दणक्याने पोलीस यंत्रणा कामाला लागली. मात्र आजही जिल्ह्यातील अनेक भागात मटका, जुगार आदी धंदे छुप्या पध्दतीने चालत आहे. वीस रुपयांचा गुटखा ३५ ते ४० रुपये दराने विकला जात आहे. ही बाब स्थानिक पोलिसांना माहित असतानाही त्यांच्यावर मात्र कारवाई करीत नसल्याची चर्चा आहे.

अलिबाग पोलीस ठाण्यापासून तीन किलो मीटर अंतरावर असलेल्या भालफाटा येथे अलिबाग पोलिसांनी छापा टाकला. या छाप्यात ३३ हजार १३३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यामध्ये केशरयुक्त विमल पानमसाला, तंबाखूचे एकूण १२० हून अधिक पाकीटे आणि दहा हजार रुपये किंमतीचा मोबाईलचा समावेश आहे. या कारवाईत सुरुवातीला तिघांना ताब्यात घेण्यात आले.त्यामध्ये पुकले नामक दोन व्यक्ती आणि मोरे नामक एक व्यक्तीचा समावेश होता. परंतु आमदारांचा फोन गेल्यावर पुकले नामक दोन व्यक्तींना सोडून पान टपरीवाला राजू तथा राजेश मोरे याला बळीचा बकरा करीत त्याच्याच विरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची चर्चा सुरु आहे.

पोलिसांची ही कारवाई कौतुकास्पद असली, तरी संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अर्थपूर्ण सहकार्यातून राजकीय दबावाखाली येऊन गुन्हेगारांना सोडून दिल्याने पोलिसांच्या कारवाईबाबत नाराजीचे सूर उमटले जात आहेत. याबाबत पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्याकडे तक्रार केली जाणार असल्याचे बोलले जात आहे.

## पनवेलमध्ये अपघातात कामगाराचा मृत्यू

धुण्यासाठी वॉशिंग सेंटरवर गेला होता. तेथील एका कंटेनरचा मागील दरवाजा उघडण्यास शंकरलाल मदत करत असताना, पाठीमागून आलेल्या दुसऱ्या ट्रकचालकाने शंकरलालला धडक दिली. त्यात शंकरलाल चिरडला गेला. त्याला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे येलवणे, ता.अलिबाग, येथील सर्व्हे नंबर १९/५, एकूण क्षेत्र ०-२८-२०, आकार ०.२६ रू. पैसे या मिळकतीपैकी प्रज्ञा प्रल्हाद धोत्रे, प्रसाद प्रल्हाद धोत्रे, सतीश दत्तात्रेय धोत्रे, वृषाली विनोद राजे, रेखा मुरलीधरन नायर व सुषमा विश्वनाथ सुरावकर यांच्या अविभक्त हिश्याचे ही मिळकत, (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक अरूण अनंत म्हात्रे रा. धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०४/१०/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,
ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राम्हण आळी, अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे धोकवडे, ता. अलिबाग जि. रायगड येथील गट नं. ६०/२, एकुण क्षेत्र ०-३५-१० हे.आर., आकार ६.०० रू. पैसे, या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२५-९० हे.आर., आकार ४.४३ रू. पैसे या मिळकतीपैकी अरूण अनंत म्हात्रे यांच्या अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०-०९-०० हे.आर. ही मिळकत, (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत''असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक अरूण अनंत म्हात्रे रा.धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०४/१०/२०२५

**(ॲड. संजय द.म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,
ए विंग, रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राम्हण आळी, अलिबाग,
ता. अलिबाग जि. रायगड.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| १) जितेंद्र भालचंद्र वेदक,<br>२) नेत्रा सुधीर मालाडकर,<br>३) शिरीष भालचंद्र वेदक,<br>४) गिरीष भालचंद्र वेदक,<br>५) मृनालिनी भालचंद्र वेदक | २९/२/ब | ८ | ३३४.९४ | ३३ | ४९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.२, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पुर्व, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०१०१

सही / -
**ॲड.नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक:-०५/१०/२०२५
मो.नं.९३७२९६४६६५

---

### जाहीर नोटीस

नि.०७/ड
अर्जदारांचे वकील
ॲड.एम.जे.तांबडकर

**मुरुड येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो., यांचे न्यायालयांत.**

दि.चौ.अ.२६/२०२५

श्रीम. अमृता रविंद्र खोल, वगैरे-२ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, रविंद्र पांडुरंग खोत हे ता. ०४/१०/२०२१ रोजी मयत झाले आहेत. रविंद्र पांडुरंग खोत यांचे पश्चात त्यांना केवळ अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत हे ठरवून मिळण्याकरीता मुरुडयेथील मे. न्यायालयामध्ये अर्जदार यांचे नावे रविंद्र पांडुरंग खोत यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला/हेअरशिप सर्टिफिकेट करीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी असा दाखला देणेंस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी तारीख १०/११/२०२५ रोजी किंवा तत्पुर्वी कार्यालयीन वेळेत मे. कोर्टात हजर राहून आपली हरकत लेखी स्वरुपात द्यावी. मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास याकामी योग्य तो हुकूम करण्यांत येईल व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आल्यास तिची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ०४ माहे १० सन २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय मुरुड**

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय मुरुड**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मी खालील वर्णनाच्या मिळकत जमिनी सदर मिळकतींचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहु जमिनी या सदर जमीनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटींस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नांवे आहेत त्या मिळकतींचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मौजे-सालपे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील मिळकतींचे वर्णन**

| जमीन मालकांची नांवे | गावाचे नांव | सर्व्हे/ हिस्सा नंबर | क्षेत्र-हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| श्री.मनोहर मधुकर पवार रा-सांडशी, तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड. | सालपे | १०५/२/ब पैकी | जमीन विक्री करणार यांचे मालकीचे क्षेत्र -०-४३-४० यापैकी विक्री करण्याचे ठरलेले क्षेत्र-०-१६-०० |
| १) श्री. मधुकर गेनू पवार<br>२) श्री. दत्तात्रय गेनू पवार रा-सांडशी, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड. | सालपे | १०४/१ पैकी | जमीन विक्री करणार यांचे मालकीचे क्षेत्र-१-८०-७० यापैकी विक्री करण्याचे ठरलेले क्षेत्र-०-१६-०० |

तरी वरील प्रमाणे मिळकतींवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, साठेकरार, ताबा, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षिस भाडेपट्टा, बोजा, जप्ती कुळवहिवाट, इजमेंट, चार्ज, मृत्युपत्रांकित, दान, लिज लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असलेस संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आंत खालील सही करणार यांचे पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी. अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबधी कोणाचेही हक्क हितसंबंध नाहीत असे गृहित धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतींचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करु. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली. दिनांक -०३/१०/२०२५

सही
**श्रीमती वैशाली सुभाष नेरपगारे**
पत्ता-१४०३. मायुर्स नेचर ग्लोरी.
फेज ३. रेतीबंदर रोड, पारसिक नगर,
कळवा, ठाणे - ४००६०५.
मोबाईल नंबर - ९८१९५७७७१९

---

THE REVDANDA
CO-OPERATIVE URBAN BANK LTD.
Revdanda, Dist. Raigad -402 202.
PH. :02141-240039 Fax: 02141-240793
Email ID: revdandabank@rediffmail.com

Ref. No. RCUB/HO/336/2025-26 Date: 29-09-2025

### Possession Notice

Whereas the undersigned being the Authorized officer for The Revdanda Co-Operative Urban Bank Ltd, Revdanda, Under Securitization and Reconstruction of financial Assets and Enforcement of Security Interest Act,2002 and in exercise of powers conferred under section 13(2) read with rule 3 of the security interest (Enforcement) Rule 2002, issued Demand Notice calling upon the following borrowers to repay the amount mentioned in the notice with further interest incidental expenses and cost within 60 days from the date of receipt of the said notice.

The borrowers has failed to repay the amount, notice is hereby given to the borrowers in particular and to the public in general that the undersigned taken possession of the properties describe here in below in exercise of powers conferred on him under section 13(4) of the said Act read with the Rule 9 of the said rules on following dates written below.

The borrower in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealing with the property will be subject to the charged of The Revdanda Co Operative Urban Bank Ltd. Revdanda, for the amount given below and interest and other expenses thereon.

| Sr.No | Name and Address of the Borrower/Guarantor | Outstanding As on date | Date of Demand 30/06/2025 | Date of possession Notice | Description of Immovable Properties |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Audumbar Sharad. Gondhali AT Agar Ali, Post Revdanda Tal Alibag Dist Raigad | 78,66,408.50 | 07/07/2025 | 29/09/2025 | Tukadi and District Raigad, Pot Tukdi and Taluka Alibag. in the area of Sub Registrar Alibag, Raigad Zilla Parishad and Panchyat Samiti Alibag Group Grampanchayat Revdanda in Mauje Revdanda City Servey No.85 Area 0.28.20 H,.R. Out of That Area 0.05.10 HR in Talathi Saja Revdanda and house in Group Gram Panchyat Revdanda House No.2954 A of Area 92.84 sq.mtr, 2954 B of Area 92.84 sq.mtr 2954 C of Area 88.47 sq.mtr in Guruprasad Building Maruti Ali, Revdanda owned by Mr. Prasad Sharad Gondhali |
| 2 | Mr. Prasad Sharad Gondhali AT Agar Ali, Post Revdanda Tal Alibag Dist Raigad | | | | |
| 3 | Mr. Sharad Pandurang Gondhali AT Agar Ali, Post Revdanda: Tal Alibag Dist Raigad | | | | |
| 4 | Mr. Santosh Posha Kajare At Tadwadi, Po-Valke Tal Alibag Dist Raigad | | | | |

Date - 29/09/2025
Place-Revdanda

**Authorized Officer**
**The Revdanda Co Op Urban Bank Ltd, Revdanda**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे झुगरेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| ३७/६/अ/२ | एकूण क्षेत्र ०-२६-०० हे.आर. | ०.१५ |

**मौजे चई, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. पॉ | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| १५/२ | एकूण क्षेत्र ३-४४-०० हे. आर. | २.५१ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०४/१०/२०२५

**ॲड.रोहित रो.मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

---

दिनांक : ०५ ऑक्टोंबर २०२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बीडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.चौ. मीटर | रुपये | पैसे |
| १) बबन गंगाराम चोरगे<br>२) सदाशिव गंगाराम चोरगे | २७ | २ | ०-५०-३० | ७ | १० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

सही / -
**ॲड.अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :- ०५/१०/२०२५
मो. नं. ९९२२३६८१२१

---

दिनांक : ०५ ऑक्टोबर २०२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे उंबरविरा, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे-आर.चौ. मीटर | रुपये | पैसे |
| वनिता शांताराम पाटील | १९ | १ | ०-१९-०० | १ | २५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-२०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

सही / -
**ॲड. अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :-०५/१०/२०२५
मो.नं. ९९२२३६८१२१

---

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य


- **मेष** : अचानक धनलाभ संभवतो. विशेष कार्यासाठी ग्रहमानाची अनुकूलता राहील. बाकी चिंता करू नये.
- **वृषभ** : अनावश्यक ताण वाढेल. बोलण्यातून गैरसमज संभवतात. मुलांच्या संगतीकडे लक्ष द्यायला हवं.
- **मिथुन** : ज्येष्ठांचा सल्ला कामी येईल. जुन वाद नव्याने उद्‌भवू शकतात. कायदेशीर बाबतीत काळजी घ्या.
- **कर्क** : महत्त्वाच्या कामात दिलासा मिळेल. वाद–विवादापासून दूर रहावं. आत्मविश्वासाने वाटचाल करावी.
- **सिंह** : धार्मिक समारंभाचं समाधान लाभेल. व्यवसायात जुनी येणी वसूल होतील. कार्यतत्पर रहायला हवं.
- **कन्या** : आर्थिक प्रश्नातून मार्ग निघेल. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील. कर्ज प्रकराणत दिलासा मिळेल.
- **तूळ** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे होतील. महत्त्वाच्या भेटीने समाधान लाभेल. आध्यात्मिक प्रगती होईल.
- **वृश्चिक** : जुनी येणी वसूल होतील. कलाकारांचा उत्साह वाढता राहील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं.
- **धनु** : सुवार्ता कानी येईल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल, शिक्षण, क्रीडा, स्थापत्य क्षेत्रात प्रगती होईल.
- **मकर** : आजचा दिवस महत्त्वाचा राहील. खरडलेली कामं करावी. व्यवहारात चांगला लाभ होऊ शकतो.
- **कुंभ** : मनातील विचारांना कृतीची जोड मिळेल. अनुभवींचा सल्ला अवश्य घ्यावा. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **मीन** : बेरोजगारांना मनाजोग्या संधी लाभतील. उपजत कला–गुणांचा विकास होईल. बाकी चिंता नसावी.

## ५ ऑक्टोबर — दिनविशेष

१९७५ : ब्रिटीश अभिनेत्री केट विन्स्लेट यांचा जन्म.
१९४८ : अश्गाबादमधील भूकंपात एक लाख मृत्युमुखी. अनेक जखमी.
२००३ : बिलियर्ड्सपटू विल्सन जोन्स यांचं निधन.
२०११ : अमेरिकन उद्योगपती, ॲपल कॉम्प्युटर्सचे सहसंस्थापक स्टीव्ह जॉब्स यांचं निधन.
२०१३ : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी पदाचा राजीनामा दिला.

## आरोग्यमंत्र — पेसमेकर का आणि कधी?

अलीकडच्या जीवनशैलीमुळे हृदयविकार वाढीला लागला आहे. काही वेळापूर्वीपर्यंत व्यवस्थित असलेला... असलेली कुणीही एकाएकी दगावल्याचं वा दवाखान्यात ॲडमिट असल्याचं कळतं आणि धक्का बसतो. बहुतेक वेळा यामागे हृदयविकार हे एक महत्वाचं कारण असतं. प्रत्येकाची हृदयविकाराची लक्षणं वेगळी असू शकतात आणि अर्थातच त्यावरचे उपचारही वेगवेगळे असतात. कुणाला अंजिओग्राफी आणि त्यानंतर अंजीओप्लास्टी सुचवली जाते. कुणाला बायपास सर्जरीचा उपाय करावा लागतो तर कुणाला पेसमेकर बसवला जातो. आज आपण पेसमेकरविषयी काही जाणून घेऊ या. आपल्या हृदयात एक वीजनिर्मिती केंद्र असते. त्याला एस ए नोड म्हणतात. त्यातून निर्माण झालेली विद्युत ऊर्जा एका विशिष्ट तार संस्थेतून प्रवास करते. हृदयाची स्पंदने साधारणपणे मिनिटाला ६० के १०० ठोके (हार्ट बीट) निर्माण करतात. शारीरिक श्रमानंतर हे ठोके वाढतात. पण ज्या व्यक्तीच्या हृदयाचे ठोके खूप हळू पडतात त्याला कृत्रिम पेसमेकर शरीराच्या आत बसवण्याचा सल्ला दिला जातो. पेसमेकर हृदयाच्या स्नायूंना उत्तेजन देते. त्यामुळे नैसर्गिक ठोक्यांप्रमाणे हृदयाचे ठोके निर्माण होतात. अर्थातच त्यामुळे रक्ताभिसरण सुधारते. हे यंत्र सामान्यपणे गळ्याजवळच्या हाडाच्या जवळील छातीच्या जवळील भागात डावीकडे किंवा उजवीकडे लावले जाते. त्याचा फायदा पेशंटना नक्कीच होतो. ज्यांचा हृदयाचा वेग कमी असतो त्यांना पेसमेकर लावण्यासाठी डॉक्टरांची सल्ला दिला जातो. या यंत्राद्वारे हृदयाचे कार्य सुधारते.



## महत्त्वपूर्ण काही... — पक्केपणाचा महिमा

दणकटपणाचं परिमाण म्हणजे कॉंक्रिट. भार पेलण्याची अपूर्व क्षमता असणाऱ्या कॉंक्रिटचा उपयोग अनेक ठिकाणी केला जातो. मात्र आपल्या देशात जवळपास न वापरला गेलेला पण अनेक देशांमध्ये उपयोगात आणला जाणारा पीसीसीचा एक वापर म्हणजे अणुबॉंब स्फोटापासून वाचवण्यासाठी तयार केलेली सुरक्षाघरं. या सुरक्षाघरांच्या भिंती दोन ते तीन फूट जाडीच्या पीसीसीने बनवतात. छतासाठी आणि पिलर्ससाठी खास रिएन्फोर्स्ड कॉंक्रिट (म्हणजे सळ्या घालून ताकद वाढवलेलं, ताण सोसू शकणारं) वापरलेलं असतं. कॉंक्रिटच्या या जाड थरामधून रेडिओ उत्सर्जन आत पोहोचू शकत नाही. यासारखाच दुसरा एक महत्त्वाचा उपयोग म्हणजे आंतरखंडीय क्षेपणास्त्रं आणि त्यांच्यावरील अण्वस्त्रं सुरक्षित ठेवण्यासाठी तयार केलेली महाप्रचंड तळघर बांधण्यासाठी केलेला वापर. त्यांना 'सिलो' म्हणतात. यांची बांधणीसुद्धा तीन–चार फूट जाडीच्या कॉंक्रिटने केलेली असते. शत्रूच्या क्षेपणास्त्रानेसुद्धा विध्वंस होणार नाही, इतकी या सिलोंची रचना पक्की असते. कॉंक्रिटच्या पक्केपणाचा महिमा हा असा आहे.

## मनातलं ओठांवर — मायेचा स्पर्श

काही दिवसांपूर्वीची गोष्ट. काय झालं होतं कुणास ठावूक पण घरातल्या त्या आजी खूप चिडल्या होत्या. '' कुणी माझ्याकडे लक्ष देत नाही. कुणाला माझी काही किंमत नाही, असा त्यांचा सूर होता. आजींचा त्रागा सर्वांना ऐकू येत होता; पण घरातले सगळे आपापल्या कामात होते. आजींसाठी कुणालाच वेळ नव्हता. त्या घरात एक लहानसं मूल होतं. दीड दोन वर्षांचं. सगळंच काही त्याला समजत नव्हतं; पण बहुधा आजी रागावली आहे, हे त्याला कळलं. आजूबाजूचा पसरलेला खेळ सोडून ते डुलत डुलत उठलं. अडखळती पावलं टाकत आजीजवळ गेलं आणि त्यानं आजीच्या गालांना हळूच हात लावला. क्षणार्धात आजीचा रंगच बदलला. त्या चिमुरड्याला त्यांनी जवळ ओढून घेतलं. आणि त्याच्याशी लाडानं बोलू लागल्या. खेळू लागल्या.

घरातलं वातावरणही बदललं. उगीचच पसरलेला ताणही सैल झाला. मायेच्या स्पर्शाची तहान प्रत्येकाला असते. मग असा छोटासा क्षण...मायेचा स्पर्श..., कौतुकाचे शब्द..., प्रसन्न हास्य मनातल्या नाराजीचा क्षणात निचरा करुन दिवसभराची ताकद देतो.

## पंचांग

**रविवार ५ ऑक्टोबर २०२५**

विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
अश्विन शु. १३, चंद्रराशी : कुंभ,
योग : गंड,
नक्षत्र : शततारका, पू. भाद्रपदा
सूर्योदय : ६.३२, सूर्यास्त : ६.२२

## फॉरवर्डस

**आज़ क़िसी नें हमसें पुछा क़ुछ लोग़ आपकों पसंद क़्यों नहीं करतें...**

**हमनें भी हँसकर ज़वाब दियां इन्सान हैं पैंसा तों नहीं ज़ो सबकों पसंद आ जाऊँ...!**

## वाचा तर खरं

तुम्हाला टीव्हीवरील क्राईम शोज बघायला आवडतात का? गुन्हेगारी जगताविषयीचे चित्रपट पाहताना तुम्ही अगदी रमून जाता का? या प्रश्नांची उत्तर होकारार्थी असतील तर सावध व्हा... कारण असे कार्यक्रम बघणारे लोक जगाकडे संशयी नजरेने पाहतात असं एका संशोधनातून समोर आलं आहे. हे लोक साध्या गुन्ह्यांकडेही गांभीर्याने पाहतात. ते कोणाकडेच निखळ दृष्टीने पाहू शकत नाहीत. त्यामुळेच त्यांचा मित्रपरिवार मर्यादित असतो असं तज्ज्ञ सांगतात.

## करिअरवाटा — मुलाखतीनंतरचे उपचार

नोकरी मिळणं अधिकाधिक कठीण होत असलं तरी याचा ताण घेऊन दडपणाखाली मुलाखत देणं अत्यंत अयोग्य आहे. उमेदवारांनी मनावर दबाव येऊ न देता सहजतेनं मुलाखत दिली तर अनेक चुका टळतील. एखादी मुलाखत झाल्यानंतर कंपनीच्या व्यवस्थापकांना धन्यवाद देणारं पत्र पाठवणंही श्रेयस्कर ठरतं. ती नोकरी मिळणार असो वा नसो, आपलं पत्र गेलं पाहिजे. त्यात मुलाखत देण्याची संधी दिल्याबद्दल व्यवस्थापनाचे आभार मानायला हवे. हा एक संस्कारांचा भाग ठरतो शिवाय आपल्याला त्या कंपनीत काम करण्यात रस असल्याचंही दिसून येतं. अशा प्रकारच्या पत्रामध्ये कोरडेपणाने धन्यवादाचा उपचार पार पाडण्यापेक्षा मुलाखतीदरम्यान निर्माण झालेल्या किंवा उपस्थित झालेल्या एखाद्या मुद्याची चर्चा करावी. काही वेळा आपण एका पदासाठी मुलाखतीला जातो आणि तिथं दुसरी जबाबदारी स्वीकारण्याची ऑफर दिली जाते. ती ऑफर अनपेक्षित असल्यानं उत्तर देता येत नाही. अशा वेळी पत्रातून त्यासंबंधी खुलासा करावा. अशा रितीने पत्र लिहिण्यामध्ये प्रांजळपणा व्यक्त होतोच खेरीज प्रगल्भताही दिसून येते. यातून तुमचं वेगळेपण सिद्ध होण्यास मदत होते.



## खेचाखेची

**किती वाजले?**

लग्ना नंतर पहिल्यांदा माहेरी परतलेली मुलगी आईला सांगते,

'माझ्या सासरकडील कुणालाही घड्याळ समजत नाही.'

.

.

.

सर्व मंडळी मला उठवून विचारतात, 'बघ घड्याळात किती वाजले!'

## वेगळं काही

साधारण ४७ वर्षांपूर्वी अहमेह हर्ग्युनर या ग्रीक व्यक्तीची ग्रीक आणि तुर्की लोकांच्या संघर्षादरम्यान हत्या झाली होती. पण त्याबाबत कोणालाही काहीच माहित नव्हतं. एका कबरीवर अंजीराचं झाड उगवल्याचं पाहून चौकशी करण्यात आली. सायप्रसमध्ये हर्ग्युनर आणि त्याच्या एका साथीदाराला एका गुहेत बंद करून डायनामाइटनी उडवून देण्यात आलं होतं. या स्फोटामुळे गुहेत एक मोठे छिद्र तयार झालं. या छिद्रातून सूर्याचा प्रकाश गुहेत पोहोचला. यामुळे त्याच्या पोटातलं अंजिराचं बी रूजलं आणि त्या रोपट्याचं आता झाड झालं आहे. एखाद्या गुहेत अंजिराचं झाड उगवणं चमत्कारच होता. अधिक संशोधनातूनच हर्ग्युनरच्या मृत्यूची बाब उघड झाली.

## संगोपन — गरज मनमोकळ्या संवादाची

सर्वांगीण विकास तसंच प्रगतीच्या संधी साधण्यासाठी संवादकौशल्य असणं अत्यंत गरजेचं असतं. मुलांमध्ये हे कौशल्य यावं यासाठी पालकांनी काही उपाय योजायला हवेत.



✻ माणसं ओळखीची असोत वा अनोळखी, संवाद साधताना मुलांची देहबोली योग्य असेल याकडे लक्ष द्या. मुलांनी समोरच्या व्यक्तीच्या नजरेला नजर देऊन बोलायला हवं. ✻ मुलांना हस्तांदोलनाची पद्धत शिकवा. बोलताना खांदे सरळ ठेवण्याची सूचना द्या. बोलताना चेहऱ्यावर हास्य ठेवायला हवं. मुलं उद्धटपणे बोलणार नाहीत याची काळजी घ्या. ✻ परक्या लोकांशी बोलताना काय काळजी घ्यायची हे मुलांना सांगा. घरातली महत्त्वाची माहिती त्यांच्यासमोर उघड न करणं, आई–वडिलांच्या कामाच्या वेळांबाबत न सांगणं, अनोळखी व्यक्तीशी फार जवळीक न साधणं, लगट करू पाहणाऱ्यांची माहिती आई–वडिलांना देणं याबाबत मुलांना जागरूक करा. ✻ मुलांना सर्वांशी मोकळेपणाने संवाद साधू द्या. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल. त्यांना व्यक्त होता येईल. जगाच्या स्पर्धेत ती मागे राहणार नाहीत.

## सुडोकू १३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ३ | ५ | | | | २ | ९ | |
| ८ | | | | ७ | ३ | | | |
| | | | | ९ | | ५ | ३ | |
| | | | | | ८ | १ | | २ |
| ६ | | | | २ | | | | ४ |
| ४ | | ७ | ६ | | | | | |
| | ६ | ८ | | ५ | | | | |
| | | | ३ | १ | | | | ६ |
| | १ | ९ | | | | ७ | २ | ३ |


**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ३ | १ | ५ | ४ | ९ | ८ | ६ | २ |
| ८ | ९ | ६ | २ | १ | ७ | ३ | ४ | ५ |
| ५ | २ | ४ | ८ | ३ | ६ | ७ | १ | ९ |
| ४ | ८ | ५ | ६ | २ | ३ | १ | ९ | ७ |
| ६ | १ | ९ | ४ | ७ | ८ | ५ | २ | ३ |
| २ | ७ | ३ | ९ | ५ | १ | ४ | ८ | ६ |
| ९ | ५ | ७ | १ | ८ | २ | ६ | ३ | ४ |
| १ | ४ | २ | ३ | ६ | ५ | ९ | ७ | ८ |
| ३ | ६ | ८ | ७ | ९ | ४ | २ | ५ | १ |

# शब्दकोडे क्रमांक १३



**आडवे शब्द :–**


१) उसने देने घेणे
३) मातीचा कण
५) नाली,चर
६) वाळा
९) काजळ,सुरमा इ.प्रकार
११) चांदी
१३) लोकांचे विचार
१५) चार आठवड्याचा काळ
१६) सोने
१७) वाम
१९) कडक केस
२०) फुलणे,फुगणे
२२) पाषाणहृद्‌यी
२४) रात्र
२६) सीतापती
२८) एकटा,पाश नसलेला
२९) कोय
३०) पिता
३१) ताठा,गर्व
३३) उपस्थित
३४) वाळवंट
३५) पर
३२) डावा
३८) रसपूर्ण
४०) कुंतीचे पाचपुत्र
४२) मौज,गंमत
४३) टिकून राहणे
४५) स्त्रियांची छेड काढणारा
४७) मेहनत,श्रम
४९) पोपट राजाची पत्नी
५०) विश्वासघात
५२) ठाण्याचा रहिवासी
५४) शंकराचा वार
५६) व्यय
५७) घाबरणे
५८) मलई
५९) युद्धास उताविळ झालेला
६२) भिक्षा
६३) मद्य
६४) चानी
६५) गीत
६६) सिंह
६८) मोटार (इं.)
६९) मोठी उथळ वाटी
७०) ओटा,कट्टा
७१) कर्णेंद्रिय
७२) आश्चर्य
७५) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
७६) पायबंद, जनावरांच्या पायाला बांधलेला दोर
७७) खिळे काढण्याचे हत्यार
७८) दया,कीव
७९) बडबड
८०) रममाण
८१) दोन्ही बाजूस तोंडे असून मध्ये जोडलेली पिशवी
८३) भांड्याला पडलेली चीर
८४) टरफल
८५) घराचा मागील दरवाजा

**उभे शब्द :–**

१) उकल होणे,स्पष्टीकरण
२) मुस्लीमांची प्रार्थना पद्धती
३) पराग
४) जन्म (हिं.)
५) पूर्ण नाश
७) बाजूला होणे
८) पाप
९) अंतरिक्ष
१०) संकट, आळ
१२) लोक
१४) नजरेचा तीर
१८) वक्र
२१) दात
२३) कड, पात्राची वरची बाजू
२३) अरण्य
२५) दम, शक्ती,ताकद
२६) गवंडी
२७) एक सुगंधी वनस्पती
३०) इजा
३२) मीठ
३३) भावनाशील
३४) सोनाराचा एक ठसा
३७) अभिप्राय
३९) ✻✻ दाम, दंड,भेद
४०) उपकार
४१) चाकर
४४) फणसातील गर
४६) घोड्याची विष्ठा
४८) (संकट) दूर करणे
५१) गाणे गाणारा
५२) फौजदार,ठाण्याचा प्रमुख
५३) तुटलेले वा बारीक तांदूळ
५४) सुविधा
५५) वाळवंट
५६) घोड्याचे अंग घासणे
५८) तात्पर्यार्थ
६०) चोख सोने
६१) जंगल
६४) पलंग,बाज
६५) थंडावा
६७) सीतेचे वडील
६८) जनावरांचे पिल्लू
६९) समतल
७०) हालचालीवरील नजर
७१) वस्त्र,कपडा
७३) माराची उमटलेली खूण
७४) चटकन,त्वरित
७५) पवित्र
७६) कठोर,पांढुरका रंग
८१) हिंदीत क्षण
८२) अतिशय,पुष्कळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# मेहेंदळे गेले

## नेमके काय गमावले?

**आपण वर्तमानात जगत असलो तरी इतिहासाची नाळ आणि भविष्याचे भान कधीच तुटत नाही. इतिहास आपल्याला परंपरेशी तर भविष्य आधुनिकतेशी बांधून ठेवते. अशा या इतिहासाचा, ऐतिहासिक घटनांचा पुराव्यानिशी परिचय करुन देणारे, तथ्य कथन करणारे आणि विश्लेषणानिशी डोळ्यासमोर इतिहासाचे नेमके चित्र उभे करणारे थोर इतिहास संशोधक गजानन भास्कर मेहेंदळे यांनी हे काम कायम केले... त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**

स्वाती पेशवे



जन्माला आलेला प्रत्येक जीव कधी ना कधी काळाच्या उदरात लुप्त होतच असतो. हा निसर्गनियम आहे. वर्तमानात जगणाऱ्या प्रत्येकाला याचे भान असल्यामुळेच भविष्यातील या एका दिवसाचा सामना करण्याची तयारी असते. मात्र, काही माणसे वर्तमानाबरोबरच इतिहास घडवतात वा वर्तमानाला इतिहासाशी जोडण्याचे काम करतात; साध्या-सोप्या भाषेत इतिहासाचा, त्यातील महत्त्वपूर्ण घडामोडींचा अर्थ समजावून सांगतात आणि त्यांची तर्कसंगत मांडणी आपल्यालाही इतिहासाचे वेड लावते, तेव्हा त्यांचे जाणे इतिहासातील एक वृक्ष उन्मळून पडल्याचे दु:ख देऊन जाते. ज्येष्ठ इतिहास-संशोधक गजानन भास्कर मेहेंदळे यांच्या निधनाने केवळ इतिहासाच्या जाणकारांमध्येच नव्हे तर सर्वसामान्य वाचकांमध्येही हीच भावना दाटलेली दिसली. वयाच्या ७८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आणि महाराष्ट्रातील इतिहाससृष्टीत मोठी पोकळी निर्माण केली. गजानन मेहेंदळे यांचा जन्म १९ डिसेंबर १९४७ रोजी झाला. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे आणि ग. ह. खरे यांच्यासारख्या दिग्गजांची परंपरा त्यांनी पुढे नेली. ५० वर्षांहून अधिक काळ त्यांनी इतिहास संशोधनाला वाहून घेतले होते. शिवचरित्र आणि युद्ध इतिहासाचे ते मोठे अभ्यासक होते. १९७१ च्या बांगलादेश मुक्तीसंग्रामाच्या काळात त्यांनी वार्ताहर म्हणून काम केले होते. युद्धाच्या धगधगत्या अनुभवातून इतिहासाच्या सत्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अधिक धारदार झाली, असेही म्हणता येईल.

मेहेंदळे बहुभाषिक होते. फारसी, मोडी, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन या भाषांवर प्रभुत्व मिळवून त्यांनी ऐतिहासिक दस्तऐवजांच्या माध्यमातून सत्यशोधनाचे काम केले. त्यांनी केवळ छापील ग्रंथांचा आधार घेतला नाही तर मूळ कागदपत्रांचा प्रत्यक्ष अभ्यास केला. त्यामुळे त्यांच्या निष्कर्षांना विश्वसनीयता प्राप्त झाली. त्यांनी 'पुरावा महत्त्वाचा, कल्पना नव्हे' हा इतिहास संशोधनाचा मंत्र कायम जपला. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाचा व्यापक अभ्यास केला. त्यांच्या अभ्यासपूर्ण ग्रंथांमुळे वाचकांना मराठा साम्राज्याच्या सामर्थ्यशाली सैनिकी तसेच राजकीय धोरणांची नव्याने ओळख झाली. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज झाले नसते तर, हा विचार मांडून पर्यायी इतिहासाचा दृष्टिकोनही समोर आणला. यामुळे वाचकांना इतिहासाची नवी बाजू समजण्यास मदत झाली. आपल्या कार्यकाळात त्यांनी सुमारे सात हजारांपेक्षा अधिक मूळ स्रोतांचा अभ्यास केला. त्यांच्या कार्यात नौदल व्यवस्था, किल्ले व्यवस्थापन, कररचना तसेच तत्कालीन आंतरराष्ट्रीय घडामोडींचा संदर्भ आढळतो. त्यांनी टिपू सुलतानाच्या कारकिर्दीचे वस्तुनिष्ठ विश्लेषणही केले, जे पारंपरिक धारणांपेक्षा भिन्न दृष्टिकोन देणारे ठरले. त्यांच्या कार्यामुळे मराठा साम्राज्याबद्दलचा अभ्यास अधिक शास्त्रशुद्ध झाला, असेही आपण म्हणू शकतो.

विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी तथ्याधारित दृष्टीकोन रुजवण्यात त्यांचा या कामाचा मोलाचा वाटा मान्य करावाच लागेल. अनेक आंतरराष्ट्रीय विद्वानांनीही त्यांच्या संशोधनाचा संदर्भ दिला असल्यामुळे भारतीय इतिहासाचा दर्जा उंचावण्यास मदत झाली. तसेच, आपला इतिहास जगापर्यंत पोहोचणे शक्य झाले. मेहेंदळे यांचे हे योगदानही फार मोठे आहे. त्यांनी केवळ इतिहास अभ्यासकांना खाद्य पुरवले नाही तर व्याख्यानांच्या आणि लेखनाच्या माध्यमातून सर्वसामान्य वाचकांमध्येही इतिहासाबद्दल उत्सुकता आणि अभिमान निर्माण झाला. म्हणून या क्षेत्रातील 'दीपस्तंभ' अशीच त्यांची ओळख राहिली आणि असा दीपस्तंभ कोसळतो तेव्हा होणारे नुकसान खूप मोठे असते. गजानन मेहेंदळे यांच्या जाण्याने संशोधन क्षेत्राचे असे नुकसान झाले आहे. अर्थात ग्रंथसंपदेच्या रूपाने ते कायम स्मरणात राहतील. इतिहासातील वस्तुनिष्ठता, पुराव्यावर आधारित दृष्टीकोन आणि धाडसी प्रश्न विचारण्याची वृत्ती ही त्यांची वैशिष्ट्ये नव्या पिढीला एखाद्या दीपस्तंभासारखाच मार्ग दाखवत राहतील.

गजानन मेहेंदळे यांना शालेय जीवनापासूनच इतिहास हा विषय आवडत होता. त्यांनी १९६९ मध्ये पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळात पाऊल ठेवले आणि अभ्यास करण्यास सुरुवात केली. यामुळेच त्यांना युद्धशास्त्र या विषयाची गोडी लागली. वयाच्या १८ व्या वर्षापासून त्यांनी युद्धशास्त्राचे वाचन आणि अभ्यास असे दोन्ही सुरू केले होते. मेहेंदळे यांनी वयाच्या २४ व्या वर्षी पत्रकार म्हणून बांगलादेशमध्ये जाऊन तेथील युद्धजन्य परिस्थितीचा अभ्यास केला. युद्ध सुरू होण्याच्या सात महिने आधी ते तिथे होते. त्यामुळे त्यांना जवळून आणि बारकाईने हा अभ्यास करता आला. भारत आणि बांगलादेश यांच्यात युद्ध सुरू झाल्यानंतरही मेहेंदळे हे बांगलादेशमध्ये होते. तेथील अनेक भारतीय लष्करी अधिकाऱ्यांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या. युद्धविराम झाल्यानंतर मेहेंदळे भारतात आले. बांगलादेश युद्धावर त्यांनी एक पुस्तकही लिहिले. त्यानंतर त्यांनी पुणे विद्यापीठातून सामरिकशास्त्र या विषयात एम.ए. ही पदवी घेतली. त्यावेळी युद्धतंत्राचा अभ्यास करताना ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धशास्त्राकडे आणि कौशल्यांकडे वळले. तसेच, त्यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्राचाही अभ्यास केला. त्यासाठी मेहेंदळे मोडी लिपी शिकले. तसेच फारसी, उर्दू, जर्मन, फ्रेंच आणि पोर्तुगीज या भाषाही शिकले. छत्रपती शिवाजी महाराजांचा अभ्यास करण्यासाठी ते भारतभर फिरले होते. त्यानंतर त्यांनी इंग्रजीतून शिवचरित्र लिहिले. इतकेच नाही, तर मराठीतूनही विपुल लेखन केले. १६५८ पर्यंतच्या इतिहासावर त्यांनी १६५० हून अधिक पाने लिहिली आहेत.

मेहेंदळे यांची 'शिवाजी हिज लाइफ अँड टाइम्स', 'शिवछत्रपतींचे आरमार,' 'आदिलशाही फर्माने', 'टिपू अॅज ही रिअली वॉज', 'मराठ्यांचे आरमार', 'शिवचरित्र खंड १ आणि २', 'शिवाजी झाला नसता तर' ही गाजलेली पुस्तके. ते शिवचरित्रावर व्याख्यानही देत असत. शिवाजी महाराजांना इतिहासातून काढले, तर आपला इतिहास कुठे जातो आणि इतिहासात त्यांचा समावेश केला तर इतिहास कुठे जातो हे अभ्यासणे महत्त्वाचे आहे. इस्लामी राजवटींना छत्रपती शिवरायांनी रोखले होते, ते हे जर कळले, तरच आपल्याला शिवचरित्र कळले असे म्हणता येईल, असे मेहेंदळे यांनी एका ठिकाणी म्हटले होते. त्यांनी २००० ते २०१७ अशी १७ वर्षे पहिले आणि दुसरे महायुद्ध या दोन्हींचा सखोल अभ्यास करून सुमारे ६ हजार पानांचे लेखन पूर्ण केले. त्यातही गुप्त संदेश उलगडणे आणि त्यांचे वाचन करणे या विषयावर त्यांनी एक पुस्तक लिहिले आहे. मेहेंदळे सध्या इस्लामची ओळख आणि औरंगजेब या विषयावर संशोधनपर लेखन करत होते. ते मिलिटरी सायन्सचे द्विपदवीधर होते. त्यांचा अनेक भाषांसह इतिहासातील लिप्यांचा अभ्यास होता. दुसऱ्या महायुद्धावरच्या पुस्तकाची सुमारे ५ हजार पाने लिहून प्रकाशित होण्यासाठी तयार झाली आहेत. शिवचरित्र हा विषय १९६९ मध्ये त्यांनी अभ्यासाला घेतला, तेव्हापासून अखेरचा श्वास घेईपर्यंत अखंडपणे त्यांचा हा ज्ञानयज्ञ सुरू होता. त्यातून आजवर त्यांनी दोन मराठी आणि एक इंग्रजी संशोधनपर ग्रंथ सिद्ध केले.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे आणि ग. ह. खरे यांची परंपरा पुढे नेणाऱ्या मेहेंदळे यांनी गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ इतिहास संशोधन कार्याला वाहून घेतले होते. मेहेंदळे यांनी इंग्रजी भाषेतूनही एक शिवचरित्र लिहिले आहे. त्यांनी महाविद्यालयात प्रवेश करतानाच दुसऱ्या महायुद्धावरील चर्चिलचे खंड वाचले होते. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात त्यांनी युद्धपत्रकार म्हणून काम केले आहे. तत्कालीन पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानच्या सीमांवर जाऊन त्यांनी काम केले. त्या युद्धाचा सखोल अभ्यास आणि प्रत्यक्ष अनुभव यावरून त्यांनी एक छोटेखानी पुस्तक लिहिले. भारतीय लष्कराने त्यातील काही तपशील गाळण्यास सांगितल्यावर मेहेंदळे यांनी नकार दिला आणि ते पुस्तक प्रकाशित केले नाही. या प्रकरणामुळे आलेले वैफल्य घालवण्यासाठी त्यांनी शिवाजी महाराजांवर एक छोटे पुस्तक लिहिण्याचे ठरवले. लष्कराच्या स्टाफ कॉलेजमधील अभ्यासक्रमात 'शिवाजी' हा दहा गुणांचा विषय होता. त्या परीक्षेला उपयुक्त होईल असे मार्गदर्शनवजा पुस्तक लिहिण्याचा मेहेंदळे यांचा मानस होता. त्यांनतर ते शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा अभ्यास करू लागले.

पुण्यातील भारत इतिहास संशोधन मंडळात जाऊन मेहेंदळे यांनी शिवकालीन कागदपत्रांचा अभ्यास केला. शिवकालीन कागदपत्रे वाचण्यासाठी ते मोडी लिपी, तसेच फारसी, उर्दू, काही प्रमाणात पोर्तुगीज भाषा शिकले. त्यांनी तीस वर्षे या विषयाचा अभ्यास केला. त्यानंतर श्री राजा शिवछत्रपती हा मराठी ग्रंथ आणि 'शिवाजी: हिज लाईफ अँड टाईम' हा इंग्लिश ग्रंथ प्रकाशित केला. यापैकी श्री राजा शिवछत्रपती हा द्विखंडात्मक ग्रंथ शिवपूर्वकाळापासून अफजलखान वधापर्यंतची माहिती देतो तर 'शिवाजी: हिज लाईफ अँड टाईम' हा ग्रंथ शिवपूर्वकाळापासून शिवाजी महाराजांच्या निधनापर्यंतची माहिती देतो. 'श्री राजा शिवछत्रपती' या ग्रंथात शिवचरित्राबरोबरच इतिहासलेखन पद्धती, ऐतिहासिक साधने या विषयांवरही विस्तृत प्रकरणे आहेत. मेहेंदळे हे क्रियाशील संशोधक होते. इतिहासातील सत्य आणि असत्य हे उघड करणे हा त्यांचा आवडता विषय होता. सध्या ते 'इस्लामची ओळख आणि औरंगजेब' या विषयावर संशोधन आणि लेखन करत होते. भांडारकर संस्था, भारत इतिहास संशोधक मंडळ तसेच विविध संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. शिवाजी महाराजांच्या चरित्राच्या सखोल अभ्यासासाठी ते मोडी लिपीबरोबरच फारसी, उर्दू, जर्मन, फ्रेंच, पोर्तुगीज अशा भाषा शिकले. संदर्भ मिळवण्यासाठी अभ्यासकांशी चर्चेसाठी ते भारतभर फिरले. मेहेंदळे अनेकविध संस्थांचे मार्गदर्शक म्हणूनही महत्वाची भूमिका बजावत होते. **

# 'रौद्ररूप धारण केलेला पाऊस'



धनंजय शेटये

या वर्षातील पर्जन्यधारेने निसर्गाच्या साऱ्या नियमांना आणि मानवाच्या 'अतिथी देवो भव' या उदात्त संकल्पनेला अक्षरशः पायदळी तुडवले आहे. मे महिन्याच्या मध्यान्हीपासूनच कोकणभूमीच्या वेशीवर लागलेली ही पावसाची धडाकेबाज हजेरी, आजमितीस कुठल्याही विरामचिन्हाशिवाय अखंडितपणे कोसळत आहे. जणू काही आकाशातील जलदेवतेने पृथ्वीवर आपला तळ ठोकला आहे आणि 'जपून पाऊल टाक' असा दंडकच जणू सजीवसृष्टीला घालून दिला आहे.

सण, उत्सव, धार्मिक सोहळे, सांस्कृतिक संमेलनेया मानवी जीवनातील आनंदाच्या प्रत्येक क्षणावर या पावसाळी पाहुण्याने आवश्यकतेपेक्षा जास्तच आणि बेमालूमपणे आपली सत्ता गाजवली. मुंबई-पुण्यासारख्या महानगरांतून आपल्या मातीकडे परतणाऱ्या आप्तेष्टांना, लग्न-साखरपुड्यासारख्या मंगलमय समारंभांना, पाचपरतावण आणि मंदिरवर्धापन दिनासारख्या पारंपरिक सोहळ्यांना या जलवृष्टीने आपल्या अखंड सरींनी जणू गुंडाळूनच टाकले. उत्साहाचा भरलेला घडा ओसंडला, रंगीबेरंगी सोहळ्यांवर पावसाच्या काळ्या ढगांचे विषण्ण आवरण पसरले.

**उत्साहावर पाण्याचे विरजण**

ज्या गणेशोत्सवाच्या आगमनाने महाराष्ट्राच्या नसानसांत चैतन्य संचारते, तोही या पावसाच्या 'धडाकेबाज दौऱ्याने' अक्षरशः थरारून गेला. मित्रमंडळींच्या घरी दर्शनाला जाण्याची इच्छा होती, पण गावच्या पायवाटेवरच्या चिखलाने माखलेल्या पाणंदी आणि पावसाच्या रिपरिप सरींनी तो प्रवास नुसता कटकटीचाच नाही, तर दुष्कर बनवला. भजन-कीर्तनाच्या श्रवणसुखासाठी निघालेल्या भाविकांना वाटेत पावसाच्या झोडपणाऱ्या सरींनी श्रद्धेच्या ऊर्मीवर अक्षरशः विरजण घालण्याचे काम केले. आता नुकताच पार पडलेला नवरात्रोत्सव.. सायंकाळ होताच पावसाने हजेरी लावून दांडिया आणि गरब्याचा सारा साज विझवून टाकला. मुंबई-पुण्यासारख्या शहरांतील भव्य मंडपांत विराजमान झालेल्या देवीच्या मूर्तीसमोर भक्तगणांचा अफाट उत्साह होता, पण मुसळधार पावसामुळे मंडपातील व्यवस्था अक्षरशः कोलमडली. मंडळाचे व्यवस्थापक हताश झाले, तर लोकांचा उत्साह, नाचगाणी, देवीची आरतीसगळेच गढूळ पाण्यात बुडून गेले.

**रौद्रावतारामागचे गुपित: मानवी हव्यास**

हा पाऊस कधी न थांबणारा, कधी नकोशा वेळी येणारा, कधी धडाक्याने कोसळणारा तर कधी रिपरिप सरींनी मनाला भुरळ घालणारा असला तरी, तो जगातील प्रत्येक सजीवाला जीवनदान देणारी निसर्गाची अनुपम देणगी आहे, हे विसरता येणार नाही. तथापि, त्याचे हे वेळी-अवेळी होणारे प्रचंड आगमन हे मानवाच्या अमर्याद हव्यासाचे आणि पर्यावरणाच्या विनाशाचे थेट परिणाम आहेत, याची तीव्र जाणीव आता प्रत्येकाच्या मनाला व्हायला हवी. मानवाने स्वतःच्या क्षुल्लक सुखसोयींसाठी वनराईचे उदरनिर्वाह केले, नद्या-नाले-खाड्यांना गिळंकृत केले, औद्योगिक धूर आणि कार्बनचे विष आकाशात सोडून ढगांनाही विषारी केले. यामुळे निसर्गालाही आता आपली प्रचंड ताकद दाखवावी लागते आहेढगफुटी, महापूर, भूकंप, आणि दुष्काळ यांसारख्या भीषण आपत्तींच्या रूपाने. निसर्ग हा आईसारखा आहेतो भरभरून देतो, पण अन्याय, शोषण आणि विनाशाला तो काही काळ सहनही करतो; मात्र जेव्हा सीमेचे उल्लंघन केले जाते, तेव्हा तोच निसर्ग रौद्रावतार धारण करतो.

**कृषी क्षेत्रावरचा आघात आणि दोष कुणाचा?**

यावर्षीच्या पावसाने तर अक्षरशः सगळ्यांनाच झोडपून काढले. या अतिवृष्टीने शेतकरी बांधवांच्या शेतीचे अतोनात नुकसान केले. त्यांची उभी पिके पाण्याखाली गाडली गेली, तर गुरे-वासरे, गुरेढोरे पुरात मृत्युमुखी पडली किंवा वाहून गेली. हवालदील झालेला शेतकरी हताश होऊन आपल्या उद्ध्वस्त झालेल्या शेताकडे पाहताना हंबरडे फोडत होता.बिचाऱ्या शेतकऱ्यांची यात काहीच चूक नव्हती, पण चूक होती ती बेकायदा अतिक्रमण करणाऱ्या, निसर्गाच्या मुळावर उठलेल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची! वारेमाप जंगलतोड आणि बेकायदा बांधकामाला परवाने देणाऱ्या भ्रष्ट शासकीय यंत्रणेची ती मोठी चूक होती. खाड्या-तलावांच्या जागा बुजवून निसर्गावर अतिक्रमण करून बकाल शहरे वसवली जात आहेत. आपणच जर असे निसर्गावर 'विजय' मिळविण्यासाठी झटत राहिलो, तर मग निसर्गाला सुद्धा असा रुद्रावतार दाखवावाच लागतो, यात नवल ते काय?

**आता गरज आहे ती कृतीची**

पावसाला दोष देऊन काहीच साधणार नाही. आपणच निसर्गाचा अपमान केला आहे, आपणच ऋतुचक्र ढासळवले आहे. म्हणूनच आता 'पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन' हेच एकमेव आणि सर्वोच्च कर्तव्य आहे. शहरी भागात हरितपट्टे निर्माण झाले पाहिजेत, गावागावांत वृक्षारोपण झाले पाहिजे, समाजाने एकत्र येऊन वनीकरणाला चालना दिली पाहिजे. जेव्हा पर्यावरण संतुलित राहील, तेव्हाच पाऊसही योग्य वेळी, योग्य प्रमाणात येईल. निसर्गाचे औदार्य अमर्याद आहेतो सतत देतच असतो. पण माणसांच्या हव्यासालाही मर्यादा नाहीत. माणूस निसर्गाला शोषून घेत आहे, मुळासकट उखडून खात आहे. आज वेळ आली आहे की मानवाने निसर्गाला शत्रू नव्हे, तर मित्र मानले पाहिजे.

**'निसर्गाचा सन्मान करा, तोच तुमच्या जीवनाचा प्राण आहे.**
**निसर्गाशी एकरूप व्हा, तोच तुमच्या आनंदाचा गाण आहे.'**

निसर्ग आणि मानव यांचे एक अतुट मैत्रीचे नाते आहे, पण या मौल्यवान नात्याला मानवच विसरत चालला आहे. निसर्गाशिवाय माणसाला शून्य किंमत आहे. पण मानवाला हे कधी कळणार? निसर्गाच्या संपन्नतेची जपणूक करा. संवर्धन करा. निसर्ग कोणालाच कधी उपाशी ठेवत नाही. पण आपण हव्यासापोटी सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबडीलाच कापून खायला चाललो आहोत, तर मग निसर्ग तरी कसा गप्प बसेल म्हणा?

**'निसर्गाचे जतन हेच मानवाचे शाश्वत भविष्य आहे!'**

पावसाची किती ती रुपं? कधी रागवणाऱ्या रुसणाऱ्या प्रियसी सारखा... आठवडा आठवडा दडी मारणारा. तर कधी मुद्दामहून माहेरी ठाण मांडून बसणाऱ्या नणंदेसारखा. पण कितीही आपण पावसावर रागावलो तरी पाऊस हा दरवर्षी न चुकता आपल्यासाठी येतोच. माझं गोळवण गाव जगाच्या पाठीवर असे गाव आहे जिथे वृक्षांना दैवतासमान मानले जाते. गावाच्या नावातच 'गोलवन' म्हणजे सभोवताली 'वन' म्हणजे जंगल आहे. झाडे झुडपे आहेत. पुढे अपभ्रंशाने 'गोलवन'चे 'गोळवण' असे नामकरण झाले. नावातच निसर्गाचे अस्तित्व वसलेले आहे.गावात वनराई आहेत, पुरातन काळापासूनची मोठमोठाली आंब्याफणसाची, रतांबा, वड, पिंपळ, ऐन, सातीवण, शिवन, किंदळ, हळदीवा, बिब्वा, काटेअसन, त्रिफळा, काटेसावर, अंबाडी, चिंच अशा नानाप्रकारची झाडे आहेत. इथली माणसं निसर्गावर जीवापाड प्रेम करतात. देवाची वनराई म्हणून झाडांना कोयताही लावणार नाहीत. कारण त्या वनराईचा 'राखणदार' हाच आमचा देव आहे. निसर्गाची रक्षण करणारा तो 'राखणदार' निसर्गाचे संतुलन आणि संवर्धन करणारा आहे आणि म्हणून कोकणी माणूस नैसर्गिक आपत्तीत कधी डगमगले नाहीत, कारण निसर्गाचा 'खरा राखणदार' निसर्गच आहे. पण त्यासाठी निसर्ग हाच आपला देव आहे उमगायला हवे. **



# स्त्रीपात्र पुरुषाने का करावे?

निलेश साठे

बऱ्याच चित्रपटांमध्ये आणि टीव्ही मालिकांमध्ये पुरुषाने स्त्री पात्र उत्तम प्रकारे साकारलेले आहे. कित्येक नटांनी स्त्रीपात्र अजरामर सुद्धा केले आहे. तो काळ वेगळा होता. परिस्थिती वेगळी होती. काळानुरूप प्रेक्षकांनी ते पचवलं सुद्धा. आज इथे असा प्रश्न पडतो की पुरुषाने स्त्री पात्र का साकारावे. बऱ्याचश्या टीव्ही मालिकांमध्ये पुरुष स्त्री पात्र साकारताना दिसतात. खरंच ती गरज आहे का. की कॉमेडीच्या नावाखाली प्रेक्षकांवर ते थोपवलं जातंय. खरे पाहता आपल्याकडे एक से बढकर एक अशा स्त्री कलाकार आहेत. आणि त्या सर्व प्रकारच्या भूमिका उत्तम प्रकारे साकारतात. विनोदाचच म्हणायचं झालं तर विनोदाची महाराणी उपाधी मिळवलेल्या आपल्याकडे कितीतरी कलाकार आहेत. विशाखा सुभेदार, नम्रता संभेराव, शिवाली परब, वनिता खरात, ईशा डे, चेतना भट व रसिका वेंगुर्लेकर या तारका कॉमेडीमध्ये कुठेच कमी पडत नाहीत. यांच्या कॉमेडीची उंची गगनचुंबी म्हटलं तर वावगं ठरणार नाही. निर्मिती सावंत व प्राजक्ता हनमघर याही तारका काही कमी नाहीत. मग इतकं जर टॅलेंट कुटून कुटून भरलेलं असेल आणि सौंदर्यातही या तारका कुठेही कमी नाहीत असं असेल तर मग पुरुषाने स्त्री पात्र का साकारवे.

भाऊ कदम, प्रसाद खांडेकर, सागर कारंडे कधी कधी समीर चौगुले देखील स्त्री पात्र साकारताना दिसतात. अर्थात हे सगळे दिग्गज कलाकार आहेत. यांच्यात टॅलेंटची कुठेही कमी नाही. अफलातून अभिनय करत असतात. आणि आम्हा प्रेक्षकांना पोट धरून हसवत असतात. परंतु, पुरुषाने स्त्री पात्र साकारणे याचं प्रमाण इतकं झालं आहे की त्यावर जाहीर रित्या बंदी करावी असे वाटू लागले आहे. स्त्री पात्र साकारताना अभिनयाचा कस लागतो त्यात हे कलाकार कुठेही कमी पडत नाहीत हे मान्य. पण मग तुम्ही स्त्री कलाकारांना कमी समजतात कि काय. आपल्याकडे अनेक उत्तम अभिनेत्री आहेत. त्यांनी त्यांची अभिनय क्षमता जगाला दाखवून दिली आहे. मग असं असताना पुरुषांना साडी परिधान



करून स्त्री पात्र का करावे लागत आहे. श्रेया बुगडे किती भारी अभिनय करते. काय तिच्यामध्ये कमी आहे. दिसायलाही सुंदर आहे. कोणतीही भूमिका लिलया पार पाडते. मग तिच्यासमोर पुरुषाने स्त्रीचं ढोंग का करायचं. आणि टॅलेंट शोधायचं असेल तर संपूर्ण महाराष्ट्र उत्तम अभिनेत्रींची खाण आहे. पुरुष नटाने पुरुषाचेच काम करावं. स्त्रीला तिचे काम करू द्यावे. तिला कुठेही कमी लेखले जाऊ नये. कलाकार हा कलाकार असतो. त्याला आपली कला सादर करायची असते. मिळेल ते काम त्याने उत्तम प्रकारे करायचं असतं. परंतु, पुरुषाने स्त्री पात्र साकारणे याचा अतिरेक झाला आहे. स्त्रियांना स्त्रीपात्र करू द्यावे. पुरुषाने त्यात अतिक्रमण करू नये. आणि टॅलेंटचच म्हणायचं झालं तर महाराष्ट्र एकदा पिंजून तर काढा भरपूर टॅलेंट असं उभारून येईल. ज्यांना संधी मिळाली नाही असे भरपूर टॅलेंट बाहेर महाराष्ट्रात फिरत आहे. सर्वोत्तम स्त्री कलाकार आपल्याकडे आहेत. कितीतरी उत्तम दर्जाच्या चांगल्या अभिनेत्री होऊन गेल्यात. आताही आहेत. अजूनही उत्तम आणि दर्जेदार अभिनय करणाऱ्या अभिनेत्री महाराष्ट्रला मिळतील. शोधा तर खरं. महिला अभिनेत्रींना कुठेही कमी न लेखता त्यांना त्यांचं काम करू द्यावं. तिला सुद्धा लाभू दे एखादी उपाधी विनोदाची सम्राज्ञी, विनोदाची पट्टराणी, विनोदाचा खळखळता झरा. अर्थात हे माझं वैयक्तिक मत आहे. प्रेक्षकांना काय हवं ते संबंधित जाणकारच ठरवतील. **

# स्वार्थसमभाव : आंतरराष्ट्रीय सौदार्याची दांभिकता

**प्रतिक कोळी**

कोकीळ पक्ष्याची एक वैशिष्ट्यपूर्ण प्रवृत्ती आहे ती स्वतः घरटे बांधत नाही. ती दुसऱ्या पक्ष्यांच्या घरट्यात आपले अंडे घालते, आणि तिचे पिल्लू उबून बाहेर आले की, ते इतर अंडी किंवा पिल्लांना घरट्याबाहेर फेकून देते. निसर्गाच्या दृष्टीने ही ''जगण्यासाठीची युक्ती'' आहे पण माणसाच्या समाजात, हीच प्रवृत्ती स्वार्थ, दांभिकता आणि सत्तेचा गैरवापर म्हणून ओळखली जाते.

आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात, विशेषतः अमेरिका, पाकिस्तान, दुबई आणि भारत यांच्या संबंधांत, हीच ''कोकीळ प्रवृत्ती'' स्पष्ट दिसून येते जिथे शक्तिशाली देश आपले अंडे दुसऱ्याच्या घरट्यात घालतात, आणि नंतर त्या घरट्यातल्या पक्ष्यांना बाहेर फेकतात.

जगाच्या राजकारणात आज एक विचित्र संगीत वाजतंय. सूर भारताचा, ताल अमेरिकेचा, आणि तबला पाकिस्तान-दुबईचा. कोणालाच ठराविक लय नाही, पण सगळे आपापल्या हितसंबंधाचा ठेका पाळतायत. हे संगीत एकतेचं नाही, तर स्वार्थाचं आहे आणि या सगळ्या गोंधळात भारत एकटा, आपलं घरटं वाचवत बसलाय. ही परिस्थिती जशी दिसते तशी नाही; कारण जगाच्या महासत्तांच्या राजनैतिक घरट्यात कोकीळेची पिल्लं उबवली जातायत आणि भारतासारख्या राष्ट्रांवर त्या सावल्या पडतात.

अमेरिका स्वतःला जगाची लोकशाही शिकवणारी ''आई'' समजते. पण ती आई अशी आहे की स्वतःच्या घरात नीती सांगते आणि शेजाऱ्यांच्या घरात विष पेरते. भारताशी ''रणनीतिक मैत्री'' म्हणत हात मिळवते, आणि त्याच वेळी पाकिस्तानच्या खिशात डॉलर आणि शस्त्रं घालते. हा संबंध म्हणजे एका घरट्यात अंडं ठेवून दुसऱ्याच्या पिल्लांना बाहेर फेकणं.

**कोकीळेचा आधुनिक अवतार!**

दुबईची गोष्टही तितकीच रंगीत आणि सुगंधी. भारतातील कामगार, अभियंते आणि उद्योग यांच्यामुळे दुबईचा अर्थकारणाचा वाळवंट फुलला, पण तरीही पाकिस्तानला तेल आणि सॉफ्ट-कार्नर देताना त्यांना कसलीच हयगय वाटत नाही. त्यांच्या दृष्टीने भारत हा ''आर्थिक मित्र'', आणि पाकिस्तान ''धोरणात्मक प्यादा.'' दोन्हींचा वापर करायचा, पण कोणाच्याही सोबत उभं राहायचं नाही. पु.ल. अत्रेंच्या भाषेत सांगायचं तर ही नीती नाही, ही ''नाती आणि नोटा'' यांचं मिश्रण आहे!

पाकिस्तान मात्र एक वेगळंच घरटं आहे. त्यात स्वतःच्या नागरिकांचं अंड उबवायला वेळ नाही, पण परक्यांचं उबवण्यात धन्यता आहे. दहशतवादाचं पोषण करायचं, भारतावर हल्ले घडवायचे, आणि मग आंतरराष्ट्रीय पटलावर मानवतेचं गाणं गात बसायचं. त्यांचं राजकारण म्हणजे एका हातात शांतीपाठ आणि दुसऱ्या हातात बंदूक. आणि या दोन्ही हातांमध्ये लपलेला असतो परकीय मदतीचा डॉलर.

भारताचं स्थान या सगळ्या गोंधळात वेगळं आहे. आपलं संविधान, आपली नीती, आपला धर्म हे सर्व मानवतेच्या पायावर उभं आहे. आपण शरणार्थ्यांना आसरा देतो, कारण आपली संस्कृती ''अतिथी देवो भव'' शिकवते. पण आज या करुणेचा गैरवापर सुरू आहे. बांगलादेशी आणि रोहिंग्या शरणार्थी यांचा मुद्दा हेच दाखवतो. मानवतेच्या नावाखाली लाखो परकीय माणसं सीमारेषा ओलांडतात, आणि मग त्याच मानवतेचा वापर राजकीय गणितासाठी केला जातो. काही देश, काही संघटना, आणि काही आपल्या घरातले ''स्वार्थी विचारवाले'' या शरणार्थ्यांचा उपयोग मतांसाठी, धर्मासाठी, आणि अस्थिरता निर्माण करण्यासाठी करतात.




म्हणजे कोकीळेचं अंडं आपल्याच घरट्यात ठेवलं जातं, आणि आपण त्याला दुधावरची साय समजून उबवतो!

बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, ''राजकारण हे समाजसेवेचं साधन असावं, स्वार्थाचं नव्हे.'' पण आज आपल्या देशातील काही युवा नेते, पक्ष, आणि संघटना या विचाराच्या उलट चालतात. ते कोकीळेच्या पिल्लांसारखे आहेत दिसायला आपले, पण गाताना परक्यांचा सूर गातात. त्यांच्या प्रत्येक वक्तव्यात राष्ट्रहितापेक्षा सत्तेचा वास येतो. बाळासाहेब ठाकरे असते तर म्हणाले असते, ''ही पिल्लं नाहीत, ही आयात केलेली कोकीळं आहेत; आणि त्यांची अंडी आपल्या घरट्यात उबवायला आपणच उत्सुक आहोत!''

अमेरिका आणि इतर महासत्ता स्वतःला जगाची शिक्षक समजतात, पण त्यांचा ''मानवाधिकार'' हा शब्द फक्त तिथं वापरला जातो जिथं त्यांचा फायदा होतो. चीनकडून स्वस्त उत्पादन, दुबईकडून पैसा, आणि भारताकडून बाजार ह्या तीन गोष्टींवर त्यांची नैतिकता चालते. जगातील युद्धं ही आता धर्मावर नव्हे तर व्यापारावर लढली जातात. आणि भारतासारख्या देशांना यातून शांततेचं गाणं गाण्याची अपेक्षा ठेवली जाते. पण हे गाणं शांततेचं नाही, तर सहनशीलतेचं परीक्षण आहे.

भारत महासत्ता नसेल, पण मानवसत्ता आहे. आपल्या संविधानात धर्मापेक्षा नीती, सत्तेपेक्षा न्याय, आणि राष्ट्रवादापेक्षा मानवता आहे. आपण जगाला सांगतो की महासत्ता होण्यासाठी अणुबॉम्ब लागतो, पण मानवसत्ता होण्यासाठी फक्त ''माणूसपण'' पुरेसं आहे. त्यामुळे भारताचं अस्तित्व महासत्तांच्या कोकीळ घरट्यांमध्ये नाही, तर आपल्या संविधानाच्या प्रास्ताविकेत आहे.

पण प्रश्न असा आहे की आपण स्वतःचं घरटं ओळखतो का? की महासत्तांच्या गोड आवाजात आपण आपली ओळख हरवतोय? कोकीळेचं पिल्लू निसर्गानं असं बनवलं जगण्यासाठी दुसऱ्याचं घर उद्ध्वस्त करणारं. पण मानवाने तीच प्रवृत्ती सत्ता मिळवण्यासाठी स्वीकारली. आज अमेरिका असो, दुबई असो, पाकिस्तान असो सगळे कोकीळच आहेत. पण खरी शोकांतिका म्हणजे, आपणही त्यांना उब देतोय.

भारताला आता ठरवावं लागेल आपण कोकीळांचं गाणं ऐकायचं की आपल्या घरट्याचं रक्षण करायचं. आपण ''अतिथी देवो भव'' म्हणायचं की ''अतिथी देव असला तरी देश देवापेक्षा मोठा नाही'' हे लक्षात ठेवायचं. संविधान सांगतं ''आम्ही भारताचे लोक...'' या चार शब्दांमध्ये सर्व उत्तरं दडलेली आहेत.

जग महासत्ता बनण्यासाठी संघर्ष करतंय, आणि भारत मानवसत्ता टिकवण्यासाठी. आपण कोकीळेच्या पिल्लांना उबवू नये, एवढीच काळजी घ्यायची आहे. कारण ज्यादिवशी आपण आपल्या घरट्यात परक्याचं अंडं ओळखणं थांबवलं, त्या दिवशी भारत घरटं राहणार नाही ती जागा फक्त गाण्याच्या आवाजाने भरलेली रिकामी फांदी बनेल. **

## विचार प्रवर्तक

# स्वा.सावरकरांचा बुद्धिप्रामाण्यवाद वस्तुस्थिती अन् सद्य:स्थिती

**पुस्तक परीक्षण**

**प्रा. शाम जोगळेकर**

मो. ९२७३३४३१७७

'स्वा. सावरकरांचा बुद्धिप्रामाण्यवाद, वस्तुस्थिती अन् सद्य:स्थिती, अपेक्षा व गरज'' हे सतीश रंगनाथ पोरे लिखित पुस्तक रायगडच्या साहित्यसंपदा प्रकाशनने प्रकाशित केले आहे. ५ सप्टेंबर २०१५ रोजी मॉरिशस येथील पाचव्या स्वा. वि.दा. सावरकर विश्व साहित्य संमेलनात वाचलेला निबंध, या पुस्तकरूपाने प्रकाशित करण्यात आला आहे. या पुस्तकाच्या मुखपृष्ठाची सजावट आणि मांडणी मनोमय मीडियाची आहे.

स्वा. सावरकरांचे व्यक्तिमत्त्व विविधांगी होते. त्यांच्या विविध गुणांमुळे त्यांना अनेक चाहते त्यांच्या जीवनकाळात आणि नंतरही लाभले, लाभत आहेत. सावरकरांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विचार या निबंधात प्रामुख्याने करण्यात आला आहे. विज्ञानयुगाची चाहूल सावरकरांना स्वातंत्र्यपूर्व काळातच लागली होती.

आपण कर्मकांडात गुंतून पडलो आणि स्वातंत्र्य गमावून बसलो, असे सावरकर स्पष्टपणे सांगत असत. ब्रिटिश राजसत्तेशी झगडणाऱ्या या स्वातंत्र्यसेनानीचा देशाभिमान आणि धर्माभिमान आंधळा नव्हता. सामान्यपणे सावरकरांचे स्वातंत्र्ययुद्धातील कर्तृत्व आणि हिंदू धर्माविषयीचा अभिमान या गोष्टी सामान्यांपुढे प्रामुख्याने मांडल्या जातात. ते विज्ञाननिष्ठ होते हे तितकेसे ठासून सांगितले जात नाही. आज ते सांगण्याची नितांत आवश्यकता आहे. आज देशात सावरकर विचारसरणीला पोषक वातावरण निर्माण होत असताना हे अधोरेखित करण्याची गरज असल्याचे लेखकाला वाटते आहे. भारतीय समाजाला अठराव्या शतकातून एकविसाव्या शतकाकडे खेचून न्यायाला वैज्ञानिक दृष्टिकोनच आवश्यक आहे, हे द्रष्ट्या सावरकरांनी ओळखले होते. त्या दृष्टीने त्यांनी आपले इप्सित साध्य करण्यासाठी प्रामुख्याने, शिक्षितांसाठी लेखन आणि व्याख्याने हे माध्यम स्वीकारले. तर सर्वसामान्यांसाठी कृती कार्यक्रम सुरू केले. या दोन्हींमध्ये त्यांचे झपाटलेपण आणि आग्रही वृत्ती दिसून येते. समाजाला धार्मिक श्रद्धांच्या अवडंबरातून, स्तोमाच्या अजगरी विळख्यातून मुक्त करून, उन्नत, नीतिमान आणि विवेकी आचार विचारांच्या पदपथावर समाजाची मार्गक्रमणा सुरू व्हावी, हा त्यांचा अट्टाहास होता. त्यांचा देव म्हणजे देश-राष्ट्र आणि धर्म म्हणजे विज्ञानधर्म-विवेकी दृष्टिकोन. वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धीबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी या स्वदेशी सात बेड्या तोडून, जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, विषमता, उच्चनीचता, घातकप्रथा, देवभोळेपणा या सगळ्या विरोधात रणशिंग फुंकून सामाजिक समता-समरसता यांचा भक्कम पाया त्यांनी केव्हाच बांधून ठेवला आहे. केवळ लेखन आणि भाषणांपुरतीच सावरकरांची विज्ञाननिष्ठा मर्यादित नव्हती, तर प्रसंगी सनातन्यांचा रोष ओढवून त्यांनी आपले विचार आचरणात आणून




दाखविले.

सावरकरांचे विरोधक, टीकाकार यांचे आक्षेप, अस्पृश्यता निवारणाच्या कार्यक्रमात सत्यनारायण का? बुद्धिवादी सावरकर गणेशमूर्तीला का मानतात? मूर्तीपूजा न करणारे सावरकर पतितपावन मंदिर का बांधतात? सकृतदर्शनी विसंगत वाटणाऱ्या या आक्षेपांची एकत्रित आणि एकात्मिक उत्तरे त्यांच्या १९३५ च्या किर्लोस्कर मासिकातील मूर्तीपूजेवरील खास लेखात मिळतात. १९३५ ते आजच्या काळात, याबाबतीत समाजाच्या मानसिकतेत फरक पडला आहे का? पडला तर तो कसा व किती? हे सर्वांनी अंतर्मुख होऊन तपासण्याची आज गरज आहे, असे लेखकाला वाटते.

हिंदू धर्मातील दोष सांगताना त्यांनी इतर धर्मातील धर्मग्रंथांचा डोळसपणे अभ्यास केला होता. सारे धर्मग्रंथ हे मनुष्यकृत आहेत, असे त्यांचे मत होते. धर्मग्रंथाला ते मनुष्याला फसविणारा पिंजरा असे म्हणतात.

'वेदप्रामाण्याऐवजी विज्ञानप्रामाण्य' हाच खरा सावरकरांच्या बुद्धिप्रामाण्याचा गाभा आहे. सावरकर काहींना रुचले नाहीत तर काहींना पचले नाहीत. सतीश पोरे यांच्या मते सावरकरांचे बुद्धिप्रामाण्य हे केवळ विज्ञाननिष्ठ नाही, तर ते व्यवहार्यतेला धरूनच आहे, ही बाब वस्तुनिष्ठतेने तपासून स्वीकारणे गरजेचे आहे. सावरकरांचे बुद्धिवादी विचार चतुरस्त्र होते. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना, त्यांनी 'लेखण्या मोडा अन बंदुका हाती घ्या' ही घोषणा केली होती. देशाच्या संरक्षणाच्या शस्त्रसज्जतेची गरज नंतरच्या काळात तीव्रतेने भासू लागली. गाय एक उपयुक्त पशू, हे त्यांचे मत होते. मात्र जेव्हा सावरकर हिंदू महासभेच्या अध्यक्षस्थानी विराजमान झाले, तेव्हा बहुसंख्याक हिंदूंच्या मतांना न्याय देण्यात देण्यासाठी गोवंशबंदीच्या बाजूने त्यांनी आपले मत दिले, असे सतीश पोरे नोंदवितात. लेखकाच्या मते 'विज्ञाननिष्ठ सावरकर' फार कमी जणांना कळले.

''माझी मार्सेलिसची उडी एकवेळ विसरा पण माझे रत्नागिरीचे कार्य लक्षात ठेवा'' या त्यांच्या शब्दांची आठवण देत लेखकाला म्हणावेसे वाटते की, 'मेक इन इंडिया'साठी सावरकरांचा बुद्धिवाद बुद्धिप्रामाण्याने वैज्ञानिक निष्ठेनेच जोपासायला हवा. सावरकरांच्या वैज्ञानिक विचारसरणीचा विवेकी नंदादीप सातत्याने तेवत राहायला हवा आणि गुणित श्रेणीने वाढायला हवा, उजळायला हवा.

हे छोटेसे पुस्तक (पुस्तिका) विचारप्रवर्तक आहे. सावरकरांना केवळ 'देव' न मानता, त्यांचे वैज्ञानिक विचारसरणीचे बुद्धिवादी विचार प्रत्यक्षात आणणे गरजेचे आहे. काही लहान-मोठे मुद्रण दोष राहून गेले आहेत, ते निश्चितच खटकतात. मलपृष्ठावर लेखकाचा परिचय आणि कार्य, त्यांच्या रंगीत छायाचित्रासह करून दिला आहे. **

**पुस्तकाचे नाव : सावरकरांचा बुद्धिप्रामाण्यवाद**
**लेखक : सतीश पोरे**
**प्रकाशक : साहित्यसंपदा प्रकाशन, पेण**
**प्रथम आवृत्ती : मे २०२५**
**प्रकाशक : स्वागतमूल्य : रु. ५०/-**

# जनसामान्यांचं लाडकं नेतृत्व रविंद्र (काका) ठाकूर

**धनंजय भगत**

श्री क्षेत्र कनकेश्वराच्या कुशीत वसलेल्या सातिर्जे या गावी दि.५ ऑक्टोबर १९६५ या दिवशी दसऱ्याच्या शुभ मुहुर्तावर श्री. शंकर ठाकूर व सौ. पार्वती ठाकूर या दांपत्याच्या पोटी एका गरीब शेतकरी कुटुंबात श्री. रविंद्र शंकर ठाकूर यांचा जन्म झाला. बालपणी त्यांना गरिबीचे चटके सोसावे लागले. आलेल्या संकटांना धैर्याने सामोरे जाणे व समाजाची निःस्वार्थ सेवा करणे ही शिकवण त्यांना त्यांचे वडील बंधू माजी आमदार स्वर्गीय मधुकरशेठ ठाकूर पप्पा यांच्याकडून लहानपणापासूनच मिळाली. त्यांच्या वडील बंधूंनी केलेला संघर्ष, केलेले कष्ट व केलेली जनसामान्यांची सेवा त्यांनी जवळून अनुभवली व त्यातूनच त्यांची जडणघडण होत गेली. वडील बंधूंच्या सुसंस्कारात ते वाढले. त्यामुळेच आपल्या वडील बंधूंप्रमाणे त्यांनीही आजवर समाजसेवेचे व्रत सुरू ठेवले आहे आणि सर्व सामान्यांचे लाडके काका म्हणून प्रसिद्ध झाले आहेत.

काकांचे प्राथमिक शिक्षण इ.१ ली ते इ.४ थी सातिर्जे या गावी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत झाले. तसेच माध्यमिक शिक्षण इ. ५ वी ते इ.१० वी व उच्च माध्यमिक शिक्षण इ.११ वी, इ.१२ वी श्री. स.म. वडके विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, चोंढी -किहीम येथे झाले व वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण जे.एस.एम. कॉलेज, अलिबाग येथे झाले व त्यांनी सन १९८८ मध्ये त्यांनी बी.कॉम. ही पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी पुणे विद्यापीठातून पुढील शिक्षण घेऊन सन १९९० मध्ये एम. कॉम. ही पदवी संपादन केली.

शिक्षण सुरु असतांना काकांनी गरिबी जवळून अनुभवली. शिक्षण घेत असतांना महिना, महिना त्यांनी शेतात नांगरणी केली. लावणी, कापणी, मळणी ही शेतीची सर्व कामे केली.

जिद्द, चिकाटी आणि परिश्रमांच्या जोरावर काका आपली आर्थिक प्रगती करत गेले व एक प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक बनले. व्यवसायातील प्रामाणिकपणा हा महत्त्वाचा गुण त्यांच्या अंगी आहे. बदलत्या काळानुसार काकांनी आपल्या व्यवसायातील प्रगतीचा आलेख उंचावत नेला.

काका म्हणजे आयुष्यातला प्रत्येक क्षण आव्हान म्हणून जगणारी एक व्यक्ती. त्यांच्यासाठी आयुष्य म्हणजे केवळ आनंद आणि मजा असं कधीच नव्हतं. त्यांच्यासाठी आयुष्य म्हणजे येणारा प्रत्येक क्षण आव्हान म्हणून स्विकारणं आणि जिद्दीने त्याला सामोरे जाणं. आयुष्य म्हणजे संघर्ष हे आम्ही शिकलो काकांकडूनच.

आर्थिक प्रगती झाल्यानंतरही काका आपले जुने दिवस विसरले नाहीत. म्हणूनच प्रत्येक गरीब व्यक्तीविषयी त्यांच्या मनात विलक्षण आपुलकी आहे. काका म्हणजे माणसातील माणुसकीची नाती जपणारं, बहुआयामी व्यक्तिमत्त्व. एक प्रेमळ व मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व. अध्यात्मिक विचार, धार्मिक आचरण, सत्कृत्यावर श्रद्धा व समाजसेवी स्वभाव. अशा विविध पैलूंनी समृद्ध व्यक्तिमत्त्व. दिलदार मनाचा दमदार माणूस, लोकांच्या काळजावर प्रेमाचं अधिराज्य गाजवणारा प्रेमळ माणूस म्हणजे काका ठाकूर असा काकांचा सर्वत्र नावलौकिक आहे.

समाजात वावरत असतांना त्या समाजाचे ऋण आपल्यावर असतात. याची जाणीव सतत त्यांच्या मनात असते. आपण समाजाचे खूप काही देणे लागतो आणि समाजाची प्रगती करायची असेल तर हाती सत्ता असावी. हा प्रामाणिक आणि उदात्त हेतू मनात ठेवूनच काकांनी आपले वडील बंधू माजी आमदार स्वर्गीय मधुकरशेठ ठाकूर पप्पा यांच्या प्रेरणेने राजकारणात प्रवेश केला. आपल्या वडील बंधूंना राजकारणात व समाजकारणात सहकार्य केले. त्यांच्या खांद्याला खांदा लावून राजकारणात, समाजकारणात कार्य केले. सावलीप्रमाणे सतत त्यांच्यासोबत राहून त्यांना साथ दिली. ग्रामपंचायत सातिर्जेच्या निवडणूकीत सन १९९४ मध्ये काका सदस्य म्हणून भरघोस मतांनी निवडून आले व ग्रामपंचायतीचे सरपंचपद सन १९९४ ते सन १९९९ या काळात समर्थपणे भूषविले व आपल्या कार्याचा ठसा उमटविला.

सन २००२ साली काकांनी रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्य पदाची निवडणूक मोठ्या जिद्दीने लढवली व भरघोस मतांनी निवडून आले. सन २००२ ते २००७ ही पाच वर्षे ते रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य पद भूषवित असताना काँग्रेस पक्ष प्रतोद म्हणून सुद्धा त्यांनी काम पाहिले. त्यांच्या कार्यकाळात खऱ्या अर्थाने अलिबाग तालुक्यात शासकीय योजना त्यांनी तळागाळातील जनसामान्यांपर्यंत पोहोचविल्या. विकास कामांचा डोंगर उभा केला. रस्ते, पाणी, वीज, आरोग्यसेवा या मुलभूत सुविधा जनसामान्यांपयंत पोहोचविल्या. शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे, कामगारांचे प्रश्न सोडविले. सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले.

अलिबाग तालुक्याच्या सर्वच क्षेत्रातील प्रगतीत काकांचे मोलाचे योगदान आहे. ते राजकारणासाठी राजकारण नाही तर समाजकारणासाठी राजकारण करत आहेत. सामाजिक हिताकरिता त्यांनी नेहमीच आव्हाने स्विकारून अशक्य ते शक्य करून दाखविण्याची किमया वेळोवेळी करून दाखवली आहे. समाजकारण व राजकारण त्यांच्या रक्तात, नसानसात भिनलेले आहे. समाजकारणाच्या वेळी समाजकारण व राजकारणाच्या वेळी राजकारण असे वेगवेगळे भाग हाताळताना आपण त्यांना पाहिले आहे. समाजकारणात राजकारण नाही अशी त्यांची सर्वत्र ओळख आहे. काकांची कामातील कुशलता, कार्यतत्परता व प्रामाणिकपणा या जोरावर त्यांनी केलेला ग्रामपंचायत सरपंच ते जिल्हा परिषद सदस्य हा त्यांचा प्रवास उल्लेखनीय आहे. राजकीय क्षेत्रातील एक सुसंस्कृत चेहरा म्हणून त्यांच्याकडे प्रत्येक जण पहात आहे. एक संवेदनशील व सामाजिक भान असलेलं कृतीशील व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जातं. विकास कामे झटपट मार्गी लागली पाहिजेत हा आग्रह ठेवून ते सतत विकास कामांचा पाठपुरावा करीत असतात. म्हणूनच अनुभवातून येणारे शहाणपण अधिक प्रगल्भ होत गेले. कोणी खोटे बोलले, गैर किंवा चुकीचे वागले तर ते काकांना पटत नाही. त्यामुळे शासन यंत्रणेत व जनमानसात त्यांनी जो दबदबा निर्माण केला आहे, तीच त्यांची खरी ओळख आहे. काकांनी अलिबाग तालुका काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष पद गेली अनेक वर्ष खंबीरपणे सांभाळले आहे. त्यांच्या राजकीय कारकिर्दीत काँग्रेस पक्षाची विचारधारा तळागाळात रुजविण्याचा प्रामाणिक प्रयत्न ते करत आहेत. गेली अनेक वर्षे काँग्रेस पक्ष वाढीसाठी निष्ठेने व प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहेत व काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ आहेत. सर्वसामान्य जनतेवर होणाऱ्या अन्यायाबद्दल काकांच्या मनात विलक्षण चीड आहे. या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी काका प्रसंगी रस्त्यावर उतरून आंदोलनं करतात. महागाई, भ्रष्टाचार या विरुद्ध सतत आवाज उठवत असतात. जनतेच्या विविध प्रश्नांसाठी व रखडलेल्या विकास कामांसाठी शासनाकडे सतत पाठपुरावा करतात, शासनाचे लक्ष वेधतात.



काकांच स्वतःचं भलेपण, सौजन्य आणि चारित्र्य इतकं विलक्षण आकर्षक आहे की त्यांच्याबद्दल नेहमीच प्रत्येकाला आत्मीयता वाटत असते.

राजकारणामध्ये ते विरोधकांना विरोध करायचा म्हणून करत नाही तर ज्या ठिकाणी योग्य असेल तेथे मोठ्या मनाने त्यांचे कौतुकही करतात. विरोधी पक्षांच्या सर्वच वरिष्ठ नेत्यांशी व कार्यकर्त्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. अडचणीच्या प्रसंगी विरोधक जरी त्यांच्याकडे मदत मागायला आला तरी ते त्याला मोठ्या मनाने, सढळ हस्ते मदत करतात. राजकारणात त्यांच कोणाशीही वैर नाही, शत्रूत्व नाही. राजकारणात त्यांच्यासारखं अजातशत्रू व्यक्तिमत्व असणं विरळच. गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी काकांनी आजवर अनेक वेळा आर्थिक सहाय्य केले आहे. अलिबाग तालुक्यात होणाऱ्या कुस्ती, कबड्डी, क्रिकेट स्पर्धा, बैलगाडी शर्यती तसेच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी ते सढळ हस्ते आर्थिक मदत करतात. सर्वसामान्य माणसांच्या सुख-दुःखात ते सक्रीय सहभागी होत असतात व सामाजिक बांधिलकी जोपासत असतात. लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ, चोंढी- किहीम या रायगड जिल्ह्यातील नामांकीत शैक्षणिक संस्थेमध्ये काकांनी सन १९९० ते सन १९९९ या काळात संचालक, सन १९९९ ते सन २००२ या काळात सहकार्यवाह, सन २००२ ते सन २०२३ या काळात कार्यवाह या पदांवर प्रभावीपणे कामकाज केले आहे. दि. २२ ऑगस्ट २०२३ रोजी त्यांची संस्थेच्या अध्यक्षस्थानी बिनविरोध निवड झाली. गोरगरीब मुले शिक्षणापासून वंचित राहू नये या हेतूने ते संस्थेच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक , उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयास सर्वतोपरी सहकार्य व मदत करत आहेत. शाळेच्या, संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अहोरात्र झटत आहेत. शाळेत होणाऱ्या विविध सभा, सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलन, क्रीडा महोत्सव तसेच सर्वच बाबतीत त्यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळत आहे. काका आणि शाळा एक अतूट असं समीकरणच बनलं आहे. त्यांच्यामुळे शाळेत एक वेगळच चैतन्य निर्माण होत असतं. त्यांच्या कार्य कुशल नेतृत्वामुळे संस्थेच्या, शाळेच्या नावलौकिकात निश्चितच फार मोठी भर पडली आहे. काही व्यक्तींचा एखाद्या ठिकाणी जुळलेला संबंध ही विधात्याची देणगी असते. ही देणगी काकांच्या रूपाने शाळेला मिळाली आहे. शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याशी त्यांचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध आहेत. शालेय संस्थेच्या कोणत्याही घटकावर, कोणताही प्रसंग आला तरी ते त्याच्या घरी जाऊन त्याची भेट घेतात, त्याची जातीने विचारपूस करून त्याला मदत करतात. शाळेतील कोणताही कर्मचारी निवृत्त झाला तर त्याच्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाला ते वेळात वेळ काढून आवर्जून उपस्थित राहतात. सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून काकांनी राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा व आरोग्य क्षेत्रात एक नवे विकास पर्व निर्माण केले आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.शिवशंभूच्या पवित्र भूमीत त्यांचा जन्म झाला. या मातीच्या ऋणातून उतराई होण्यासाठी त्यांनी केलेले अविश्रांत परिश्रम हे इतरांना आदर्श व प्रेरणादायी आहेत. आधुनिक समाज घडविण्यासाठी त्यांनी केलेले कार्य चिरकाल स्मरणात राहणारे आहे. राजकारण व समाजकारणात त्यांची कामगिरी उज्वल व दीपस्तंभा सारखी आहे. **


## जीव पाहिजे

दप्तर पाठीवर घेत
तिने घर सोडलं
क्षणात ढगफुटी झाली,
आभाळ फाटलं
जीव मुठीत घेवून
ती पळत सुटली
तितक्यात सरीता माई
वाटतच भेटली
'आलीच मी' म्हणत,
तिच्या मागावर राहिली
चहुकडे सरीतामाई
हक्क गाजवू लागली
माणसं, यंत्र, गुरढोरं,
शेतीही वाहून गेली
रब्बी पिके, खरीप पिके
दिसेनाशी झाली.
घराकडे वळताना तिला
घर ही दिसेना
सरीता माई संगे
काळी माती आसरा देईना
तरीही ती इवलीशी
हिंमत नाही हरली
जगण्याच्या आशेत
बंज्यावर थांबली
आता थोडी माघार
पावसाने घेतली
रौद्ररूपी सरीतामाई
जरा शांत झाली.
सगळं काही झाल्यावर
बातमीदार आले
चिमुरडीला प्रश्नावर
प्रश्न तेवढे विचारले
म्हणाले, 'सांग पोरी,
तुला भिती कशाची?'
डोळ्यापुढे सरीता माई
म्हणाली पाण्याची
बातमीदार म्हणाला, रडू नको
बाळा तुला काय पाहिजे
दप्तर, शैक्षणिक
साहित्य नको.
मला माझा जीव पाहिजे
मला माझा जीव पाहिजे.

**– सौ. केशर वेखंडे, ठाणे**

# महिलांचे मानसिक आरोग्य जोपासणे काळाची गरज



**ॲड. मानसी म्हात्रे**

शारदोत्सवामध्ये सर्व दूर स्त्री शक्तीचा जागर होत असताना स्त्रियांच्या कर्तृत्वाने हे विश्व भारल्याचा भास व्हावा असेच वाटते आहे. परंतु, वास्तव वेगळे आहे. अलिकडच्या काळात स्त्रियांचा प्रवास नवनवीन क्षेत्रांतील अवघड वाटांवरुन सुरु आहे. अंतिम ध्येयापर्यंत पोहचताना प्रत्येक स्त्रियांचीच होणारी धडपड, धावपळ आणि दमछाक पाहत असताना स्त्रीयांच्या आरोग्याच्या तक्रारींमध्ये वाढ होत आहे. स्त्रियांचे मानसिक ताणतणावाचे प्रमाण प्रचंड वाढत आहे. संसार आणि नोकरी व्यवसाय सांभाळण्याची प्रचंड कसरत त्यांना करावी लागते. या सर्वांचा परिणाम प्रचंड तणाव निर्माण करतो. परंतु याबरोबर महिलांचे सक्षमीकरणाकरीता समाजात अपेक्षित बदल होत आहेत हे स्वागतार्ह आहे.

सर्व समाजातील कौटुंबिक बंधने झुगारुन स्त्रिया आत्मनिर्भर होत आहेत. स्वातंत्र्यपूर्व कालीन स्त्रीचं अस्तित्व आणि स्वातंत्र्यानंतर स्त्रीचं सामाजिक आणि कौटुंबिक स्तरावर असलेले अस्तित्व हे पूर्णपणे बदललेले आहे.

ज्योतिबा फुलेंनी स्त्री शिक्षणाचा विचार दिला, सावित्रीबाईंनी शिक्षणाचा पाया रचला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांना मुख्य प्रवाहात आणण्याकरीता राज्यघटनेत मोलाची तरतूद केली. शासन दरबारी, समाजात, नोकरी व्यवसायात स्त्रिया सहज वावरु लागल्या आहेत. आज आम्हा भारतीय स्त्रियांचं पाऊल हे स्त्री पुरुष समानतेच्या वाटेवर समान पडत आहे. मग मागे वळून पुन्हा स्त्री सक्षमतेचा नारा दिला जात आहे, स्त्री सुरक्षितता ऐरणीवर येत आहे. सन २०१२ मध्ये दिल्लीत घडलेल्या निर्भया घटनेनंतर अनेक माता, भगिनी, कुमारीका, अल्पवयीन मुली एखाद्या नराधमाच्या लैंगिक वासनेला बळी पडत आहेत. या घटनांमधून स्त्री मनावर परिणाम होत आहे. स्त्रियांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. हे सुध्दा स्त्रियांचे मानसिक आरोग्य बिघडण्याचे मुख्य कारण आहे.

स्त्रियांना कौटुंबिक पातळीवर आज मान सन्मान नाकारला जात नाही परंतू, आजही परंपरागत रुढी आणि रिवाज हे स्त्रिला दुय्यम स्थान देणारेच आहेत.

अलिकडेच निर्माण झालेल्या महिलांचे कौटुंबिक अत्याचारापासून संरक्षण करणारा कायदा २००५ हा अमलात येणे ही काळाची गरज होती. मात्र या कायद्याने अनेक महिलांना न्यायालयापर्यंत आणले, वादप्रतिवाद होत असताना तटस्थपणे महिलांच्या सातत्याने होत असलेल्या कौटुंबिक तक्रारीमधील सार पाहणे गरजेचे आहे. महिला न्यायालयापर्यंत येतात त्या अन्यायाविरुध्द लढण्याची जाणीवेतुन सासरच्या कुटुंबाला धडा शिकविण्याकरिता की स्वत:च्या स्वैर जगण्याला कायद्याची पुष्टी मिळावी म्हणून याचा डोळसपणे विचार होणे गरजेचे आहे. मात्र यापैकी काही असेल तरी यामागे बहुतांशी स्त्रियांचे आजचे मानसिक स्वास्थ बिघडले आहे हे मान्य करावे लागेल.

महिलांचे मानसिक आरोग्य त्यांचे मानसिक आणि शारिरीक कल्याणासाठी फार महत्त्वाचे आहे. सर्वसाधारणपणे जैविक, सामाजिक घटकामुळे त्यांचे मानसिक आरोग्यावर परिणाम होत असतो. शेकडा २०% महिलांचे मानसिक स्वास्थ्य ठीक नसते. १९९३ च्या आधारावर त्यात तिप्पट वाढ झाली आहे. ही धोक्याची पातळी ओळखून तातडीने पावले उचलण्याची नितांत गरज आहे.



कुटूंब व्यवस्थेत आजही स्त्रिला सर्व्हीस पोव्हायडर या भुमिकेत पाहिलं जात आहे. दर्जा दुय्यम पण कौटुंबिक जबाबदारी मात्र १०० टक्के स्विकारावी ही अपेक्षा, एकीकडे नोकरी व्यवसायाची सर्व दारे स्त्रियांना खुली करायची आपण अर्थार्जन करणार कुणासाठी? उत्तर आहे तुमच्या कुटुंबासाठी कुटुंब कोणाचं अर्थात विवाहपुर्वी पिता ज्या कुटुंबाचा कर्ता आहे. त्या कुटुंबासाठी विवाहनंतर पती, सासरे, मुलगा, दिर अशा कर्त्याकुटुंबासाठी स्त्री व्यवसायाकरीता घराबाहेर पडते पण हे सांभाळून प्रपंच सांभाळणे हे तिचे आद्य कर्तव्य केलेच पाहिजे हा सामाजिक दंडक तिच्यासाठी याचे भान तिला पावलो पावली करुन दिले जात आहे.

आजही खेडोपाड्यात वावरत असणाऱ्या स्त्रिया वर्षानुवर्षे संसाराच्या रामरगाड्यातुन अजुनही बाहेरच्या जगापासून अनभिज्ञ आहे. ८० टक्के महिला आजही परंपरांच्या विळख्यात पुरुष पधान संस्कृतीमध्ये अस्तित्वहीन जीवन जगत आहे. अशा महिलांचे मानसिक स्वास्थ्य हा फार महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

भारतासारख्या सर्वात मोठ्या लोकशाही देशात, विविध जाती धर्मांनी, विचारांनी भरलेल्या देशात स्त्रित्वापती भावना मात्र एकच आहे. स्त्रिचं असणं, स्त्रिचं जगणं, स्त्रिचं बोलणं हे सारं काही पुरुष प्रधान संस्कृतीला समर्पित करणं आज स्त्रीच्या दुहेरी भूमिकेतुन स्वत्वाच्या विकासाच्या मागे धावत आहे.

नोकरी व्यवसाय करत असताना कामाच्या ठिकाणी होत असलेल्या अवहेलना, लैंगिक शोषण या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. शालेय आणि कॉलेज जीवनात दिवसा ढवळ्या कोवळ्या वयातील तरुण मुली एखाद्या नराधमाकडून लैंगिक वासनेच्या पोटी बळी जात आहेत. बस, रेल्वे अशा सार्वजनिक वाहतुकीच्या ठिकाणी महिलांना वासनेची शिकार व्हावे लागत आहे हे दुर्दैव आहे आणि या सर्वांचा परिपाक आज महिलांचे स्वास्थ्य निश्चितपणे बिघडले आहे. त्याबाबत वेळीच जागरुकता निर्माण करणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करुन सकारात्मक परिस्थिती निर्माण करणे फार गरजेचे आहे. कुटुंबात वावरताना जबाबदारीचे अति ओझ्याने प्रत्येक महिला एका वेगळ्या मानसिकतेतुन जात आहे. कुटुंबातील विविध जबाबदाऱ्या स्विकारताना, कुटुंबातील घटकांच्या अपेक्षा पूर्ण करताना, प्रत्येक महिला स्वत:चे मन:स्वास्थ्य मात्र हरवत चालली आहे. अलिकडे महिलांचे आरोग्य बिघडण्याचे आणखी एक कारण केवळ चुल आणि मुल एवढेच मर्यादीत कक्षेत काम करणारी महिला आता नोकरी व्यवसायाचे निमित्ताने बाहेर पडते तेव्हा तिला तिच्या कार्यक्षमतेच्याही अधिक जबाबदारी पेलावी लागते. त्यातून येणारा ताण हा निश्चितपणे शारिरीक त्रासापेक्षा मानसिक दृष्ट्या मोठा असतो. स्त्रिया नोकरी व्यवसाय करुन कुटूंबाकडे परततात तेव्हा तिची अपेक्षा घरी तिला समजुन घेणारे तिचे श्रमाचा आदर करुन तिला समजून घ्यावे अशी तिची अपेक्षा असते.

आजही अनेकवेळा मानसिक आरोग्य बिघडलेल्या स्त्रिकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टीकोन स्वच्छ नाही. अनेक वेळा ग्रामीण भागामध्ये त्यांना वेडे ठरविले जाते. असेही आपल्याकडे या आजारावर उपचार करणाऱ्या मानसोपचार करणाऱ्यांची संख्या फार अत्यल्प आहे. तसेच ग्रामीण भागात त्यासाठी होणारा खर्चही परवडत नाही. त्यामुळे अत्यंत असुरक्षित भावना निर्माण झालेल्या स्त्रिया आत्महत्यांना प्रवृत्त होतात. हे सर्व टाळण्यासाठी समाजसेवी संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. लोकांचे मनातील गैरसमज दुर करुन योग्य उपाययोजनांचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. त्यासाठी नुसता कायदा उपयोगाचा नाही तर घरापासून समाजापर्यंतची मानसिकता बदलण्याची नितांत गरज आहे. महिलांचा बचतगटातील, महिला मंडळातील सहभाग महिलांवरील मानसिक ताण कमी करायला उपयोगी होतो. लायन्स क्लबच्या माध्यमातून हा जनजागृतीचा कार्यक्रम हाती घेतला असून हे फार स्तुत्य आहे. त्यात जास्तीत जास्त जनतेला, महिलांना, घरच्यांना सामावून घेणे काळाची गरज आहे.



**१० ऑक्टोबर हा जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. मानसिक स्वास्थ्य त्याची जाणीव आणि त्यावरील उपाय योजना हा विषय जागतिक पातळीवर फार महत्त्वाचा ठरत आहे. २०३० पर्यंत मानसिक स्वास्थ्य आजार जगातील सर्वात मोठ्या आजारातील एक आजार ठरणार आहे. आज जगामध्ये आपण पाहिले तर प्रत्येक ४० सेकंदाला या समस्येमुळे एक आत्महत्या होत असते आणि भारतामध्ये हे प्रमाण प्रत्येक सात मिनिट आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन लायन्स इंटरनॅशनलने ४ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर या कालावधीमध्ये या विषयाबाबत जागरूकता निर्माण करणे, त्याचप्रमाणे यावरील उपाययोजना या दृष्टिकोनातून विशेष कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून लायन्स क्लब अलिबागचे वतीने आपण विविध कार्यक्रम आयोजित करीत आहोत. दैनिक कृषीवल सारख्या अग्रगण्य दैनिकाने याकामी सहकार्याचा हात पुढे करून या विषयाचे गांभीर्य आणि उपाययोजनेची गरज लोकांपर्यंत पोचविण्यासाठी फार मोठे सहकार्य केले आहे.**

**– श्री. प्रदीप नाईक, अध्यक्ष, लायन्स क्लब अलिबाग.**

## निवडक

### कुस्तीत प्रणय-पार्श्वचे यश

**रायगड :** मुंबई विभागीय शालेय स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील प्रणय प्रदिप पवार आणि पार्श्व विकास भगत यांनी यश संपादन केले आहे. अलिबागमधील कोकण एज्युकेशन सोसायटी जनरल अरुणकुमार वैद्य, माध्यमिक विद्यालय व इंडस्ट्रीअल ज्युनिअर कॉलेज अलिबागचे शालेय कुस्ती स्पर्धेत विभागीय स्तरावर नाव लौकीक झाले आहे. त्यामुळे शाळा समितीचे चेअरमन, को.ए.सो. अलिबागचे अध्यक्ष ॲड. सिध्दार्थ संजय पाटील, शाळा समितीचे सदस्य, प्राचार्य, शैक्षणिक संकुलातील सर्व कर्मचारी वर्गाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रणय पवार आणि पार्श्व भगत हे विद्यार्थी गेल्या अनेक वर्षापासून कुस्ती खेळत आहेत. शालेय स्तरावरील वेगवेगळ्या कुस्ती स्पर्धेत चांगली कामगिरी करून विजय मिळविला आहे. कळंबोली येथे मुंबई विभागीय शालेय कुस्ती स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील असंख्य खेळाडू सहभागी झाले होते. त्यामध्येजनरल अरुण कुमार वैद्य माध्यमिक विद्यालय आणि इंडस्ट्रीअल ज्युनिअर कॉलेजमधील प्रणय पवार आणि पार्श्व भगत यांचादेखील समावेश होता. प्रणय पवार याने १९ वर्षीय वयोगटात ६५ किलो वजनी गटातून कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. त्यांची राज्यस्तरिय कुस्ती स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. पार्श्व भगत याने १७ वर्ष वयोगटातून कुस्ती स्पर्धेत जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. त्याची विभागीय स्तरावर निवड करण्यात आली आहे.

### नीरजची बॅट तळपली

**नवी दिल्ली :** उत्तराखंड प्रीमियर लीगमध्ये एक जबरदस्त धमाका झाला. नीरज राठोर या फलंदाजाने स्फोटक फलंदाजी केली. त्याने धमाकेदार फलंदाजी केली. अवघ्या ३९ चेंडूत या खेळाडूने झंझावती शतक ठोकले. त्याच्या फलंदाजीची सध्या देशात एकच चर्चा सुरू आहे. ८ चौकार, ८ षटकार अशी स्फोटक फलंदाजी त्याने केली. नीरज राठोर या फलंदाजाने ३९ चेंडूत १०० धावा चोपल्या. हरिद्वारच्या २७ वर्षीय डावखुऱ्या फलंदाजाने टी२०मध्ये वेगवान शतक पूर्ण करत क्रिकेट निवड समितीचे लक्ष वेधले आहे. त्याने गोलंदाजांचा घामाटा काढला. प्रत्येक चेंडूवर त्याची ही कमाल पाहून प्रेक्षकांनी मैदान डोक्यावर घेतले. नैनीताल टायगर्सने पहिल्यांदा फलंदाजी करत १९९ धावांचा डोंगर उभा केला.

# भारताचा अडीच दिवसात विजय

## विंडीजवर डावासह १४० धावांनी मात; मालिकेत १-० ने आघाडी

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**




भारतीय संघाने वेस्ट इंडिज विरूद्धच्या मायदेशातील कसोटी मालिकेत विजयी सलामी दिली आहे. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये अडीच दिवसातच हा सामना जिंकला आहे. भारताने विंडीजवर १४० धावा आणि डावाने हा विजय साकारला आहे. भारताने विंडीजच्या १६२ च्या प्रत्युत्तरात पहिला डाव हा ४४८ धावांवर घोषित केला. त्यानंतर भारतीय संघाने विंडीजला दुसऱ्या डावात तिसऱ्या दिवशी २८६ धावांची आघाडी मोडण्याआधीच गुंडाळले. भारताने विंडीजला १४६ रन्सवर ऑलआऊट केले. अशाप्रकारे दोन सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे.

भारतीय संघाने तिसऱ्या दिवसाचा खेळ सुरु होण्याआधी पहिला डाव ५ बाद ४४८ धावांवर घोषित केला. त्यानंतर बॅटिंगसाठी आलेल्या विंडीजला भारतीय गोलंदाजांसमोर धड २ सत्रही खेळता आली नाहीत. भारतीय गोलंदाजांनी विंडीजचे ४५ ओव्हरमध्ये १४६ रन्सवर पॅकअप केले. भारतीय संघासाठी सिराज, कुलदीप, वॉशिंग्टन या चौघांनी विंडीजला ऑलआऊट केले. जडेजाने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. सिराजने तिघांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. कुलदीपने दोघांना आऊट केले तर वॉशिंग्टनने १ विकेट मिळवली.

त्याआधी टॉस जिंकून बॅटिंग घेणाऱ्या पाहुण्या विंडीजला भारताने पहिल्या डावात १६२ रन्सवर ऑलआऊट केले. सिराजने सर्वाधिक ४ तर बुमराहने ३ विकेट्स मिळवल्या. त्यानंतर भारतीय संघासाठी तिघांनी शतक झळकावली होती.

केएल राहुल, ध्रुव जुरेल आणि रवींद्र जडेजा या त्रिकुटाने शतकं झळकावली. केएलचं कसोटी कारकीर्दीतील ११ वं तर मायदेशातील दुसरं शतक ठरलं. ध्रुवचे पहिलंवहिलं शतक ठरले. तर जडेजाचं उपकर्णधार म्हणून पहिले तर कसोटीतील सहावं शतक ठरलं. तसेच कर्णधार शुबमनने अर्धशतकी खेळी केली. भारताने अशाप्रकारे ४४८ धावांचा डोंगर उभा केला.

### शुबमनच्या नेतृत्वात तिसरा विजय

**भारतीय कसोटी संघाचा शुबमनच्या नेतृत्वातील विंडीज विरूद्ध मायदेशातील पहिला आणि एकूण तिसरा विजय ठरला. आता उभयसंघातील दुसरा आणि अंतिम सामना हा १० ते १४ ऑक्टोबर दरम्यान नवी दिल्लीतील होणार आहे. भारताला हा सामना जिंकून विंडीजला क्लीन स्वीप करण्याची संधी आहे. तर विंडीजसमोर अंतिम सामना जिंकून मालिका बरोबरीत राखण्याचे आव्हान असणार आहे.**

## मेस्सीचा जलवा मैदानात उतरणार

**| मुंबई | प्रतिनिधी |**

फुटबॉलचा दिग्गज खेळाडू लिओनेल मेस्सी या वर्षाच्या अखेरीस भारतामध्ये येणार आहे. स्वत: मेस्सीने त्याच्या भारत भेटीची पुष्टी केली आहे. याआधी मेस्सी २०११ साली भारतात आला होता, आता १४ वर्षानंतर आता हा महान फुटबॉलपटू भारतात पुन्हा एकदा येणार आहे. भारतासारख्या फुटबॉलप्रेमी देशात परतणे हा माझ्यासाठी खूप मोठा सन्मान आहे, असं मेस्सी म्हणाला आहे. भारतामध्ये जाणं हा माझ्यासाठी खूप मोठा सन्मान आहे. भारत हा अतिशय खास देश आहे. १४ वर्षांपूर्वीच्या आठवणी माझ्या मनात अजूनही ताज्या आहेत. भारतीय चाहते अद्भुत होते. भारत फुटबॉलसाठी उत्साही देश आहे. मी चाहत्यांच्या नवीन पिढीला भेटण्यासाठी उत्सुक आहे, असं मेस्सी म्हणाला.

## कराटे स्पर्धेत मुरुडचे यश

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

नवी मुंबई उलवे येथील भुमीपुत्र भवन येथे आयोजित अखिल भारतीय खुल्या कराटे अजिंक्यपद स्पर्धेत मुरुड तालुक्यातील नाज अकॅडमी हायस्कूल व सुविद्या हायस्कूलने चमकदार कामगिरी करत यश मिळवले आहे.



यामध्ये इज्रा साने रौप्यपदक, जुहेब वांगारे, रौप्यपदक, मोहम्मद वांगारे रौप्यपदक व कांस्यपदक, मनाल हद्दादी रौप्यपदक व कांस्यपदक, माहिरा मनियार रौप्यपदक, हाया हाफिज रौप्यपदक, मैहविश खांनजादा कांस्यपदक, माहिर अली सुवर्णपदक व कांस्यपदक, अलहान अन्सारी सुवर्णपदक व कांस्यपदक, मरियम कादरी रौप्यपदक व कांस्यपदक, रियाब खानपठाण कांस्यपदक, अर्शान हाफिज रौप्यपदक व कांस्यपदक, मोहम्मद नखतारे रौप्यपदक, तझिन फहिम सुवर्णपदक व रौप्यपदक, अब्दुल मुद्दसिर आदमने दोन रौप्यपदक, नवास सांगळे रौप्यपदक, स्वरुप अंबटकर सुवर्णपदक, हसीब खांनजादा कांस्यपदक, असद दामाद दोन रौप्यपदक, अब्दुल फरान उल्डे सुवर्णपदक व कांस्यपदक, यासिन मनियार सुवर्णपदक व कांस्यपदक, फरिहा खांनजादा सुवर्णपदक व कांस्यपदक, खतिजा हद्दादी सुवर्णपदक व रौप्यपदक, हमदान हद्दादी रौप्यपदक व कांस्यपदक, शैमान पठाण सुवर्णपदक या यशाबद्दल शफी तांडेल यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. प्रीतम वाळंज, मनाली पाटील, मतीन हमदुले, दिलशाद दामाद, मेघा भंडारे मोईउद्दीन अन्सारी, संजीदा खांनजादा, तरन्नूम नखतारे, आशिष बुल्लू, फातिमा कादरी, रबिया वांगारे, रुकसार खान पठाण, मुन्नजा यांनी अथक परिश्रम घेतले.

**बेंगळुरू बुल्सला हरवून अव्वलस्थानी | पंकजने केले पुणेरी पलटनचे प्रतिनिधीत्व**

# पुणेरी पलटनने मारली बाजी

**| जयपूर | वृत्तसंस्था |**

प्रो कबड्डी लीग स्पर्धेतील १२ व्या हंगामातील ५९ वा सामना पुणेरी पलटन आणि बेंगळुरू या दोन्ही संघांमध्ये पार पडला. गेल्यावेळी जेव्हा हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते, त्यावेळी पुणेरी पलटनने टाय ब्रेकरमध्ये ६- ४ ने बाजी मारली होती. हा सामना देखील २९- २९ ने बरोबरीत राहिला आणि पुणेरी पलटनने टाय ब्रेकरमध्ये ६- ४ गुणांनी बाजी मारली होती.

या सामन्यात अस्लम इनामदार खेळू शकला नाही. त्याच्या जागी पंकज मोहतेने पुणेरी पलटन संघाचं प्रतिनिधित्व केले होते.



पूर्वार्धातील १५ मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे १५-११ गुणांसह ४ गुणांची आघाडी होती. पूर्वार्धात दोन्ही संघांमध्ये अटीतटीचा खेळ रंगला. पण पुणेरी पलटनने १७-१३ गुणांसह ४ गुणांची आघाडी कायम ठेवली.

उत्तरार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ १९-१६ गुणांसह ३ गुणांनी आघाडीवर होता. पुणेरी पलटनने ९ व्या मिनिटाला सुपर टॅकल करत गुणसंख्येत आणखी २ गुणांची भर घातली. उत्तरार्धातील सुरुवातीचा १० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे २२-१९ गुणांसह ३ गुणांची आघाडी होती.

बेंगळुरू बुल्सने पुणेरी पलटनला मोठी आघाडी घेऊ दिली नाही. शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनकडे ४ गुणांची आघाडी होती. शेवटची ३ मिनिटे शिल्लक असताना दोन्ही संघ २५- २५ ने बरोबरीत आले. पुणेरी पलटनचा संघ नको त्या वेळी पहिल्यांदा ऑलआऊट झाला. बेंगळुरू बुल्सने २८-२५ गुणांसह ३ गुणांची आघाडी घेतली. शेवटच्या मिनिटाला बेंगळुरूकडे २ गुणांची आघाडी होती. आदित्य शिंदेने १ गुण घेत पिछाडी कमी केली. पुणेरी पलटनने १ गुण घेत गुणसंख्या २९- २९ ने बरोबरीत आणली.

### टाय ब्रेकरने निकाल

**या सामन्याचा निकाल देखील टाय ब्रेकरने लागला. टाय ब्रेकरमध्ये पुणेरी पलटनचा संघ बेंगळुरू बुल्सवर भारी पडला. हा सामना पुणेरी पलटनने ६-४ ने आपल्या नावावर केला.**

## अभिजित कॅरम स्पर्धेत विजयी

**मुंबई :** एमआयजी क्रिकेट क्लब, मुंबई येथे पार पडलेल्या तिसऱ्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुण्याच्या अभिजित त्रिपनकर आणि मुंबईच्या रिंकी कुमारी यांनी विजेतेपदावर आपली छाप उमटवली. पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात अभिजित त्रिपनकरने माजी विश्वविजेता प्रशांत मोरेवर २५-२२, १९-१८ अशी सरळ दोन सेटमध्ये मात करत विजेतेपद पटकावले. उपांत्य फेरीतही त्याने पहिला सेट गमावल्यानंतर दमदार पुनरागमन करून हरेश्वरचा पराभव केला होता. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत मुंबईच्या हरेश्वरने ठाण्याच्या कुणाल राऊतवर तीन सेटमध्ये विजय मिळवला.

## आकांशा नित्तुरे दुसऱ्या फेरीत

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

नाशिकच्या खेळाडूंनी महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस स्पर्धेत वर्चस्व गाजवले. दिव्याने, मेन ड्रॉमध्ये क्वॉलिफ़ायिंग फ़ेरीतून प्रवेश केला असून तिने पाऊसामुळे परिणाम झालेल्या सामन्यात तिसऱ्या क्रमांकाची माहाराष्ट्राचा पूजा इंगळे हीचा ६-३, ६-४ असा पराभव केला. सामन्याची सुरवात अतिशय रोमांचक पद्धतीने झाली, दोन्ही खेळाडू ३-३ अशा बरोबरी ने खेळत असताना दिव्याने खेळावर नियंत्रण मिळवत थेट तीन गेम जिंकून सेट जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये देखील पहिल्या सेटप्रमाणे ३-३ अशी बरोबरी झाली, पण मध्यंतरापर्यंत दिव्याने पूजाची सर्विस ब्रेक करत ५-३ अशी आघाडी घेतली. त्या नंतर तिसरा क्रमांक असलेल्या पूजाने नेटभोवती उत्कृष्ट प्रदर्शन करत डाव पुढे नेला, पण दिव्याला तिचा सहावा गेम जिंकण्यापासून आणि पुढील फ़ेरीत जाण्यापासून ती थांबवू शकली नाही.



दरम्यान, खेळामध्ये आकांशाने पहिल्या फ़ेरीत महिला एकेरी सामन्यात अगदी पहिल्या गेम पासूनच आघाडी मिळवली, तिने उत्कृष्ट बेसलाईनसह तेलंगनाच्या पावनी पाठकला ६-०,६-० अशा सरळ सेटमध्ये पराभूत केले. दुसऱ्या क्रमांकवर खेळणाऱ्या आकांशाने बेसलाईन जवळ आपल्या गतीचा उत्तम वापर केला आणि पावनीची सर्विस ब्रेक करत एकहाती विजय मिळविला.

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)